मा
• मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. २७१८
(जिल्हा वाचनालय)
३५
मासिकाचे नांव — काव्यरत्नावली
संपादक —
मासिक क्रमांक — सन — १८८५
अंक —
(महिने) १ ते १२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
जुनी मासिके (संदर्भ)

# काव्यरत्नावली.

वर्ष २

# अनुक्रमणिका

कवीचें नांव आणि विषय.


१ सदाशिव मोरेश्वर भिडे

१ ब्रिटिश गर्वहरण १

२ सह्याद्रि १२०

२ नारायण गणेश शिरसाळकर

१ निर्धन झालेल्या श्रीमानाचें आपल्या स्त्रियेजवळ संभाषण १२

२ माझें घर ९१

३ लक्ष्मण गणेश नांवळकर

१ मुखशोधन भाग १ ला १७

२ " " भाग २ रा ६५

कवि ( गुप्त नांव )

१ आईची ममता २९

४ विष्णु बाबाजीराव कुळकर्णी

१ सुभाषित ३०

२ " " ४७
३ " " ६४
४ औरंगजेबाचा पश्चात्ताप १६९

६ वासुदेव वामन शास्त्री खरे

१ मध्यरात्र ३
२ सन्मान ४
३ चंद्रप्रकाश १२
४ प्रहररात्र १८

७ नारायण कृष्ण गद्रे

१ श्रीमत् प्रतापसिंह काव्य भाग
भाग १ ला ३३
२ " " भाग २ रा ८१

८ दंडी कवि (गुप्त नांव)

१ स्वावलंबन ४६
२ सुभाषित ४७
३ साधुवृत्ति ४८
४ माझें दैवत ७०
५ नीच लोक ८०
६ एका कवीच्या मांगा ६१

७ चोविस गुरु [illegible]

८ महिम्न [illegible]

९ करुणाविलास [illegible]

१० सोंगटी [illegible]

११ शांतिविलास [illegible]

९ [illegible] गणेश लोंढे

१ चारुचर्या [illegible]

२ सूर्योदय [illegible]

३ वारंवार पहा [illegible]

१० गंधर्व कवि ( गुप्त नांव )

१ श्री अंबिका दर्शन ७१

२ दृष्टांतबोध ९३

११ केशव नारायण वैद्य

१ भीतीची मैत्री ९७

१२ विविधित वक्ता कवि

अर्थ सादृश्य ११८

हिंदु स्त्र्याळें ( अभिप्राय ) १८

१३ जगन्नाथ थोंडु भांगले

१ भ्रमराचा विलाप १२३
२ वेळाचें गायन १२५
३ जन्म भूमि १५९
४ देवास नमन १७४

१४ भाग काव १ गुप्त नांव,

१ अल्पवयांत मरण १२६

१५ गोपाळ कृष्णाजी जाधव

१ ऐतिहासिक कल्पक १२०

१६ मधुकर कवि ( गुप्त नांव )

१ उद्यानवर्णन १४२

१७ नारायण रघुनाथ अनगळ

१ कुन्तीकृष्ण संवाद १६९

१८ सदाशिव शंकर पारगांवकर

१ राष्ट्रीय सभेचा व द दिवस १६७

१९ केशव नागन ठे

१ निर्विषीव १८५
२ मुद्देवापणीचा झगडा १८०

# काव्यरत्नावलि.

## अंक १ ला.

## दिल्लीशगर्वहरण.

### वसंततिलकावृत्त.

म्लेच्छाधिपाल अतिधूर्त महाप्रताप
ज्याच्या भयें भरतसे अरिचित्ति कांप
यद्राज्य विस्तृत समस्तहि आर्य देशीं
ज्याच्या अपार भरलें मणि हेम कोशीं १

बुद्धिप्रभाव लढवून जयें स्वतात
धूर्ताग्रणी बसविला प्रतिबंधनांत
जेणें स्वबंधु सगळेहि रणांगणांत
जिंकूनियां मिळविलें कुतुकेंच तक्त २

सांडूनियां सकळ पूर्वजकीर्ति गर्व
यत्पादनम्र वसती रजपूत सर्व
जेणें जगज्जयकर प्रथित स्वनाम
सर्वां मुखीं वदविलेंच सुकीर्तिधाम ३

दिल्लीप तो अलमगीर महोग्रतेजा
औरंगजेब ह्मणुनी जन जाणती ज्या

त्यालाहि बुद्धिविभवें चकवी शिवाजी
ती सत्कथा अति मनोहर आयका जी ४
भागाविजापुरपतींप्रत जिंकुनीया
चोहों दिशांस निजकीर्तिस धाडुनीयां
राजा शिवाजि निजराज्य नयज्ञ पाळी
औरंगजेबहृदयीं मति तो निराळी ५
" मी तो समस्त अवनी यवनीं भरा
सर्वत्रही यवनधर्मसमृद्धि व्हावी
ऐसा विचार धरुनी करिं यत्न तोंच
हिंदूंत कोण शिव नामक हा मध्येंच ६
विश्वासवून बुडवी अफजूलखान
हा आपणास मग शूर असें गणून
गर्वांध राज्य करितो, नच नम्र मातें
दिल्लींद्रविक्रम कसा लव दाउं यातें " ७
ऐसा विचार करुनी मग दिल्लिपालें
स्वा मातुला बलप योजुनि धाडियेलें
तो एक लक्ष बल घेउनि शास्तखान
आला पुण्यास बहु गर्जत " दीन दीन " ८
" कीं सत्य दीन " ह्मणुनीच शिवें दयाळें
त्या भीप्रदर्शन करून पराभवीलें
तत्रापि तत्सुत वधून तदंगुलांतें
छेदूनियां प्रकटिलें स्वपराक्रमातें ९

" आला ससैन्य निजमातुल मी दरून
दिल्लीपुरास परतून " हि आयकून
क्रोधांध तो यवन बादशहा वदे " छी
त्याच्या मुखास बघण्यासहि मी न इच्छीं १०
तो डोंगरामधिल उंदिर हो शिवाजी
घावे, तदा समय खान, विचित्र गाजी
कीं फुंकरें मशक जा गगनीं उडावा
कां तद्वयें हरिपतीहि अहो पळावा " ११
तो बादशाह वदला जरि हें सभांतीं
किंचिद्भयाकुल असाच असे स्वचित्तीं
कीं, आफजूल, निजमातुल याहि जेथ्यां¹
मर्दीं स–कौतुक न तो लघु, हें गमे त्या १२
चित्तीं विचार करि " हा जयसिंहराय
" यत्क्षात्रतेज वदवी अहितांस हाय
यावीण अन्य मजला न दिसे प्रवीर
जिंकील जो रणिं शिवास सुदक्ष धीर १३
हा हिंदु, यावरि कसें परि विश्वसावें
सर्वाधिकारि नच या समरीं करावें "
योजून हें अलमगीर वधून डोळे
तेव्हां सभास्थ जयसिंह नृपास बोले १४
" दिल्लींद्रदक्षिणकरा जयसिंहराया
जावें शिवाजिवरि तन्मद संहराया

1 वीरांना.

देतों तुह्मांस मन्सबीस दिलीरखाना
दोघे तुह्मी पकडुनीहि शिवास आणा" १५
तैं वीरवर्य जयसिंह दिलीरखान
दोघेहि दक्षिणपथीं निघती ससैन्य
तेव्हां "स्वराज्य शिवराजहि आज नष्ट"
ऐसेच हिंदु गणिती हृदयीं सकष्ट १६
मिर्झोपनाम जयसिंह परी मनांत
चिंता करी "शिव असे बहु युक्तिवंत
आह्मीच भीत अथवा जित जाहलों कीं,
दुष्कीर्ति होइल न ती गणवेल लोकीं १७
तेव्हां कसेंहि करुनी करूं साम याशीं
राखूं स्वकीर्ति, करूं तुष्टहि दिल्लिपाशीं
हा हिंदुभव्यकर[1] यासह ठेवुं गोडी"
योजून हें शिवनृपास निरोप धाडी १८
"हा सार्वभौम यवनेश्वर दिल्लिपाल
याशीं करून कलि हो न तुह्मी तगाल
ऐका मदीय वच संधि करून साधा
स्वीया हिता मग तुह्मां कसली न बाधा" १९
ऐकून हें शिव करी हृदयीं विचार
"क्षत्रांश हा नृपति, खानहि वीर थोर
यांशीं न युक्त रण, संधिच कीं करावा
हा संकटाब्धि जयसिंहपथें तरावा" २०

१ हिंदूंचें कल्याण करणारा.

हिंदूस हिंदु मिळुनी करिती तहातें
पाहून खान जळला हृदयीं, कसें तें
जिंकूं पुरंदर सगर्व कसा निघाला
कैसा मुरारि मग देइ तयास टोला २१
तेथें मुरारि पडला, परि मावळ्याचें
सत्तेज पोळवि कसें मन दिल्लिराचें
सांडून दर्प " तह योग्य " कसें वदे तें
सारेंच अद्भुत परी लिहवे न येथें २२
तैं " सप्तविंशति सुदुर्गम दुर्ग देतों "
बोले शिवाजि, जयसिंह परी वदे तो
" ज्ञावें तुह्मी यवनपालकदर्शनातें "
ता मानिधूर्तशिवमानासि येइना तें २३
स्नेहें शिवाजिस तदा जयसिंह राजा
बोले " तुह्मी ससुत निर्भय दिल्लिला जा
येईन मीहि, परि तो शठ बादशाहा
दोघांहि देइल दगा नच योग्य पाहा २४
दे कां जरी अलमगीर दगा तुह्मांला
देऊं समस्त रजपूत तरी जिवाला
मद्भीति तो तरि धरून मनीं सदाही
द्याया तुह्माप्रत दगा धजणार नाहीं २५
दिल्लीस्थ त्यांतुनिहि मत्सुत राम त्यातें
आज्ञापितों, करिल साह्यच तो तुह्मातें "

तेंव्हां शिवाजि नृप मान्य करी तहाला
दिल्लीपुरास निघण्यास सुसिद्ध झाला २६
घेई बरोबर हिरोजि निराजि ऐसे
षण्मित्र लष्करहि चार हजार खासे
तो शंभुनाम सुत घेउनियांहि संगें
चाले नमून जननीपद दिल्लिमार्गें २७
यावा शिवाजि न धरून मनांत शंका
या हेतुनें यवनपें अधिकारिलोकां
आज्ञापिलें " शिवनृपाप्रत गौरवावें
दिल्लींद्रपुत्रसम मानुनि चालवावें " २८
दिल्लीसमीप शिव ये परिसून वृत्त
झाला मुदें यवनपाल सकंपचित्त
धाडी तयास मग भेटिस रामसिंहा
मिर्झानृपालतनया रजपूतसिंहा २९
जे कोरडे वकिल आधिंच धाडियेले
तेही तदा निज नृपाप्रत भेटुं आले
ते सांगती " यवन गोड असे वरून
आहे कसा परि निजांतरिं हें कळे, न " ३०
योजी शिवास गृह सुंदर राहण्याला
दिल्लीप तें शिवपुरा वसवी निराळा
धूर्तेश तो शिवनृपाप्रत काळजीनें
द्याया प्रमोद झटला बहुतापरीनें ३१

तेथें शिवाजि वसुनी मग दिल्लिपाला
भेटावया सुदिनिं दक्षपणें निघाला
त्या म्लेच्छभूपतियशावरतींच घाला
घालावयास गमलें सकला जनांला १२
पाहोनियां चकित हा शिव हो म्हणूनी
सामंतपूर्ण दरबार तदा भरूनी
बैसे मयूरसदृशासनिं रत्नयुक्तीं
पैतामहीं अलमगीर सचिंत चित्तीं १३
जो उंदरासम शिवाजिस मोजणार
तो रक्षणार्थ जवळी करि शस्त्रभार
आला शिवाजि दरबारिं बघून बोले
"आवा शिवाजि" परि तत्क्षणिं धैर्य गेलें १४
जो मानुनी मशकसा हलका शिवाला
फुंकूनियां उडविणार दिगंतराला
ऐसा महाजडहि दिल्लिप त्या प्रसंगीं
स्वस्थैर्यसंशयित चिल्खत घालि अंगीं १५
ते तैमुरादि निजपूर्वज जाणतील
ही स्वस्थिती खचित ते तरि लाजतील
आणून हें अलमगीर तदा मनांत
सिंहासनावर जणों बसला सचिंत १६
सिंहासनापुढति तो व्यवहारविज्ञ
राजा शिवाजि मुजरे करि तीन सुज्ञ

शंभूस एक, गिरिजेस दुजा करूनी,
चिंतूनियां करि तिजा स्वपित्यास मानी ३७
तेव्हां करी शिवनृपा "उजव्या कडेस
राहा उभे" ह्मणुनि दिल्लिप तो निदेश
तों आपणावर असे जसवंतसिंह
पाहोन होइ अतितप्त मराठिसिंह ३८
"हा मारवाडनृप भ्याड कितीकदां या
माझ्या जनीं समरिं लावियलें पळाया
बैसे तरी वरिच, यास करीन ठार
मित्रा, तुझी क्षणभरी मज दे कट्यार ३९
"किंवा कशास जसवंत? न यांत त्याचा
अन्याय, हा यवनपांसल दंड्य साचा
कृष्ण क्षणांत निज मातुल कंस कैसा
मर्दी सकौतुक बघो जन तो तमाशा" ४०
ऐसें शिवाजि वदला जइं रामसिंहा
तेव्हां प्रवीरजनवेष्टित बादशाहा
शंका—भयाकुल पुसे "ह्मणि काय झालें?"
किंचित्पुढें सरुनि तो मग राम बोले ४१
"दर्बार भव्य, जणुं इंद्रसभा दुजी ही
आजन्म यापरि न देखियला कधींही
त्येणें जरा गरम वृत्ति दिसे शिवाची
कांहींहि याहुनि विशेष असें नसेची" ४२

हें ऐकतां दचकला मनिं दिल्लिभूप
वाटे तया " उडुनि येइल कीं समीप
हा व्याघ्रतुल्य शिव भेट पुरेच याची "
आज्ञा तया करि तदा गृहिं जावयाची ४३
जातां शिवाजि वदला यवनेश गाजी
" झाली अहो नजर एक तयाचि माझी
आहे खरा पुरुष शूर महोग्ररूप
अल्ला करी खचित आज कृपा अमूप ४४
आलें सुदैव अमुचें गमतें फळाला
कीं हा शिवाजि सहजीं स्वपुरास आला
आतां स्वदेशिं जर याप्रत जाउं देउं
आह्मी असीम तरि मूर्ख खरेच होउं " ४५
योजून दिल्लिपति हा स्वमनीं विचार
राजा शिवाजिस करी प्रतिबंध थोर
त्याच्या सभोंति बहु शूर हुशार सेना
ठेवून मोकळिक त्या गमना करीना ४६
हें पाहतांच शिव कोपुन लाल झाला
बोले, " न अक्कल कशी यवनाधिपाला
हा सार्वभौम बलवान् ह्मणुनी तहाला
झालोंच मान्य पारि होय कुबुद्धि याला ४७
आहे बलापरिसही मति थोर कैशी
म्लेच्छास दाखविन युक्ति करून खाशी

भूमंडळांत नच जोड दुजी जयाला
योजून हुन्नर असा चकवीन याला ४८
औरंगजेब जरि हा ह्मणवी स्वतांतें
'धूर्तांत धूर्त' तरि मी करिं तुच्छ यातें
मतीं करी अटक हा ! ! नच यास ठावा
राजा शिवाजि अथवा न मराठि कावा" ४९
ऐसें वदून मनिं योजुनि युक्ति खाशी
तो पाठवी स्वजन ते सगळे स्वदेशीं
दावी शिवाजि विनयें यवनां भलाई
धाडी अमीर उमराव जनां मिठाई ५०
"पेट्यांत काय?" ह्मणुनी करितां तपास
मेवा बघून वदती नच बंध यास
जाती असे दिन कितीक, नियुक्त लोकां
वाटे मनीं न लवही कसलीहि शंका ५१
एके दिनीं मग शिवाजि सशस्त्र झाला
पेटारियांत सहपुत्र बसोनि गेला
मागें हिरोजि निजला बहु काल मंचीं
कीं स्वामिभक्त करितो परवा जिवाची ५२
सर्वत्र शांत दिसतें बघुं आज काय
आहे स्थिती ह्मणुनि जों अधिकारि जाय
तों त्या कळे नृपति फार असे अजारी
ऐकून तो यवन दाखवि दुःख भारी ५३

कांहीं निमित्त करुनी मग एक एक
जाती निघून उरले न मराठि लोक
आणावयास नृपतीप्रत औषधाला
दिल्लींतुनी मग हिरोजिहि पार झाला १४

जों कोतवाल बघण्यास नृपास जाई
तों स्थान निर्जन विलोकुनि थक्क होई
गेली निघून मुखिची सगळीहि कांती
गेलें निघून बळ चित्तिं भरेच भीती १५

तें कोतवाल मग तो यवनाधिपाला
सांगे शिवाजि बघतां बघतांच गेला
होता पलंगि निजला मग गुप्त झाला
कीं अंबरांत शिरला न कळे अह्मांला १६

तों बादशाह अतिधूर्त हि आयकून
मानी पुरींतच शिवाजि असे दडून
झाडून सर्व सदनें यवनेश शोधी
तत्रापि काय गवसे शिव तो यशोधी १७

भांबावला अलमगीर शिवा धराया
चारी दिशांस दवडी निज सैन्य वाया
येईल मारिल शिवाजि अशीच धास्ती
घेई, सशस्त्र बसला निजला न रातीं १८

## शार्दूलविक्रीडित.

दिल्ली कंपित होय सर्व जिरली दिल्लीश्वराची रग
सारे म्लेच्छ मनामधें चरकले आश्चर्य मानी जग

हिंदू बुद्धिविशारद प्रबळ हा, सिद्धांत झाला निका
दिल्लींतून शिवाजि जाय तइं ह्या गाती कथा बायका ५९
बैरागी अथवा फकीरहि कधीं केव्हां तडी तापडी
केव्हां ब्राह्मणरूप घेउनि धरी खांद्यावरी कावडी
ऐसा तो बहुरूपधारि नटुनी तीर्थांस संसेवुनी
आला श्रीशिवराय रायगडिं तैं आनंद झाला जनीं ६०

### वसंततिलकावृत्त.

दिल्लीशगर्वहरणाख्य रसाळ काव्य
अर्पी सदाशिव मुदें सुजनास नव्य
यामाजि अन्य गुण ते नसले तथापी
सेवाच ही शिवकथामृतपूर्ण वापी ६१

समाप्त.

सदाशिव मोरेश्वर भिडे.

---

## निर्धन झालेल्या श्रीमानाचें आपल्या स्त्रियेजवळ संभाषण.

एके दिनीं तो अपुल्या सखीला
विचार सांगे मनिं योजिलेला
बोले प्रिये.गे मज दुःख वाटे
हें सांगतांना मम कंठ दाटे

गेले ते दिन काळ तोहि सरला पुण्येंहि गेलीं लया
होतों राहत शांतचित्त जइं गे आनंद मानोनियां
दुर्दैवें अजि घेरिलें नच कुठें थारा दिसे आजला
प्रारब्धें हिन जाहलों ह्मणुनियां दारिद्र्य आलें मला १
होतें द्रव्यहि सर्व गोष्टि सुखद स्वांतासि चिंता न या
तेव्हां आप्त स्वकीय बंधु भगिनी मित्रादि येऊनियां
गे मत्संगति राहिले निशिदिनीं सौख्यादिका भोगिलें
झाले संप्रति तेहि दूर बघ जों द्रव्यें मला सोडिलें २
सरतांच वित्त गेलें वैभव सारेंच जाण सोडून
जणु अधनकोचि ह्मणती संगति फळ काय तीहि जोडून ३
आप्त स्नेही सेवक दासी दासादि सर्व परिजन ते
सोडून आज गेले शुष्क तरूलागिं जेविं खगगण ते ५
शुष्काम्रवृक्ष किंवा शुष्क सराला अगंध सुमनाला
सोडून जेविं जाती पिक हंस भ्रमर तेविं हे याला ६
किंवा भ्रष्ट नृपाला दग्ध वनाला दरिद्रि पुरुषाला
सोडून जेविं जाती मंत्री मृग वारयोषिता बाला ७
होतों सदा सुखनदींत सुखोपभोग
भोगीत गे परि पहा सुटला न भोग
वाटे मना सुखनदी जणु भेटते कीं
दुःखाब्धिळा ह्मणुन दुःखच होय शेखीं ८
ज्या आपुल्या प्रियतमे सदनांगणांत
वाजी सुरोज मृग आणि ससे निवांत

होते सुखेंकरुन क्रीडत आज तुच्छ
श्वानादि तेथ पशु लोळति गे यथेच्छ ९
ज्या आपुल्या प्रियतमे सदनांगणीं या
ते हंस सारस मयूर हि कोकिळा त्या
मैना चकोर शुक कोहिळ पक्षि होते
ते जावुनी उडति वायस आज तेथें १०
ज्या देवडीवरि सदा गरदी जनांची
दासी व दास अणि गे इतरा जनाची
जी होतसे अति तिथें बघ काय झालें
मूषादि तुच्छ जिव जंतुस धाम झालें ११
होतें जईं सधन सद्म सखे तदा गे
हें आपणा अति सुखप्रद जाण लागे
जातांचि सर्व धन आज भयाण वाटे
हें बोंचतेंच अपणा जणु तीक्ष्ण कांटे १२
ज्या मी प्रिये निज करें मन याचकांचें
संतुष्ट तुष्ट मन ठेवुनियां सुवाचें
केलें पहा सुमुखि संप्रति तेंच आलें
गे याचकत्व मजलागिं कसें जहालें १३
ज्या आपुल्या प्रियतमे सदनीं सदा या
झाले द्विजोत्तमहि तोषित सेवुनीया
मिष्टान्न अन्न न मिळे आजि तेथ कांते
गे आपणांस मग कोठुन त्या जनातें १४

आले कितीक तरि याचक जे गृहीं या
गेले सदा स्वमनिं तुष्टचि होउनीयां
पाहूनि निर्धनहि संप्रति या गृहातें
ढुंकोनि कोणि न बघे सजणे सुकांते १५

जी तूं भर्जरि शालुवांचुन सखे नाहीं कधीं नेसली
तैसी कंचुकि अंजिरीविण पहा नाहीं कधीं घातली
हेमाच्या सुघटीतशा नचि अलंकाराविणा राहिली
ती तूं आजि अभूषणा कुवसना ऐशी सये जाहली १६

जे होते मज पूज्य मानित सदा मद्वाक्य ऐकोनियां
माना डोलविल्या सभांगणिं सदा तल्लीन होऊनियां
ज्यांनीं पंडित मी बहुश्रुतहि मी वेत्ता गुणाचा हि गे
मानावें मजला कुलीन अजि ते धिक्कारिती सर्व गे १७

जयापाशीं आहे धन कुलिन तो तोच सुधनी
सुवक्ता तो तोची बहुगुणिहि तो पंडित जनीं
प्रिये लोकीं भोगी सतत तरि धन्यत्व नर तो
धनाचे सांगातीं गुण वसति हा नेम दिसतो १८

“ निर्द्रव्या पुरुषा न बंधु भजती त्या मान कोठें नसे
जातां तो धनिच्या गृहा कुशलही त्याला न कोणी पुसे
थोरांपासुन दूर दूर फिरणें लाजोन वस्त्राविणें
वाटे निर्धनता महानरक हा हा धिक् तयाचें जिणें ” १९

खचित हेंचि ममानुभवास ये
वचन सत्य असे कविचें प्रिये
मरण निर्धनतेपरतें बरें
शतगुणें मज तें गमतें खरें २०

मला वाटे खावें विष मरुन जावें झडकरी
उडी ह्या रेवेच्या सलिलिं अथवा घ्याविच पुरीं
सुशस्त्रें कापूनी स्वशिर चुकवावीं सकल गे
सखे दारिद्र्याचीं मरणसम दुःखें हि सुभगे २१

दुःखें पुढें अधिक कंठ भरोनि आला
त्या कारणें न वदवे निज हेतु त्याला
तो श्वास दीर्घतर सोडुन स्तब्ध झाला
तन्नेत्रिं थोर मग अश्रुझरा उदेला २२

नारायण गणेश शिरसाळकर.

# काव्यरत्नावली.

## अंक २ रा

## सुखशोधन

( विषयविवेचन भाग दुसरा. )

[ मालिनी वृत्त. ]

नभ पवन पवीकीं अग्नि पानीय भूमी
अगणित रवि तारे चंद्रमा ऊर्ध्वगामी
नर पशु लघु जंतू वृक्ष पुष्पादि भार
तृण गिरि सकलांहीं सृष्टि होवे अपार १
लघु तृण उगवे तों त्यास कर्तव्यतेचें
प्रकृति वळण देते थोरिच्या साम्यतेचें
सहजचि नजरेला येतसे हें तरी कां ?
नर, मतिसद्विचारें — घे चुकीचा वरीकां २
प्रथम बघु तृणाच्या मुख्य कर्तव्यतेस
हरित वसन ज्याचें घेउनी सौम्यतेस
अवजड अवनीला रूप दे शोभनाचें
सुखद सुहृदरूपें ज्यावरी मोर नाचे ३
बघुनि नयन त्यांचें अंतरीं होति गार
विसरुनि भवबाधा चित्त हो शांति सार

वनचर पशु पक्ष्यां जीवना तेंच द्वार
किति तरि भगवंतें त्यास केलें उदार ४

हंसत मुख धरेला ठेवितें तें मलापें
अवचित उपजोनी वाढ घे अल्प आपें
नमन करि किती तें नम्रतेच्या प्रभेनें
कटु शर पवनाचे साहुनी गंधवेने ५

बळकट तृण नोहे दृष्टिमाजी कदापी
परि लव वळणानें आणितें वांक चापी
मदभरित गजातें घट्ट बांधोनि ठाकी
गजमद चट सारा मावळो धाकटांकीं ६

लघु तृण गमतें तें सत्य कर्तव्यतेस
करुनि सहज पावे साधुच्या योग्यतेस
दृढतर मनुजानें घेतल्या निश्चयास
समय न मग लागे साध्य व्हाया जयास ७

भवजलधि तराया देह हो नाव सान
तिजवरि मन बैसे नाविकाच्या समान
हितकर पथ त्याला कोणता तो कळेना
स्थिर नसुनि कदा तें जागचेंही हलेना ८

सुमति कुमति दोघी चाळकत्वास घेती
निज निज पथिं आशासूत्र बांधोनि देती
कुमति निज पथां दे वक्रता नागमोडी
भ्रम हरण कराया मोहपाशास सोडी ९

सुमति, पथ वदे जो घ्यावयाला मनास
कठिण बहु गमे तो साधण्या कांचनास

अवघड गिरि ऐसा उग्र भासे चढाया
शिखरिं सुख वसे "त्या" सांगते धी "धरा या" १०
सुमतिं धृत पथाची उग्रता फार वाटे
परि मग, वळणानें घे तरी सौख्य साठे
मग आधि पडती ते बोंचती जेंवि कांटे
परि उदवि [1]रवीनें, त्याहि तें[2] दुःख आटे ११
कुमति, नयनपार्वे दाविते मार्ग ध्याया
सुखद सहज भासे पाय धाया वधाया
श्रवणहि बहु होती रंग ऐकोनि शोभा
मनिं विलगुन बैसे पूर्ण त्याचीच आभा १२
सतत सुखि रमाया पाहतें चित्त भावें
जरि भय धरि गाढें, तें तरी वेध धावे
'प्रिय विषय करीं' — त्या वाटतें की 'रमे तें[3]'
अणिक वश असे तें सर्व कालीं रमेतें १३
परि बल नसतें त्या एकट्याला धजाया
अवगत हि नसे त्या मार्ग कोठेंच जाया
म्हणुनि धरि सहाय्या स्पर्श सर्वत्र गामी
उघडुनि नव द्वारें योजितें त्यास हा मी १४
श्रवण नयन नासा त्वग्रसास्वाद पांच
अवगत करिती हे अर्थ एकैक सांच
प्रतिनिधि सहचारी स्पर्श हा त्यांज संगें
धृति धरुनि वसे तो रावतो [5]तो निजांगें १५

---

१ त्याच्या योगानें २ तसें ३ सुख ४ लक्ष्मीला ५ मनाला.
६ इंद्रियें

विषयगुण, धृतीनें[1] घेति ओढोनि, कर्ण
नयन बघुनि घेती पीत कैसें सुवर्ण
कटु मधु रसना हे दाविते धर्म त्याचे
पवनगत रजाचा नासिकीं गंध सांचे १६
सित कुसुम मधूची गोडि येतांचि कानीं
हृदयगत मनाला स्पर्श आधीं बखानी[3]
तदुपरि मन पाहे जावयाला त्वरेनें
म्हणुनि वळवि देहा स्फूर्ति शक्तिप्रभेनें १७
गतिस धरुनि जाती पाय पुष्पस्थलास
नयन, अभय, मार्गी दाखवीती, बलास
अभय गुण सहाय्यें देह जातांचि तेथें
प्रमुख नयन होती सर्वथा जेथ तेथें १८
कर पद रसना हीं साह्य एकैक कामीं
करिति बहु मनातें गुंतवायास कामीं
नयन बघति आधीं पुष्परंगाकृतीस
तरुहरित लतादी वर्ग त्याच्या कृतीस १९
मृदुकठिणपणातें पाहती हस्त बोटीं
अवयव कृति ऐशी आणिते हास्य पोटीं
परि कृति रसनेची आझुनी गुप्त राहे
असित परवशत्वें ती बहू दुःख साहे २०
कर, मधुर रसातें काढ काढोनि देती
मुखगत रसनेला—तेधवां हर्ष दे ती[4]

---

१ धारणा शक्तीनें २ एकत्र होऊन बसतो ३ वर्णन करितो
४ ती ( रसना ) देते

विकसित मन हर्षे होवसे पुष्प जैसें
इतर विषय सारे जाणिजे लोकिं ऐसे २१

सुखद विषय जो कां वाटतो या मनाला
कुमति सुमतिच्या तो[1] ठेवितो जल्पनाला
धृतमतिबळ जातां हार– तो[1] नाश पावे
विकळित मन तेव्हां देहपावास धांवे २२

कुमति, विषयसौख्यां लांब लांबोन दावी
परि निकट बहू तीं[2] दृष्टिं येतात भावी[3]
चहुंकडुनि तयांतें वेष्टितो द्रव्य दोर
जवळ करिं धराया वाटुमी जाय दूर २३

गुण दल करिं वाया कल्पनांचे तरंग
उठवि विरवि जेवीं सागरीं वीचि रंग
सुमति कुमति यांच्या जल्पनेचे सुरंग
उडवि फुटावि त्यांहीं होतसे भंग रंग २४.

उभयमति मधोनी एक पावे जयास
मन वरुनि तिला वे जे डगेना भयास
विजसह मग देहा चालवी वेग वेगें
लव गुण करिं येतां ग्रस्त हो अन्य रोगें[4] २५

सुमति गृहिणि झाल्या दुर्मती वक्र पाहे
खल छल उगवाया बीजसें पेरिताहे
वरि वरि उपचारें प्रेम दावी हिताचा
अनुरवि परि अंर्ती क्रौर्य योजोनि टांचा २६

---

१ विषय २ विषय सुखें ३ पुढें येणारी ४ दुःख–काळजी वगैरे.

जनक जननि बंधू मित्र हे शत्रु ऐसे
अशन वसन रूपें घालवायास पैसे
कुमति सहज चित्ता भासवी जल्पनेनें
भ्रमगिं मन पडोनी जावसे कल्पनेनें १७

सति सुमतिसहाय्यें युक्ति योजोनि चित्त
तनु झिजवुनि आणी अल्प कीं फार वित्त
सुख सुलभ कराया तें परी त्या मिळेना
कुमति भरवशाचा अंतही त्या कळेना १८

परि कुमति धराया दाविते मार्ग दोन
सुखकर जमवाया फारसे हेम होन
" प्रथम निज जनांला दूर हांकोनि देणें
" हितकर दुसरा कीं वक्रता कांहिं घेणें " १९

सुखद दिसति चित्ता मार्ग हे दोन्हि ऱ्हासे
पडुनि कुमति कंठीं आंतल्या आंत हांसे
सुमति विकल होते वृत्ति त्याची बघोनी
इहपरगति दावी व्यर्थ दोन्हीं मघोनी ३०

त्यजि परि मन साऱ्या योग्य कर्तव्यतेस
निरखुनि कुमतीचा पाहि तें केस केस
अचुक मुख घृणेचें दृष्टि ये खांकरीत
वळ वळुनि बघे जें लोटण्या त्या दरींत ३१

दृढतर कवळाया ती सरे त्याजपाशीं
पडुनि मग गळां ती बांधि त्या प्रेमपाशीं
अवयवगतिचेंही सूत्र हातांत घेते
भृकुटि मुख कपाळा वांकडा पीळ देते ३२

विरस नयन होती भूलता वक्र चाप
मुखछबि कठिणत्वें ओतवे रक्त आप
स्वजन अरि सुखाचे — त्यांवरी हे तयारी
परि सुतललनेच्या संगवीं शांत यारी २३

निज अरि गमले ते झालियां दूर सारे
तनुसह ममतेचे लोट घेती पसारे
सुख मुख परि कैसें चुंबण्या वें मिळे ना
हृदयगत दुराशा जों गळ्याची घळे ना २४

सुमति[१]सखि घृणा ही काढवे वक्र डोळे
दुरित कृति बघोनी, आंतल्या आंत पोळे
मन बहु विकलत्वें तप्त हो सौख्य कैंचें
विकत न मिळतें वें रौप्य कीं ताम्र पैचें २५

तरिहि कुमति—संगें भावि आशा सुखाची
कुसुमित फुल—झाडी तेविं बैसोनि खांची
कर फिरवुनि चित्ता हांक मारी रहस्यें
फिरुनि मन बघे तों येतसे ती सुहास्यें २६

विगळित मन आतां घे हुशारी अपार
कनक वसन शोभा पाहुनी फार फार
उभय मति[२] रहस्यें प्रेरणा आर्जवाची
करुनि ह्मणति " धीरें येत जा नित्य वाचीं " २७

अनुचर लघु ऐसा रोंवण्या प्रेमवृक्ष
जनमनिं रस सारा शोषुनी होत रुक्ष

१ सुखाची आशा २ सुमति व कुमति ३ आर्जवाला

तरु[1] सुमनफलांहीं युक्त व्हाया बघे तों
क्षणिक सुखभराचा लोट चित्तांत येतो ३८
कुमति हळुंच सांगे वक्रता घ्यावयास
" हितकर सुख व्हाया येइजेना भयास "
सुमति सरळ मार्गीं अल्प भीती न ठेवी
परि मनवनुताकं दुर्मतिप्रांतिं खेवी ३९
कनक कठिण या या वें रमे भीति संगें
त्यजुनि करपुटांतें जाय तें चित्त भंगे
स्थळ अभय मिळेना त्यास रक्षावयास
म्हणुनि बळकटीनें तीव्रता ये भयास ४०
अगणित विषयांच्या पंक्ति मागोनि पंक्ती
पसरति वर खालीं घ्यावया सानुरक्ती
मन फिरवि शरीरा गांठुनी त्यां धराया
सरुनि पुढ पुढें ते बोलती " घ्या ! धरा ! या !" ४१
श्रवण नयन नासा पादहस्तादिकांचे,
विषय असति सारे वेगळाले, सुखाचे
प्रति विषय–विलासी माधुरी घे हृदांत
कमलिं मधु वसे कीं शांति जेवीं विदांतें[2] ४२
कमलविषय पांचां इंद्रियांतें मधूचा
सुखद रस समर्पी तोच गोळा अफूचा
बनुनि–मनतरंगीं गुंग हो त्याज संगें
मद उतरुनि जातां व्यग्रतेनें दुभंगे ४३

---

१ प्रेमवृक्ष २ विद्वान् लोकांमध्यें

लसित कमल आभा सौख्य हें नेत्रयोगें
शिरुनि, मन तयाचें रूप घे आणि भोगे
मृदुपणसुख हस्तस्पर्शनें अंतरांत
स्फुरुनि मृदुपणाची आकृती घे भरांत ४४

कमलरजसुगंधी घ्राणिं गंध स्वरूपें
सुखभरित मनातें देति गन्धस्व रूपें
मधु रस, रसनेचें द्वार पावोनि आंत
कमलरससुधेचें रूप घेतो हृदांत ४५

इतिविधि मन होतें सौख्य-डोहीं तरंग
विषयसुखिं रमाया आणि न्हायास दंग
घडि घडि बदले तें रंगही त्याजसंगें
जड.विवडे कराडी थापडे आणि भंगे ४६

विषय मधु रसाची गोडि अत्यन्त अल्प
असुनि आमित वाटे भोगण्या कल्प कल्प
रुचि गति रसनेची टाकिते तीस मागें
वळणिं वरुनि चित्ता सारिते अंतिं मागें ४७

विषयसुखविलासीं गुंग होतां मनानें
अवयवगति कुंठे तों पुढें येइ नाणें
सरसरुनि पुढें तें बाह्यदेशीं प्रभेस
विखरुनि करि मागें इंद्रजाली सभेस ४८

वरचढ सदनाच्या उंच विस्तीर्ण गाभा
तदुपरि कलशाची फांकते दिव्य आभा

---

१ तृतिया विभक्ति २ कर्म ३ कठिण–बिकट

मधुन मधुन खोल्या त्यांवरी उंच माड्या
निशितमहि हराया लोंबती दीप हांड्या ९

वनुस चरण नेती रंजना वाडग्यांत
हिंडुनि तिकडे जैं अश्वगामी बग्यांत
नयन बघवि शोभा चित्र रंगी बिरंगी
मन, सुख वरुं पाहे आयतें अंतरंगीं १०

परि तनु विकलत्वें होवसे लाहि लाही
मृदु कुसुमित शेजे घ्यावयालागिं पाही
विपुल कुसुममाला सौरभी पद्मजाती
श्रम हरण कराया पैस शेजेंव जाती ११

वरिहि सुख कसें तें चित्तिं होना पुरेसें
श्रवण ह्मणति ऐको गान गोडी सुवेसें
कर कठिण कुचांच्या मर्दनाची अपेक्षा
करिति मनहि त्यांची होउं देना उपेक्षा १२

मग निज रसनेचा स्वाद दुःस्वाद वाढे
मधुर तिखट नाना व्यंजनें आणि काढे
दिन दिन रसनेचा स्वाद ते दूर नेती
विषयसुख खरेंसें वाटुनी होय नेती[1] १३

अजड जड पशूसे पायु आणि उपस्थ
परि विषय सुखाचे अग्रणी वे गृहस्थ
अत कठिण तयांचे स्तंभ आणि प्रवाह
मन विकल कराया ठोकती तेच बाह[2] १४

---

१ असें नाहीं २ भुजा

सुहृदकमलवक्त्रा चारुहास्या लतेशीं
सहगमन कराया हो उपस्थ स्वदेशीं
भ्रमणि धरि मनाला क्षार लावी तनूला
विगलित बल होतां अल्पशा घेइ बूलें ५१

नव विवरिं गृहाचा तो असे कोशपाळ
तनुधृत सुबळाचा ही महा तो नृपाळ
जरि करि सुविपाकी दानहस्तें—यशाचा
तरु तरि फळभारें स्वाद देईल साचा ५६

करि नृपति अपात्रीं दान त्यातें विपत्ती
बळकट धरि दंतीं सिंह जैं मत्त हत्ती
विकृति तनुस गांठे व्यर्थ वीर्यप्रवाहें
अवयव विकलत्वें नेत्रिंही अश्रु वाहे ५७

नयन शिरति कोशीं शीर्ष कांपे थरारीं
श्रवण वसति कोठें मारुनीया भरारी
न कळत लवलाहें दंत देती जबाब
पिकुनि शिर शिखा हो श्वेत ही अल्प बाब ५८

विषय विनत होती एकमेकांस दोघे
पुरुषयुवति—जेवीं चुंबकीं लोह ओघें
पुरुष पुरुष किंवा कामिनी कामिनीही
सहित परहिताच्या रज्जुनें बद्ध कांहीं ५९

द्वय विषय पहाती एकमेकां वराया
तरि भृकुटिधनू हो वक्र, चित्ता हराया

---

१ लहानशा २ वस्त्र ३ नऊ ४ द्वारांचें ५ घर [ शरीर ]

मग नयनशराचा वेध लागे हृदला
विषय परवशत्वें बद्ध होतो सदाही १०

मन विषयमदानें गुंग झाल्यावरीच
बळकटि अरिसंघा[१] येत चाले बरीच
प्रथम अमल गाढा काम याचा मनाला
धरुनि विषयपूरें वाहतो जेविं नाला ११

युवतिगृहधनाची थोरवी वैभवाची
विपुल तनुसुखाची कामना येत वाचीं
मधु सरस रसाची वस्त्रपात्रादिकांची
शिरुनि हृदयरंध्रीं खोंचते टांच टांची १२

झिडकुनि पवनाला आणि विद्युल्लतेला
नयन न लवती वो इच्छिलेल्या लवेला
प्रथम मन पहावें कल्पनेच्या स्वनेत्रें
मग दृढ मिठि घाली कंठिं तैशाच गात्रें १३

घट घट रसनेचे पुष्पपीयूष चाखे
करविरहित हस्तें भीतिबाधेस हांके
मधुकर रव घूं घूं स्वस्थ पीतात कर्णी
घडि घडि तनुवल्कीं मावती येति वर्णी * १४

लक्ष्मण गणेश नावेलकर.

---

* या पुढील राहिलेल्या कविता पुढच्या अंकांत येऊन हें प्रकरण पुरें होईल. १ शत्रुसमुदाय [ कामक्रोधादि ]

# आईची ममता.

श्लोक.

जे बोलती "प्रेम सयास जाते"
ते जोडिती पातक थोर वाटे.
विलोल, निःसार दुजे विकार.
प्राणासवें ते पडतात गार १
महत्पदेच्छा गगनीं न राहे.
पातालगर्भीं धनलोभ नोहे.
विकार हे ऐहिक,—जन्म घेती
तेथेंच अस्वास समूळ जाती. २
परन्तु माया अविनाशी आहे.
प्रदीप्त तत्कील सदैव राहे.
पवित्रता मूर्तिच भासते ते;
येते नभांतून, नभांत जाते. ३
येतो जगीं त्रास तिच्या कपाळा
होते अशी गोष्ट अनेक वेळां.
मांडी तियेचा छळवाद कोणी;
कापी तिची मान कुणी कचांनीं. ४
भूमीवरी ती उतरे कसास;
तेव्हां तिचा पूर्ण नभांत वास.
होतो तिचा पेर जगीं श्रमानें;
मिळे फळास्वाद नभांत मानें. ५
दैवें अहा! पाडस जें लहान
मातेस, जातें गगनीं, त्यजून;

तें भेटतांची गगनीं स्वमाये
आनन्द तिचा गगनीं न माये, ६

तें वत्स जातां गगनीं त्यजून,
जें दुःख झालें जननीस जाण,
जे ढाळिले अश्रु तिनें अनन्त,
त्यांची नसे फेड तया सुखांत ! ७

कवि.

# सुभाषित.

श्लोक.

कोठें भिक्षु ? बलिगृहीं, पशुपती, तो गोकुलीं का नसे ?
मुग्धे ! पन्नगभूष, तो तदुपरी, निद्रिस्त पाहे असें
आर्ये ! सोडिं, विषाद सर्व चपले, मी ना प्रकृत्याचला
लक्ष्मीपर्वतजासुवाद सकला, रक्षो असा चांगला १

विश्वामित्रपराशरप्रभृति जे, वातांबुपर्णाशनी
तेही, स्त्रीमुखपद्म रम्य बघुनी; गेले अहा मोहुनी
शाल्यन्ना, दधिदुग्ध आज्ययुत जें, जे भक्षिती आदरें
त्यांचा इंद्रियबंध, होय तरि, हा विंध्याद्रि अब्धीं तरे . २

व्यजनमरुत हा दे, वृद्धि निश्वासवाता
मलयजरस, धाराबाष्प हा वाढवीता
कुसुमशयन देतें, साह्य कामायुधातें
मग मदनव्यथा ती केविं सोडील मातें ३

मेघा सतत वाहती, तरि, न जीवन प्राशिती
वसें लवति, वृक्षही फलभरें न ते भक्षिती
स्वयें जलद वृष्टिनें सृजित सस्य ना सेविती
जगीं सकल साधु ते, परहितार्थची जन्मती ४

धरीं न, लव मानसीं स्वगुरुताभिमाना जगीं
नसे, कवणही लघू; तवसमान सिंधो! जगीं
जरी असासि, विश्रुतप्रकट जीवन क्षारते
म्हणोनि, इतरत्र संग्रहिति, साच पोतस्थ ते ५

गमतो बहु भारती! अहा
मजला तव कोष चित्र हा
धरि संचयते, क्षयत्व तो—
करितां व्यय वृद्धि पावतो ६

तृषा धरेची. शमवीतसे जो
तो गाजतो अंबुद साच गाजो
स्वनीरपानें सुखवी न लोकां
क्षाराब्धि हा निष्फल गर्जतो का ७

## आर्या.

कृष्णा तव कचसंहति, अंबुजनयने! असे तवाधर तो
शोण; सुरतरंगिणि तूं मग तापी तव वियोग केलिं न तो ८
अखिल विहंगम चरती, स्वच्छन्दें मात्र लाभले वा हें—
पंजरबन्धन तूतें; कीरा! तव मधुर वाणिचें फल हें ९
रुचिरस्वरवर्णपदा, रसभाववती जगन्मनोहरणी
तरुणी कां ती? छे, छे, नोहे सुरसाल बाणकविवाणी १०

विष्णु बाबाजीराव कुलकर्णी.

# मध्यरात्र.

श्लोक.

सामसूम जिकडे तिकडे गमे । स्वच्छ पाहुन नभामत तो रमे
तारका चमकती नभ–मंडळीं । कांति राजपथिं त्यांचि फांकली १
पारिजात फुलले सुर–काननीं । हीं फुलें विलसती गमलें मनीं
कीं हिरेजडित सुंदर सुन्दरी । भूषणें विमल–कांति निशा धरी २
शांतता त्रिभुवनास लाभली । प्राणिमात्र निजले निजस्थलीं
पाहुनी कृपण काढि निर्भय । आपुला गगन रत्न–संचय ३
उंचसा गगन–मंडप थोर हा । बांधुनी रुचिर आवडिनें पहा
रात पाजळुन दीपक तारका । वाट पाहि पतिची अति उत्सुका ४
दोन बाजुस उभे अचल–स्थिति । राक्षसांसम भयंकर दीसती
राज-मार्ग गत वस्तुंस पाहती । हर्म्य कान जणु देउन ऐकती ५
जे दिनीं गजबजाट करी महा । शांत या समयिं पूर्ण दिसे अहा!
अंधकार–जलधी पसरे वरी । कीं बुडे सकल सृष्टि तदंतरीं ६
श्वान कारण नसून हि भुंकती । भीरु मार्ग–गत लोक चपापती
शब्द जो करितसे पद आपुलें । तो भयें श्रवुन अंग थरारलें ७
ज्यांस नाहिं घरदार असे जन । दीन अंध पडतात पथांतुन
थंडिनें प्रखर विंव्हळ जाहलीं इंद्रियें, उदरिं भूक धडाकली ८
व्यर्थ हारविति यौवन ही धन । जातसे वय झरून दिनोदिन
तें गणून न मदांध सुखी जन । खेळतात गणिका–सदनांतुन ९
सारमाडळ सतारहि ताउस । वाजतात खुलतो पहिला रस
गोड वार–युवती–गृहिं गायन । चालले परिसतात पथीं जन १०

वासुदेव वामन शास्त्री खरे.

# काव्यरत्नावली.

## अंक ३ रा

## श्रीमत्प्रतापसिंह

### भाग १ ला.

[ अकबरानें चितोडची जाळपोळ केली व तेथील तीस हजार बायकामुलांचा क्रूरपणानें वध केल्यावर उदेसिंग महाराणा पळाला. त्यानें उदेसिंग वसविलें तो तेथेंच वसाच साधारण हालांत मेला. मरतांना त्यानें राज्य आपल्या जयमल्ल नांवाच्या मुलास दिलें होतें. तथापि प्रताप खरा वारस होता, कारण प्रतापाच्या आईशीं जेव्हां उदेसिंगानें लग्न केलें, तेव्हां तिला तुझ्याच मुलास राज्य देईन, असें त्यानें वचन दिलें होतें. अकबराचा सूड घेण्याचा प्रतापाचा निश्चय होता एकंदरीत सिसोदिया कुळांत प्रतापसिंगाची कीर्ति फारच असून जोंपर्यंत राजस्थानांत स्वदेशाभिमानाचें यत्किंचित् तरी बीज कायम राहील तोंवर त्याचें नांव व त्याच्या मूर्तीची पूजा हीं कायम राहतील. मेवाडांत कोठेंही जा; तेथें प्रतापसिंगाच्या संबंधानें अमुक एक स्थळाची प्रतापसिंगाच्या म्हणून कोणत्या कृतीबद्दल महती नाहीं अशी रती एवढीही जागा सांपडणार नाहीं. जिकडे जावें तिकडे सर्व अरवली डोंगर व त्याच्या भोंवतालच्या प्रांतांत प्रतापसिंह.स्वातंत्र्य स्वदेशाभिमान या शब्दांचा प्रतिध्वनि अजून सारखा ऐकूं येतो कीं काय असा भास होतो. हळदीघाट हें स्थळ

वर महाभारतांतील कुरुक्षेत्रच होय प्रतापसिंगाचीं देशाभिमान व कुलाभिमान हीं व्रतें लोकोत्तर होतीं त्याच्यासारखें शौर्य राजस्थानच्या इतिहासांत दुसरें क्वचितच आढळेल. अशा वंदनीय पुरुषाचें चरित्र पुढील प्रसंगांत दिलें आहे.

आर्या.

गोविप्रतापशमन प्रतापसिंहास मान वांकविता
झाला अकबर राजा तद्विषयीं रुचति मानवां कविता १
गावे तद्गुण भावें, भावे चित्तास तत्कथा भारी.
बहु हिंदु, हिंदु-धर्महि त्याचा हो सर्वकाळ आभारी. २
मेवाडदेश सुटला होता बहुतेक हातचा; रानीं
प्राप्त रहाणें झालें वत्तातातें तदीय चारानीं ३
जोहार[2] चितोडाचा विसरा होय प्रसिद्ध भुवनांत
वत्तावाच्या वेळीं; पळे धरेचा तयिं प्रभु वनांत ४
तेथेंच झोपड्या मग कांहीं बांधून भूप राहतसे
निर्बल उदय जयाच्या पूर्वजि केलें स्वभूपरीं[3] हतसे ५
निर्बल केवळ नव्हता दुर्दैवी मात्र पूर्ण नरवर तो
पडतां प्रसंग दुर्धर काळोखी शाहणाहि नर वरितो ६

---

१ वेडेचार, भित्रेपणा वगैरे. २ निर्वाणीच्या वेळीं बायकांना जितेपणीं अग्नि देऊन प्रत्येक वीर मरेपर्यंत लढण्याचा प्रसंग; असा प्रसंग चितोडावर हा तिसरा होता— पहिला पद्मिनीसंबंधीं १३०३ इ० मध्यें. दुसरा प्रसंग १५३३ मध्यें बहादुरशहाची राणा विक्रमाजितावर स्वारी झाली तेव्हांचा. व तिसरा प्रसंग अकबरानें उदेसिंगावर आणलेला ह्मणजे प्रस्तुत काव्य. ३ आपल्या देशाच्या शत्रूस ४ राजा.

प्राणान्तीं उदयानें जगमल्ला[1] राज्यभार निरवीला
विस्मरणें न तयानें वर महिषीचों[2] स्वदत्त पुरवीला ७
वरिली प्रतापजननी उदयें तेव्हां " तुझ्याच पुत्रास
देईन राज्य " ऐसें वचन तयानें दिलें असे तीस ८

अभिषेकोत्सववार्ता जगमल्लाची जंव प्रतापानें
ऐकिलि, निराश हो मग; विदेशिं गाजूं ह्मणे प्रतापानें. ९

संकेत असा करुनी मनिं, अश्वारूढ होय तो तरुण
एका लोका सोडुन, जाऊं लागे दुज्या जसा अरुण १०

तों ती वार्ता कळली सर्वां, बरवा न हा ह्मणति शकुन
मूर्त प्रताप जातो सोडुन देशास आज हा ठकुन. ११
तत्तातदत्तवचनस्मरण असे त्यांत कांहिं सचिवांस,
उपदेशिलें तयांनीं जगमल्ला त्या प्रतापबन्धूस. १२
निजतातदत्तवचना आज्ञाधारक सुपुत्र तो मानी
मानी हानिंहि सोसुन सत्यन्यायास तो खरा मानी १३
राज्याभिषेक झाला झालें नैराश्यमकरसंक्रमण
चण्डप्रतापरविकरें[3] करुं लागति दश दिशांत संक्रमण १४
अभिषेकविधि उरकतां गेले मोदांत सर्व मृगयेला,
पुष्कळ पारध लाभे शुभ शकुनीं व्यर्थ शीण सरवीला १५

---

१ उदेसिंगाचा एक पुत्र २ अभिषिक्त राणी. ३ चंड—प्रताप—रवि—कर प्रखरः मोठा —प्रभाव, तेज- सूर्य—किरण, हस्त, हस्तक. ( यांत श्लेषानें उपमा आहे प्रतापसिंहरूपीसूर्याचे किरण ह्मणजे मेवाडांतील वीर पुरुष प्रखर आहे तेज ज्यांचें अशा सूर्यकिरणाप्रमाणें दशादिशांत चोहोंकडे विजयार्थ फिरूं लागले असा भाव.

उत्तम शकुन जहाले राजाला, तेविं राजपुरुषांला
ह्मणती मेवाडाला प्रताप देईल नित्य हर्षाला १६

मानी प्रताप मानी यवनांचा सूड आद्य कर्तव्य
निजजनकातें ज्यांनीं केलें स्वान्यायेपावकीं[१] हव्य १७

ज्यानें जोहाराची आणियली वेळ मच्चितोडाला
करपवुनी मत्तेजें काळें त्याच्या करीन तोंडाला १८

विंशतिसहस्र भरतां अन्यायाग्नींत होमिले ज्यानें
नमविन इतुका त्या कीं शापावें नाकिं[२] त्यास आजानें[३] १९

सार्भक सचिन्त शंकित दुःसहशोकान्धिधूमहतनमनां[४]
बाला तरुणी प्रौढा वृद्धा जो क्रूर धाडि यमसदना २०

मातृस्तन पीवि मुलें भीतीनें कांहिं पाठिशीं लवती
माता उदास चित्तीं कीं दिसतो फिरुन आज कुठिल पती २१

दिन मास वर्ष अथवा वर्षें कांहीं जया वया झालीं
क्रौर्यां वदीय ऐशीं दीन किती बालकें बळी पडलीं. २२

ऐसा जो स्त्रीबालकभक्षक राक्षस तया क्षमा नाहीं
कामाची, दंडाया त्या जातां पुरविल्या खमानाही २३

चाण्डाल ब्रह्माण्डीं जेथें जेथें दिसेल भेटेल
तेथें तेथें रडेविन जोंवरि तन्नेत्रवारि[५] आटेल. २४

पुनरपि सुवर्णखचिता चित्तोडनगरी करीन, नर खास
जरि मी, नच तरि जाइन आनंदें सर्वकाळ नरकास. २५

---

१ अन्याय–जुलूम–रूपी अग्निमध्यें हव्य–भाजण्यास योग्य केले, भाजले. २ स्वर्गामध्यें ३ बाबरानें. [ बाबर हा अकबराचा आजा. ] ४ सहन करण्यास कठिण अशा शोकानें अंध झालेल्या ५ त्याच्या डोळ्यांतील पाणी.

ऐशी प्रतापसिंहें केली चित्तीं मह्रा प्रतिज्ञा ते.
सत्यप्रतिज्ञ मेला गाति अजुनि तन्महांमवी ज्ञाते. २६
सोपें वदणें आहे, करणें दुर्घट परंतु त्यासम जें
वाचाळा काय परी रहस्य याचें कृतीसे त्या समजे २७
सारी लटपट खटपट लटकी पडते सदा धनाकरितां
शौर्याचें न चलेची एका द्रव्यें सहाय नाकरितां २८
नांवाचा लक्ष्मीश प्रताप झाला परी न लक्ष्मीला
कोशांत ठाव मुळिंही तातानें सर्व तो रिता केला २९
द्रव्यार्जनीस कांहीं न सुचे त्या युक्तिहा प्रसंग महा
ओढवला त्यावर हा बलापदेचा सुदुष्ट संगम हा ३०
सद्गुण सुशील यांचें नेणों न पटेच काय लक्ष्मीशीं ?
चंचल ती असुनीया वश, वेश्याचोरजारकुजनाशीं. ३१
प्रथम प्रतापसिंहें चितोड घ्यावें मनांत ठरविलें,
त्याचा विचार करण्या त्यानें निज वीर सर्व जमवीले. ३२
वीरां प्रताप बोले होतीं कीं आज आठशें वर्षें,
बाप्पा चितोडनगरीं स्थापिति गादीस थोर उत्कर्षें ३३

---

१ त्याच्या प्रतापास २ कार्यास ३ बल – सामर्थ्य – आपदा निर्धनता या दोहोंचा हा प्रतापांत झालेला संगम ह्मणजे योग सुदुष्ट अति बिकट होय. अंगांत सामर्थ्य तकवा हुकूम असून एखादें काम करण्यास उपसाधनें न मिळाल्यानें मनुष्याच्या मनाची कशी ओढताण होते हें प्रत्येकास माहित आहे. ४ बाप्पारावळ–सूर्यवंशी श्रीरामाचा वंशज यानें इ० सन ७२० मधें चितोडचें राज्य स्थापिलें तेव्हांपासून प्रताप ह्मणतो आज ८०० वर वर्षें होऊन गेलीं.

तेव्हांपासुन तें स्थल आतांपर्यन्त पूर्वजांनीं हो !
प्राणापरीस रक्षुनि त्याची ही आज धूळधाणी हो. ३४

ती क्षात्ररक्तवर्णा तुडवावी शुद्ध भूमि यवनांनीं
कां न क्षात्रांनीं मग करणें पोषाख सुंदर जनांनीं ३५

लाखों क्षात्रवरांनीं रक्षाया स्थान जें स्वदेशास
अर्पण केलें, आपण करुं द्यावा वास तेथ अन्यांस ? ३६

हें काय योग्य दिसतें समरीं न मरींतें नाश पावाया
जन्मों क्षत्रियवंशीं का या कायीं तरी जपा वायां ३७

पूर्वज ज्या पंथानें गेले आपण तया सुपन्थानें
जावें असें गमे मज, बोला, सर्वांस काय हें मानें ? ३८

आज्ञा प्रभुनीं करणें, मानाया दास सिद्ध आहेत.
जिकडे दृष्टि प्रभुची, माना या आमच्या पुढें होत. ३९

देह स्वामीचे हे सचित्त त्यांनीं स्ववित्त खरचावें,
वाटेल तसें; दुसरें आह्मां कांहीं न बोलणें ठावें. ४०

धन्य खरे पुरुष तुह्मी धन्य खरा देशही तसा हा हो
मी ही धन्यचि, धन्यचि नगरी ती जिस असा सुसुत लाहो ४१

---

१ क्षात्र –क्षत्रिय त्यांच्या रक्तानें न्हालेली [ कारण नुकताच जोहार होऊन अकबरानें क्रूरतेनें केलेल्या कत्तलींत जे रक्ताचे पाट वाहविले ते अजून कोरडे सुद्धां झाले नसतील असा भाव ] २ क्षत्रियांची ह्मणून व त्यांतही वीरांच्या रक्तसिंचनानें तीर्थभूमि झालेली. ३ महामारी वाखा ( वाख्यानें मरण्यास नव्हे तर समरीं – युद्धांत मरण्यासच क्षत्रियकुलांत जन्मों उत्पन्न झालों. ४ शरीरें.

जय एकलिंग[1] जय जय दुर्गे[2] ! अंबे स्वभक्तहेमागे[3] !
पायापाशीं नईं, दूर न ठेवीं; स्वभक्त हें मागे. ४२
घोष त्रिवार करुनी सांब शिवाचा, सभाविसर्जन हो.
न तुझीं विसर्जन परी सुभेचें या करा मनीं जन हो. ४३
यापरि केला स्वजनीं प्रतापसिंहें विचार परतोन,
घ्याया चितोड दुष्टा दुर्दैवा आवडेचि पर तो न ४४
थोडेच लोक त्याचे ऐसे होते, तयास इतरांचें
होय सहाय अपेक्षित कितले परि ते अरीस जन काचे ४५
जावु नु चितोड[4] अरिकरिं आजवरी ह्मणुन सर्व रजपूत,
झटले होते कितिदां, आज परी अरिस नचि मिळतात ४६
आपण तसेच सारे असतिल भूचे स्वकीय अभिमानी
भोळा सांब असे तो प्रताप चित्तांत सर्वदा मानी. ४७
परि हाय काय ठाउक उदारधीलों[5] जगांत हीनमती[6]
असती ऐसे कीं जे आनंदें शत्रुपदतलीं नमती. ४८
निज माताहत्यारी मित्र समजणार पूत असतील
सद्बीजास कसे हे निष्कपटा त्या विचार शिवतील. ४९
पूर्वांच्या इतिहासावरि त्यानें लक्ष देउनी स्वारी
केली चितोड घ्याया क्षणांत नमवूं ह्मणे मनीं स्वारी[8]. ५०

---

१ चितोडच्या राण्यांचे कुलस्वामी. २ चितोडची भवानी ३ स्वभक्त हेमागे – भक्तांचा कल्पतरू, भक्तमनोरथ पूर्ण करणारे ४ चितोडांत ५ उदार मनाच्याला पुष्कळांचें कल्याण पहाणाऱ्याला. ६ केवळ स्वार्थी, कोत्या बुद्धीचे ७ राजस्थानांत चितोडाकरितां इतर संस्थानिकही मरायास तयार असत हा पूर्वींचा इतिहास. ८ आपला शत्रू.

लिखितास मान देउन सर्वहि मिळतील आपणा समरीं
आमंत्रित राजे जन देतिल निज बन्धु केवि शत्रुकरीं. ६१
ब्रीदें न कोणी राखी सर्वहि होती अरीस उलट वश
येरते हताश तेव्हां वारुं शके कोण दैवकृत नाश ६२
भूप बिकानेराचा, अंबेराचा, प्रसिद्ध बुंदीचा;
तो मारवाड भूचा, सर्वहि हा मामला फितूरीचा. ६३
स्वातंत्र्याते गमवुन, नमवुन शत्रूस मस्तका वैरिते
परतन्त्रता सुखानें होतिल सन्मान्य काय भूवरि ते ६४
सागरजी नामें तद्बन्धुहि शत्रूस जाउनी मिळतो,
अमृत ह्मणोनी यापरि मूढ पुरुष पारतन्त्र्यविष गिळितो. ६५
मोठा प्रयत्नवादी प्रताप परि हा प्रकार फितुरीचा
कळतां खचुनि मनिं ह्मणे भाग्योदयकाल सत्य हा अरिचा ६६
प्रथम ग्रासीं ऐसा वीराच्या होय मक्षिकापात,
तेव्हां ह्मणे जहाला सर्वस्वी आज आपुला घात ६७
दावीन हात यवनां ही त्याची क्षण हुरूप मावळली,
परि नाहीं किंचित ही त्याची कर्तव्यभक्ति चावळली ६८
नाहीं यश तर नाहीं अयश परी मी स्वतंत्र राहीन
स्पर्शहि करूं न देइन कायेला या परा नरा हीन ६९

---

१ चितोडचें उच्चकुल व चितोडची पवित्र भूमी यवनांच्या हातीं लागू न देण्याचें व्रत. २ पडला [ निराशेनें ] ३ ताब्यांतील माल ४ वरिते — पतकरणारे [ परतंत्रता ] ५ नर करणी करे तो नरका नारा यण हो जाय असा हिमतीचा ६ यशाबांचून निराशेशींच झगडत ७ शर ण न जातां ( यवनांस ) राज्यनाश वगैरे सर्व तोटा साहूनही * शत्रूला

विश्वासस्तंभ अशा मात्र क्षात्रांस अपुल्या पदरीं
ठेवीन सर्व इतरां काळमुखीं मीच देइन स्वकरीं ६१
अरिवश[१] झाले नच ते भारतभूपुत्र तीस भार परी
ठार तयांना करुनी आधी मग करिन शस्त्रवाय परीं ६२
वारंवार असे तो काढी उद्गार कीं "कुऱ्हाडीचा
दांडाच काळ गोता" तोच क्रम या असे कुपुत्रांचा[२]. ६३
लखलाभ त्यास त्यांचा क्रम, कर्तव्यास आपणा मरणें,
सन्मार्ग पूर्वजांनीं जो दाखविला तयास अनुसरणें ६४
बाप्पा रावळवंशज नमला[३] यवनास डाग हा न मला
कालत्रयींहि लागो भिक्षेचाही प्रसंग जरि आला. ६५
ऐसा विचार करुनीं सागरगंभीर धीरमेरुगिरी[४],
लागे उद्योगातें[५] फिरुन जसा प्रथमताच यत्न करी. ६६
पहिला अनुभव चित्तीं टेवीना सर्व काळ काळजिनें
वागे कसास लावी अनुयायी सर्व तो प्रसंगानें ६७
कोण कुठें मित्र असे शत्रु कुठें कोण कोण असती ते;
निवडायास्तव त्यानें योजियले चार साव चारातें[६] ६८
सामुग्री काय कुठें, किती प्रमाणांत आपुली आहे;
याचीही गणना तो सूक्ष्म विचारें करूनिया पाहे. ६९
सर्व प्रजाजनातें गोळा करुनी तयांस सुस्थानीं
वसवी, ठसवी तन्मनिं प्रजाजना कीं स्वपुत्र मी मानी. ७०

---

१ शत्रूला फितूर २ वाईट पुत्रांचा अथवा या भूमीच्या पुत्रांचा ३ शरण गेला. ४ समुद्रासारखा खोल व स्थीर. मेरुपर्वताप्रमाणें धैर्य ज्याचें चळण्याचा असंभव ५ पराभव वगैरे मनांत न आणतां नवीन हुरूपानें प्रयत्नास लागला ६ दूतातें.

मैदान भाग सारा केला वैराण जाळपोळून,
खोऱ्या दऱ्यांत सारी देशाची वसति नीट वसवून. ७१

सर्व प्रदेश यापरि बनासबेरीस या नद्यामधिल
झाला भयाण भालू उलुकांचाही जयांत दुष्काळ. ७२

हें सर्व होत असतां आलीं कित्येक संकटें त्याला,
मानी तया न मानी; संकटकाळींच मान धैर्याला. ७३

पुरुषपरीक्षासाधन संकटकाळाविणा न हो दुसरें,
घर्षण घडतां अधिकचि बकुलसुमाचा सुगन्ध तो पसरे. ७४

सुकुमारता तशीच प्रसंगिं ज्या सहनशीलता असते;
त्यासाचि दिव्यशरीरी ह्मणगे विबुधांस सर्वदा रुचते. ७५

बहुसाल हाल सोसुन, कष्ट विपत्ती अनेक भोगून
सत्वा राखी त्याची पतिव्रताकीर्ति त्याचमागून. ७६

तन्मन रमवायातें कीर्ति सती नित्य गायना करिते,
आलाप तान तीचे ऐकुन जन होति तीस अनुसरते ७७

पर्वतगुहेंत त्याचा लौकिक गाजे, प्रतिध्वनी लोकीं
दुंदुभिसे दुमदुमती जों वों स्वातंत्र्यशब्द जन घोकी. ७८

तद्धैर्यमेरुवरची[1] स्वातंत्र्यसुधालताकुसुमगन्धें[2]
चौफेर राष्ट्रिं पसरुनि जो जो हुंगी तया करी धुंद. ७९

१ त्याच्या धैर्य रूप मेरूपर्वतावरील २ स्वातंत्र्य हेंच अमृताची वेल त्या वेलीच्या फुलांचा गंध –सुवास मोगलांच्या सहस्रावधि लोकांस दाद न देतां धीरानें आपल्या प्रजाजनासह स्वतंत्रतेंत दिवस कंठण्याची त्याची शैली पाहून त्याच्या पराक्रमाबद्दल सर्वांची –खातरी पटली व जो तो तोंडांत बोट घालूं लागला.

जाऊं शोधायाते कोठुन हा मधुर गन्ध ये पाहूं
ऐसें ह्मणुनी येवी येतां ह्मणती इथेंच कीं राहूं. ८०
कळतां स्वान्याय जसें तातातें दीन वत्स लाजावें,
लाजून क्षात्त वसें ह्मणति शरण आत्मवत्सला जावें. ८१
निरपेक्षे यत्न कर्त्या न; तरि कोणा मिळोत अनुयायी
जनहितकरमेघजलीं द्रवुनी पाषाणही बघा जाई. ८२
राणे चितोडभूचे स्वपदच्युत होउनी गतधवा ती
झाली यांची तिजला ' करीन सधवा ' अशी प्रतिज्ञा ती ८३
गेली न शेवटा जों अशीच तोंवर धरीन हा अन्य
पण त्याचा होता नर दुर्मिळ ऐसा त्रिलोकिं जो धन्य ८४
रौप्य–सुवर्ण–सुताटीं वर्ज्य करी भोजनादि; शयनास
वर्ज्य करी ही गादी, गवतावरि झोंप घेइ रात्रीस. ८५
दाढी न करायाची, न मिशी वरती कधीं वळायाची;
सुतक्याची वृत्ति अशी, ढळली केव्हांहि नाहिं रायाची. ८६
दुंदुभिवादन नच तें सैन्य समारंभि वा करायाचें,
ऐसे अशौचदर्शक नियम असति ते अनेक रायाचे. ८७
गहिंवरले महिवरले जन सारे ही श्रवून तद्वार्ता.
काय स्थिति ही त्या जो झटतो निज देशमुक्ततेकरितां ८८
दुर्ग कुमळमेराचा अभेद्य पाहून राजधानीचें
स्थान करी तेथें निज रक्षक ठेऊन पूर्ण बाणीचे. ८९

---

१ कळकळ बाळगणारा २ स्वार्थरहित, लोकांकरितां स्वराष्ट्रकरितां ३ लोकांच्या हितार्थ झटणाऱ्या पावसाच्या पाण्यानें अथवा लोकहितास झटणाऱ्या प्रताप रूपी मेघाच्या ( कीर्तिरूप ) जलानें. ४ दगड, दगडाप्रमाणें अरसिक व निष्ठुर मनाचा मनुष्य ५ प्रतापाची.

नगरातें वटबंदी करुनी, व्यापार सर्व चालविला;
जैसा चितोडिं तैसा जणु तेथींचाच येथ हालविला. ९०
सापत्न[1] बंधु त्याचा होता जयमल्ल एक तत्पुत्र
बनले होते त्याचे स्वदेशकार्यार्थ बाणिचे छात्र ९१
साळुंब्र्याचा ठाकुर चोंडावंशीय तत्सहायातें
आला ससैन्य वत्सह पडलें संकट मुखें सहायातें. ९२
आणिक देलवाडा इत्यादि अनेक सान ठाकूर
आले स्वेच्छेनें ते तच्छात्राखालतीं महावीर. ९३
यांतिल देलवाडा ठाकुर उजवा कर प्रतापाचा
गांभीर्य धैर्य साहस यांहीं जो आकर प्रतापाचा. ९४
करुनी उपक्रम असा विक्रमशाली प्रताप नेटानें,
वाढवि हळुहळु सीमा; वागवुनी लोक एक जूटानें. ९५
नित्य फिरे निज देशीं नाना वेशीं जणूं प्रवासीच
दक्ष सदा शोधाया कोणा अरिचा कसा घडे काच. ९६
परदेशीं मालाची मेवाडांतून वाट दिल्लीला
जाण्याची, त्यावरती टपे स्वतां तो सदा लुटायाला. ९७
बहुमोल माल त्यांतिल दिल्लीपतिचाच खुद्द सर्व असे,
यास्तव त्याच्या लुटिनें दीन जनांची मुळींच हानि नसे. ९८
लूट प्रतापसिंहें केली कित्येक वेळ त्यांत तया,
बहु धनलाभ जहाला गेला व्यापार सर्व तो विलया. ९९

---

१ सापत्न—याच्या पुत्रांचीं नांवें सांपडत नाहींत. २ समुद्र कांठीं.

# सन्मान. *

### श्लोक.

राष्ट्रें अन्य पुढें सरोनि चढती भाग्याचलाच्या शिरीं
आह्मी तों परतंत्र दीन असुनी बैसोनि राहों घरीं
रूढी नामक शृंखला जखडिती हातांस पायांस या
नेमी हिंदुजनास यास्तव विधी दासत्व भोगावया १
जें जें माझें सकलच असे चांगलें सर्व तें तें
ऐशी बुद्धी कधिं न धरिजे मानवें ज्ञानवंतें
ही बाबांची विहिर ह्मणुनी प्राशि पाणी हि खारें
तो या लोकीं धन यश जन–प्रीति पावे कसा रे २
शास्त्रें विद्या अनुपम कला प्राप्त होती तयाला
जो अज्ञान त्यजुनि हि करूं साहसा सज्ज झाला
आलस्यानें गृहिं करिति जे आग्रह–ग्रस्त वास
त्यांच्या चित्तीं कधिं हि न पडे ज्ञान–सूर्य–प्रकाश ३
शहाणपण सर्वही विधि कदा न एकास दे
अनेक गुण पावती वसति अन्य देशामधें
खरे चतुर आग्रह त्यजुनि घेति जें ग्राह्य तें
स्वकीय परकीयही मति नृतन्मनीं नांदते ४

---

* रा० गोपाळ गोविंद वाटवे एम्० डी० एल० आर० सी० पी० एम्० आर० सी० एस्० यांच्या सन्मानार्थ ह्या कविता कवीनें तयार केल्या होत्या.

मनीं गोष्टि आणूनि या निश्चयानें
तुवां चिंतिलें आंग्लदेशास जाणें
गमे धन्यता थोर कृत्यें तुझ्या या
अह्मां सर्व लोकांस गोपालराया ५
संस्थानाधिपती उदार सुकृती ज्ञानी गुणीग्राहक
देती आश्रय सर्वथा शिकत तूं होतास जों वैद्यक
इंग्लन्दास अपार खर्चुनि धनें त्यानीं तुला धाडिलें
त्वद्विद्याफल आयतेंच ह्मणुनी आह्मां असे लाभलें ६

वासुदेव वामन शास्त्री खरे.

## स्वावलंबन

श्लोक. [ दंडी कविकृत. ]

दशानन जया रिपू पदिं अलंघ्य रत्नाकर
सहाय समरीं कपी जगिं अजिंक्य लंकापुर
असें असुनि राक्षसां सकल मर्दि राम स्वयें
क्रिया निज पराक्रमें करि न शूर तो आश्रयें १
रथास एक चक्र सात वारु मारुताशनें
बद्ध घे न शांति मार्गिं सारथी पदाविणें
असें असूनि सूर्य नित्य लंघितो नभ स्वयें
शूर तो स्वविक्रमें करि क्रिया न आश्रयें
पुष्पाचें धनु ज्या जमा मधुकर स्त्रीनेत्र साचा शर
ज्याचा मित्र निशापती जडमती सर्वां असे माहित
तत्रापी करितो अनंग जित हें लीलेंचि लोकत्रय
मोठा वीर्यबळें पराक्रम करी वांछी न अन्याश्रय

कुंभापासुनि संभवे वनिं वसे कंदादि का भक्षितो
भूर्जाचें दल वस्त्र दुर्बल तनू सारंगिं जो राहतो
एक्या आचमनें अगस्त्य अवघा अब्धी करी प्राशन
थोरांना नलगेचि कार्य करण्या सामाग्रिचें साधन ४

दंडी कवि.

## सुभाषित

श्लोक.

आहे हिमालय अमोल–सुरत्न–खाण
त्यच्छीस आणि किमपीहि न शीत वाण
" की एक दोष लपतो गुणसंचयांत
जैसा कलंक दडतो शशिच्या करांत " १
" की एक दोष लपतो गुणसंचयांत
जैसा कलंक दडतो शशिच्या करांत "
नेणों कशी चकलि सत्कविदीर्घदृष्टी
दारिद्र्य एक गुणराशि विनाशि कोटी २
धरी गिरिदरी हरी हरिण संचरे तो वनीं
दिशांत वरि दिक्करी वदनपद्म घाली वनीं
प्रियानयनमध्यतस्तनमुखें मनीं लज्जित
मरे सुजन वा त्वरें वरि विदेश मानच्युत. ३

दंडी कवि

*मत्तात प्राशिजेला घटसुतमुनिनें, ताडिलें मत्पतीतें
अन्ये हा विप्रवर्ग स्ववदनिं धरितो माझिया वैरिणीतें

* लक्ष्मी आपण ब्राह्मणाचे घरीं न राहण्याचें कारण सांगते.

मद्गेहाब्जा खुडीती प्रति दिवसिं उमाकांतपूजानिमित्तें.
तस्मात् खिन्ना सदा मी द्विजकुलसदनें त्यागिते क्रोधचित्तें ४
बंधनें बहुत हीं परि लोकीं । प्रेमबन्धन विचित्र गमे कीं
दारुभेदनिकृतीहि असोन । कोष्टकीं भ्रमर यत्नविहीन ५
वैद्यराज तुह्मास, नमस्कृती । श्राद्धदेवसहोदर निश्चिती
तो बरा असु एकचि संहरी । वित्त आयु तुह्मी हरितां परी ६
    नृपा ! वसतसे तुझ्या विमल कंठिं वाग्देवता
    सदा करसरोरुहीं तशि असेहि लक्ष्मी स्थिता
    ह्मणोनि बहुतापरी कुपित कीर्ति जी मत्सरी
    तुज त्यजुनि जाय ती महिप ! दूर देशान्तरीं ७

विष्णु बाबाजीराव कुळकर्णी.

## साधुवृत्ति

श्लोक [ दंडी कविकृत. ]

निष्ठा स्वधर्मावरि नित्य ठेवी । जो अन्य धर्मास न बोल लावी
बोलापरी वागतसे जगांत । साधू तयाते बुध बोलतात १
आदौ स्ववर्णाश्रमधर्म पाळी । पश्चात् क्रमानें षडरी उगाळी
पावे गती शीघ्र शमादिकांत । साधू तयाते बुध बोलतात २
जो देशिकाचे वचनास मानी । स्वप्नांत ही जो गुरु नावमानी
नेच्छी परस्त्री न परस्व—पूत । साधू तयाते बुध बोलतात ३
कर्मा करी त्यागुनि जो फलास । सौजन्यही दावितसे खलांस
साधी परांचें हित जो नितांत । साधू तयाते बुध बोलतात ४
जो सर्वभूतीं परमेश पाही । ज्या मृत्तिकाकांचनभेद नाहीं
मी आणि माझें न धरी मनांत । साधू तयाते बुध बोलतात ५

एप्रिल १८९५. वर्ष ८ वें.

# काव्यरत्नावलि.

## अंक ४ था.

## चारुचर्या.

( क्षेमेंद्रकृत ).

सत्यासक्ती[1] फार ज्याच्या मनांत श्रीलोभानें[2] जो दिसे शोभिवंत
स्वर्गा मोक्षा दे सदाचार[3] त्याला तैसा मोदें वंदितों अच्युताला[4] १
ब्राह्मीं मुहूर्तीं पुरुषें उठावें आलस्य सारें विसरून जावें
विकासतें पंकज जें प्रभातीं गुणाश्रया श्री वरिते तया ती २
स्नानास सारून पवित्र व्हावें पुण्यें स्वदेहाप्रति शोभवावें
वृत्रासि[6] मारून ब्रह्मार्जिताला[7] स्नानें करी दूर हरी[8] अघाला ३
आधीं करीं संतत ईशपूजा लागें सुखानें मग अन्य काजा
ईशार्चनीं श्वेत[9] रते बघून न्याया तया काळ शके न जाण ४
श्राद्धास शास्त्रोक्त पथेंच सारीं श्रद्धा मनीं ठेवुनि चांग भारी
पिंडार्पणा भीष्म[10] करी महीच्या वरीं, करीना करिं शंतनूच्या[11] ५
करूं नये मस्तक उत्तरेस करूं नये तेंविहि पश्चिमेस
शय्या [12]दितीची विपरीत होतां नाशी तिचा गर्भहि वृत्रहंता[13] ६
अर्थी जनां अन्नविभाग द्यावा महाशयें शेष सतोष खावा
सद्रीति हे श्वेतनृपाल[14] मोडी स्वकीय मांसाशनलाभ जोडी ७

---

१ सत्याविषयीं प्रीति व सत्यभामेविषयीं प्रीति. २ शोभेच्या लाभानें व लक्ष्मीच्या लाभानें. ३ चांगलें वर्तन. ४ कधीं न ढळणाऱ्याला व कृष्णाला. ५ पांहाटेस. ६ वृत्रनांवाच्या दैत्याला. ७ ठार मारल्यामुळें प्राप्त झालेल्याला. ८ इंद्र. ९ श्वेतनांवाचा ऋषि. याची कथा लिंगपुराणांत पूर्वार्धांत तिसाव्या अध्यायांत आहे. १० गंगेचा मुलगा. ११ भीष्माचा बाप—त्याच्या. १२ कश्यपाची स्त्री. १३ इंद्र. १४ श्वेत नांवाचा राजा. याची कथा वाल्मीकिरामायण उत्तरकांड सर्ग सत्तर यांत आहे.

धुऊनियां पाय पवित्र व्हावें होमा जपाला मग आचरावें
धुवी न कीं नैषधराय[1] पाय देहीं शिरूनी कलि दे अपाय ८
निःशंक चित्तें फिरणें निशींत बरें नसे हें धरणें मनांत
मांडव्य[2] शूळीं चढला, नसून चोरामधीं, चोर परी गणून ९
परस्त्रियेसीं न मनांत इच्छीं विश्वास कांतेवरिही न टाकीं
सीतेमुळें नाश दशाननाला पत्नी वधी शीघ्र विदूरथाला[4] १०
गोडी न ठेवीं कधिं मद्यपानीं होईल तेणें बहुसाल हानी
प्राशूनियां मद्य हि यादवांनीं केला स्वतांचा बहु नाश त्यांनीं[5] ११
हेवा असे मूळ हि भांडणाचें क्षमा असे मूळ सुसंपदेचें
पारीक्षितीला[6] द्विजशाप होई क्षमा वसिष्ठास सुकीर्ति देई १२

---

१ नळराजा. २ पुढील आर्या पहा.

नलभूप मूत्रशौचीं करि-पदधावन चुकूनि-संध्या हो
जाणो तो साधु ह्मणे कलिची ही प्रार्थना न वंध्या हो
त्या रंध्रीं शिरला तो श्रीच्या गेहीं हळूच कलि कवडा
छेदाया श्रितसुखदा जेविं भजे शस्त्रपाणि हालिक वडा ॥

मोरोपंत—वनपर्व

३ एकऋषि. पुढील आर्या पहा :—

शापाचें मूळ असें, मांडव्य महर्षि तरुतळीं उग्र
तप करि, निजाश्रमपदद्वारींच उभा दिसे स्वयें उग्र ॥
त्या आश्रमींच तस्कर सांपडतां मुनिहि मानिला चोर
बांधुनि नेतां हि न तो डगमगला शांति साधुची थोर ॥
राजाज्ञेनें शूळीं मुनिहि चढविला परंतु न क्षोभे
तेथें हि तपस्तेजें एकलतालाग्रगार्कसा शोभे ॥ मोरोपंत—आदिपर्व

४ विदूरथ राजाला त्याच्या पत्नीनें वेणींत शस्त्र लपवून ठेवून मारलें. ५ ही कथा महाभारतांत मौसलपर्वांत आहे.

६ जनमेजयाला. ही कथा हरिवंश पर्व १ अ० ३० यांत आहे.

आली जरी कष्टदशा अपार धर्मप्रती न त्यजिती उदार
चांडालदास्यत्व[1] जरी हि जोडी तरी हरिश्चंद्र न धर्म सोडी १३
करून सत्यव्रतभंग कार्य साधावया योग्य नसेच आर्य
युधिष्ठिरानें[2] व्रत मोडियेलें स्वर्गी तया बाधक तेंच झालें १४
सत्संग तो मात्र सदा धरावा कुसंगतीचा न विटाळ व्हावा
बिभीषणा[3] राज्य हि रामसंगें अही मरे रावणकार्ययोगें १५
मातापित्यांलागिं न कोपवावें स्ववर्तनें सौख्य तयांस द्यावें
कोपून शापी जननी[4] अहींस सर्वां घडे नाश पहा तयांस १६
घेई जरा, देउन यौवनाला स्वपुत्र, तैं हृष्ट ययाति[5] झाला
तो धाकटा सर्व जरी मुलांत त्या चक्रवर्ती करि शीघ्र तात १७

---

१ चांडाळाची चाकरी. २ धर्मराजानें. ही कथा महाभारत स्वर्गारोहणपर्व अध्याय तिसरा यांत आहे. ३ बिभीषणाला. पुढील आर्या पहाः —

तस बिभीषण झाला स्वाग्रजदोषाग्निनें शरण आला ।
त्याला लंका प्रभु दे कोण कवि न सद्यशोमृतें धाला ॥

मोरोपंत—मात्रारामायण

४ सर्पांची आई कद्रू—पुढील आर्या पहाः—

निश्चय करून ऐसा कद्रू सांगे सुतांसि गूढपण
शिकवी कुमति स्वमुखें प्रकट करी आपुलेंचि मूढपण ॥
अंजननिभ केश तसे होऊनि शिरा तुरंगपतिपुच्छीं
ऐसें कपट शिकवितां ते स्वमतीं घालिती न मंन तुच्छीं ॥
त्यांसि ह्मणे जनमेजयसत्रांत जळाल तों तथास्तु तिला
विधिहि ह्मणे, करि करिता पूर्ण स्वमहामनोरथा स्तुतिला ॥

मोरोपंत—आदिपर्व

५ पुढील आर्या पहा:—

भूप ह्मणे दोघींला दिधले ज्यां पांच तनय निजरेतें
तो राजा होऊ जो देइल यौवन हि घेउनि जरेतें ॥

(पुढें चालू).

दाना करीं केवळ सत्वयुक्त करीं न जें देइल फार ताप
पृथ्वी पदीं दोन सरून जातां तृतीय पादा बलि घे स्वमाथां १८
इच्छा धरूनी न करींच दान तें व्यर्थ होई तरि साच जाण
दे कुंडलें कर्ण हि वासवाला शक्तीस मागे, वरि लाववाला १९
निन्दीं न तूं ब्राह्मण केधवांही त्याचा असे दुःसह शाप पाहीं
परीक्षिती तक्षकवन्हिमाजी तो ब्रह्मशापें लय पावला जी २०
धर्मावरीं दंभ समूळ टाकीं दंभें न लाधे फळ सत्य लोकीं
शस्त्रास्त्रविद्या जरि कर्ण साधी ब्राह्मण्यदंभें तरि निष्फळा ती २१
मिळे जरी द्रव्य अपार पाहीं असेव्यसेवा न करीं कधींही
दुर्योधनासंगतिं राहियेले ते भीष्म कीं द्रोण पहा निमाले २२
रक्षावयाला परकीय जीव धांवें, मनीं ठेव तदीय कींव
कपोतजीवार्थ स्वमांस देई शिबी सचाण्याप्रति, धन्य होई २३

(मागील टीप पुढें चालू).

पुरुनें आज्ञेचा त्या केला स्वीकार ते जरा याला.
स्पर्शें काव्यवरबळें याचें तारुण्यतेज रायाला ॥
पूरुप्रति भूप वदे वत्सा मत्सार्वभौमपदवीतें
तूंचि सुपात्र, मज तुझें साधुत्व तव स्तवास वदवीतें ॥
मोरोपंत आदिपर्व

१ पुढील आर्या पहा :—

त्या कवचकुंडलें ग्रहणाग्रह जरि परि असें तरि करा जी
या शक्ति ती आरेवधीं बहुमान्या अरिधरा हरिकरा जी ॥
मोरोपंत वनपर्व

२ तक्षकरूप अग्नीत.

३ ही कथा महाभारत—शांतिपर्व—राजधर्म—अ० ३ यांत आहे.

४ पुढील आर्या पहाः—

जोवि शरणागताच्या त्यागीं प्राणांचिया न शिबि भ्याला
सन्मति अपवादा भी करणींच्या हि न वधू तशि बिभ्याला ॥
मोरोपंत—वनपर्व.

द्वेषास चित्तांत शिरूं न द्यावें पुष्पापरी कोमल चित्त व्हावें
द्वेषामुळें दानवदेवनाश झाला, असे ठाउक हें जनांस २४
कृतोपकाराप्रति आठवावें कृतघ्नतेला न कधीं वरावें
कृतोपकारी बगळा वधून फांशीं पडे गौतम[1] विप्र जाण २५
स्त्रीप्रेमपाशामधिं आकळून व्हावें न बा स्त्रीजित सत्य जाण
श्रीरामशोकें रघुनाथतात[2] जायाजिताला यम होय नेता २६
स्वयें स्वतांच्या न गुणां स्तवावें मालिन्य तें ना पदरांत घ्यावें
स्तुती गुणांची करुनी स्वकीय स्वर्गा मुके शीघ्र ययातिराय[3] २७
हिंसेस जो कारण होय फार करूं नये तो मृगयाविचार
पांडूस[4] होता बहु नाद तीचा शापामुळें अंत घडे तयाचा २८

---

१ ही गौतम-ब्राह्मणाची कथा महाभारत शांतिपर्व-आपद्धर्म-अ० १६८ पासून शेवटपर्यंत ( आपद्धर्म ) आहे.

२ दशरथाला. पुढील आर्या पहा :—

दे मत्सुतासि पृथ्वी, अटवी रामासि हे वदोन, वर
सत्यप्रतिज्ञ मूर्च्छित केला मागोनि हेच दोन वर ॥
निजसुतवियोगविव्हळ सत्यच्युतिभीत तो असा विनवी
कैकेयि तुझ्या ठायीं निर्दयता हे अशी नसावि नवी ॥
हें राणीला सांगुनि, पुत्राचें करुनि मानसीं स्मरण
'हा राम राम!' ऐसा विलाप करितांचि पावला मरण ॥

मोरोपंत-मंत्ररामायण

३ पुढील आर्या पहा :—

स्वतपें तूं कवणाशीं तुल्य असें हरि पुसे ययातीतें
त्यातें नाहुष राजा सत्याचि सांगे मनें भयातीतें ॥
झाला सर्व तपःक्षय पावें प्रक्षीणपुण्य तूं पतन
बहुतप करितां तापस धन्य नव्हे, धन्य करिल जो जतन ॥

मोरोपंत-आदिपर्व

४ पुढील आर्या पहा :—

कठोर कीं तीक्ष्ण शरासमान बोलूं नये वाक्य कधीं हि जाण
कठोर वाक्यें बहु रुष्ट जाला तो भीम नाशी कुरुच्या कुळाला २९

करूं नये दे प्रभुला हि गोडी तरी परा दुःखद ती चहाडी
ते राहुवक्त्रीं विधुसूर्य जाती देई चहाडी गति त्यां अगा ती ३०

नीचांस गोडी जरि फार लावी तरी न याच्या सुजनें करावी
याच्या करी वामन ही बळीशीं लघुत्व लोकीं तरी ये तयाशीं ३१

भेदी बुधाच्या हृदयास साचा करूं नये तो अपमान त्याचा
वेदांस जो बोलतसे मुखानें तन्मस्तका ताडियलें शिवानें ३२

जो आपल्या नातलगांसमान द्यावा तयाला बहुमान मान
श्रीशंकराची करितां अवज्ञा विनाश झाला क्षणिं दक्षयज्ञा ३३

---

तो ऋषिपुत्र तपोधन भार्येशीं काननांत मृगरूपें
रतिकेलिसक्त होतां वधिला सरसा मृगभ्रमें भूपें ॥
घे शाप तापसाचा तुज हा करितां मनःप्रियासंग
मृत्यु घडो, या माझ्या शापाशनिचा कधीं न हो भंग ॥

१ पुढील आर्या पहाः—

दुर्योधन आपण मतिवेश्येचा जरि नवा ढवा याला
हासे गत्यनुकारें बाळ न भी उद्दलन वाढवायाला ॥ १४ ॥
तें अवलोकुन ह्मणे त्यासि निवृत्ताधंकाय भीम असें
मंद! रहा मंदर हा भीम खळाब्धिमथन योग्य असे

मोरोपंत सभापर्व.

२ पुढील आर्या पहाः—

सुररूप असुर राहू प्राशी अमृताब्धि तें तरणि इंदु
सूचवि तोचि हरि हरी अरिनें अरिशिर, गिळों न दे बिंदु
तें गगनग राहुशिर द्वेषें अद्यापि रविविधुग्रास
करितें, कवि अघभीरुचि ह्मणुं भीति अघा तयासि उग्रास ॥

मोरोपंत—आदिपर्व.

मनीं पराचा हि न राग ठेवीं वाढीं मदांधत्व कधीं न सेवीं
कुशब्द बोले शिशुपाळ वाचे ने कृष्ण त्यालागि गृहीं यमाचे[1] ३४
गुणांस वर्णून महाशयांचे मानाप्रती वाढव नित्य त्यांचे
स्तवी सदा राघव मारुतीला तो[2] रामकार्यार्थ सदा उदेला ३५
गुणांप्रती आदर मान द्यावा न जातिचा भेद बुधें पहावा
द्रौणी[3] वरी शूद्रपणास कर्में विदूर विप्रत्व वरी क्षमेनें ३६
जो वांकडा, क्रूर, सदैव लोभी करावया संग धरीं मनीं भी
वशिष्ठ[4] संतोषवि गाधिजाला सुभोजनें घेउन धेनु गेला ३७
हीं इंद्रियें तीव्र तपें विलीन तरी तयांचें न धरीं प्रमाण
मोठा तपस्वी तरि गाधिजाला[5] बनून संमोह मुनेनकेला ३८

---

१ पुढील आर्या पहा :—

सोसुनि शत अपराध प्रभुनें शिशुपाल मारिला चक्रें
केला पात्र सुगतिला जी पार्थाची गति स्वयें शक्रें ॥ ४० ॥

मोरोपंत-सभापर्व.

२ ही कथा किष्किंधाकांड अ० ६६ यांत आहे.

३ महाभारत—सौप्तिकपर्व यांत पहा.

४ पुढील आर्या पहा :—

कौशिक अनुगांसि ह्मणे सोडा हो धेनु ही चला हाका ।
हा काय रत्नभोक्ता मारू अनुताप पावुनी हाका ॥

मोरोपंत—धेनुहरण

५ पुढील आर्या पहा :—

तूं पात्र गाधिजाला सदुपायन करुनि देह नुनितें हो
हरि वारंवार असें स्वकरेंचि धरुनि वदे हनु तितें हो
जेथें करीत होता दारुण तप तो तपोनदीन मुनी
तेथें जाउनि खेळे तन्निकट प्रथम तत्पदीं नमुनी ॥
होती करीत कंदुककेलि मधुर गान मोहिनी तीतें
स्पर्शे प्रथम वसनहर पवन मग त्यजुनि तोहि नीतीतें ॥

मोरोपंत—आदिपर्व.

वियोगदुःखीं त्यज दीनतेस देईं बहू धैर्य तुझ्या मनास
द्रौणीवचा द्रोण हि घे स्वकानीं धैर्या त्यजी, तों वधिला अरीनीं ४०
दैत्यापरी क्रोध मनीं नसावा स्वाधीन त्याच्या न मनुष्य व्हावा
फोडून वक्षस्थळ भीम रक्त प्राशी, करी केवळ दैत्यकृत्य ४१
प्रसन्न झाला जरि तो परेश मागूं नये कीं भलतेंच त्यास
प्रसन्न बाणें करुनी शिवाला मागूनियां युद्ध रणीं निमाला ४२
विद्या मिळावी जरि आपणास टाकून उद्वेग भजें गुरूस
शुक्रास सेवी बहु कष्ट सोशी संजीवनोलाभ घडे कचासीं ४३
जो भक्त जो शक्त न ज्यास दोष इच्छी हिता प्रेम करी विशेष
त्या टाकितां शोक अपार होय टाकून सीता करि राम हाय ४४
लोकां स्मृती होय अशी सदैव ख्याती करावी जगतीं अपूर्व
अंतीं पद द्युम्न नृपाल इंद्रें गातां जनीं कीं वरि नाक शीघ्र ४५
पळें पळे जी कमला सुदूर धरूं नयें लोभ तिचा अपार
व्याडींद्रदत्तां अनुकूल होती श्री नंदभूपीं हरिली सर्वें ती ४६

---

१ अशनिहत शिळातळ जळ रक्त तसें खड्गभग्न तें उर वी
तृषित घटोत्कचतात प्राशी शोणित न लेश ही उरवी ॥
मोरोपंत—दुःशासनवध.

२ हरिवंश–पर्वदोन–यांत कथा आहे.

३ पुढील आर्या पहा:—
आराधिला कचें गुरु गुरुची कन्या हि देवयानी ती।
झाली प्रसन्न सत्वर शिकविति तैसीच देव या नीती ॥
भीड सुतेची भारी विद्या संजीविनी कचा शिकवी।
गुरुला हि वांचवाया योग्य करी सज्जना कचाहि कवी ॥
मोरोपंत—आदिपर्व.

४ इंद्रद्युम्न–याची कथा–महाभारत–वनपर्व–अध्याय १९९ यांत आहे.

५ ही कथा कथासरित्सागर तरंग ४ यांत आहे.

शक्तिक्षयीं सोसकता धरावी सशक्त त्यांशीं न कळी करावी
दशाननाला नृप कार्तवीर्य[1] रागें करी बद्ध हि रुद्रवीर्य ४७
वेश्या सदा ज्या कपटी मनींच्या विश्वास ठेवीं न वरी तयांच्या
निःसंग जो केवळ ऋष्यश्रृंग त्यातें क्षणीं ज्या करिती हि दंग ४८
बालिष्ठ त्याणें हि मनीं धरावें कीं अल्पवीर्या न अनादरावें
जो रेणुकापुत्र[2] रिपूंस मारी हरी तयाची रणि राम थोरी ४९
क्रौर्यास हिंसेस सदैव सोडीं साऱ्या जनांचें न रिपुत्व जोडीं
जयीं जरासंध[3] जगास पीडी यमालयीं भीम तयास धाडी ५०
जो सर्वदा न्यायपथांत वागे अल्पें हि दोषें मळ त्यास लागे
वधावया वालिस साह्य देई श्रीरामकीर्ती सकळंक होई ५१

---

१ पुढील आर्या पहा :—
कृतवीर्यतनय युद्धीं जिंकुनि दशकंधरासि बद्ध करी
कारागारीं ठेवी जैसा आरण्यक प्रमत्त करी ॥
मोरोपंत—मंत्ररामायण—उत्तरकांड

२ पुढील आर्या पहा :—
श्रीकंठशिष्य भार्गव शिवचापध्वंसकुपित आला जो
हरिलें तद्यश रामें जें त्याला कां न चंद्रमा लाजो ॥
मोरोपंत—मंत्ररामायण—बालकांड

३ पुढील आर्या पहाः—
मूर्धाभिषिक्त राजे पशुसे षडशीति बद्ध आहेत
पशुपतिपुढें वधावे शत ऐसा त्या कुबुद्धिचा हेत ॥
मागध म्हणे मखार्थ प्रोक्षित नृपपशु भयें न सोडीन
कर ईश्वरासि किंवा तद्रूप ब्राह्मणासि जोडीन ॥
आरंभ कार्तिकाचा युद्धाचा तुल्य म्हणिती संत
भूतातिथि दिवसांचा त्याहि मगधभूमिजानिचा अंत ॥
मोरोपंत—सभापर्व.

जितेंद्रियांमाजि वरिष्ठ व्हावें वनींहि मातेस दुरी त्यजावें
प्रद्युम्न पुत्रापरि, मानुनी ती कामें भरे शंबरपत्नि चित्तीं ५२
ज्यांची तपस्या बहु तीव्र पाहीं तद्वैधनाशार्थ करीं न कांहीं
पहा शिवापासुन मृत्यु आला ऐशा गुणें शीघ्र मनोभवाला ५३
भांडावया तत्पर जो परासीं खेळांतही प्रेम बरें न त्यासीं
द्यूतामधीं कोपुन रुक्मियातें मारीतसे कीं बलराम हातें ५४
कृपा जरी फार असे प्रभूची शंका असावी स्वमनीं तयाची
मंत्री स्वतांचा शकटाल त्यातें तो नंदराजा करि बंधनातें ५५
श्रद्धा असावी परमेश्वराची न नास्तिकत्वीं रुचि चांग साची
स्तंभांतुनी येउनि नारसिंह बाहेर, मारी असुरा अपूर्व ! ५६
हातीं जरी बा पद थोर येई तरी न सुज्ञां अवमान देई
इंद्रत्व दैवें नहुषा मिळालें गेलें, अगस्त्या अवमानियेलें ५७
केला जरी संधि रिपूसमीप निःशंक राहीं न तरी मनांत
निःशंक चित्तें वधिलें त्वरेनें वृत्रास संधी करुनी हरीनें ५८
हितोपदेशाप्रति आयकावें त्यांतून जें उत्तम तें करावें
विदूर सांगे परि तें करीना सुयोधना शोक ह्मणून जाणा ५९
भक्षावयाला नर फार इच्छी तेणें तया रोग अपार जाची
भक्षी घृताला बहु अग्नि जेव्हां आलें तयाला बहु जाड्य तेव्हां ६०

---

१ हरिवंश पर्व २ अध्याय १०४ पहा. २ हरिवंश–पर्व २ अध्याय ६१ पहा.
३ कथासरित्सागर तरंग ४ पहा.
४ महाभारत—अनुशासनपर्व–अध्याय शंभर पहा.
५ महाभारत—शांतिपर्व–मोक्षधर्म–अध्याय २८२ पहा.
६ पुढील पृष्ठावरील आर्या पहा :—

व्रतें न तीव्रें तनु शोषवावी यत्नें स्वदोषां पळण्यास लावीं
करूनियां तीव्र तपास तूर्ण निद्रा वरी केवळ कुंभकर्ण[1] ६१
काळांतरें हें सगळें हि जाई लोकीं असे चंचल सर्व पाहीं
रघू शिबी पंडुहि रामचंद्र कोठें असे भक्तमणी कपींद्र ६२
न वृद्ध वाक्यास वपूस कर्मा निन्दीं कधीं जाणुन चांग वर्मा
निन्दूनियां व्यर्थ तनू मुनींची त्या श्रीसुता जोड विरूपतेची ६३
केला खळाला उपदेश सार होतो तरी तो बहुधा असार
रक्षी जरी शुक्रहि राक्षसांसीं सदैव ते क्षीण तरी रहाती ६४
न दीर्घ वैरास मनीं धरावें न स्थान रागास मनांत द्यावें
चाणक्य[2] कोपें दिवसांत सात नंदाप्रती मारितसे सुतस ६५
साध्वी स्त्रियांला न कधीं छळावें त्यांच्या न चित्ताप्रति तापवावें
वधावया कीं दशकंधरातें तनूस ही वेदवती[3] त्यजी ते ६६

---

(मागील टीप पुढें चालू).

श्वेतकि नृप घृतधारा द्वादश वर्षें मुखीं सतत ओती।
बहुधा ह्मणोनि देतां झाली निजसेवनीं हळुहि ओ ती॥
श्वेतकिची ब्रह्मांडीं अप्रतिमा कीर्ति हे तुपा प्याला।
झाला रुग्ण अनळ असि न दुजी पूतत्वहेतु पाप्याला॥

१ पुढील आर्या पहा:—
घटकर्णाला कमलज माग ह्मणे जें अभीष्ट तें सारें
अयुताब्द काल दुःसह नियम बरे पाळिले निराहारें॥
दशवदनानुज तेव्हां व्यामोहद्भारतीहृतस्वांत
सर्वसुरेशालि ह्मणे निद्रा दे जाहलों तपःश्रांत॥

मोरोपंत—मंत्ररामायण—उत्तरकांड.

२ कथासरित्सागरतरंग—५ पहा.

३ पुढील पृष्ठावर आर्या पहाः—

विद्येस तैसा विनयास देई सद्भक्तिनें तो गुरु नित्य गाई
होतांच तो गाधिज तुष्ट चित्तीं रामास अस्त्रें विविधें समर्पी ६७
लावी दुजा जें धन द्यावयास देणें बरें तें स्वसुखेंच त्यास
द्रोणास केला द्रुपदें उदास राज्यार्ध द्याया पडलें तयास ६८
धर्मार्थकामांप्रति नित्य साधी ठेवूनियां न्याय-पथांत बुद्धी
धर्मार्थकामांप्रति साधुनीयां कृतार्थता ये सगरादि रायां ६९
कुळाहुनी न्यून कधीं न व्हावें समान वा थोर ह्मणून घ्यावें
तो वंश विख्यात असे रवीचा श्रीराम त्याहून विशेष साचा ७०

---

मागील टीप

वृत्त तिचें असुराधिप पुसतां मग त्यास ते ह्मणे युवती
मी गुरुपुत्रकुशध्वजकन्या नामें करून वेदवती ॥ ७७ ॥
हरिहुन दुसरा वर मज न रुचे ह्मणवूनि हें सदाचरण
निजजनकल्पतरूचे चित्तीं मी पूजितें सदा चरण ॥ ८० ॥
श्रवण करुन मदनातुर रावण तीतें ह्मणे अहो जाये
मजहुनि काय अधिक हरि होउनि पत्नी गृहासि माझा ये ॥
मग ते निशाचराला—वधीन जन्मांतरीं तुला हो मी
ऐसें वदोनि तनुला त्या समयीं दीप्त पावकीं होमी ॥ ८४ ॥
मोरोपंत–मंत्ररामायण–उत्तरकांड.

१ पुढील आर्या पहा:—

मखमर बलातिबला विद्या दे क्षुत्तृषार्तिहरणार्थ
अर्पी धनुःश्रुतीतें सज्जनरक्षार्थ दुष्टमरणार्थ ॥ ५ ॥
मोरोपंत–मंत्ररामायण–बालकांड.

२ पुढील आर्या पहा:—

देउनि राज्यार्ध नृप द्रोणें सत्कार करुनि बोळविला
अहि सोडिला जसा पय पाजुनि मनिं मणि हरूनि पोळविला ॥
मोरोपंत–आदिपर्व

तीर्थांचिया पूत जलें करून करीं स्वतांलागिं पवित्र जाण
तीं लोमशोक्तें करुनी सुतीर्थें[1] धर्मादि गात्रें करिती पवित्रें ७१.
येतां विपत्काल कला शिकाव्या ज्या योग्य होतील धनास द्याया
विराटसद्मीं वसुनी किरीटी[2] सांगे मुलीला बहु नृत्यरीती ७२
असूनियां नित्य हि वैभवांत होऊं नये मग्न कधीं तयांत
राहे जसें पद्म जळीं स्वतंत्र तैसेंच साधे जनकास तंत्र ७३
अशिष्यसेवा धनलाभलोभ लघुत्व देती गुरुलाहि चांग
संवर्तयज्ञीं करि याचनेला लघुत्व तेणें शिवलें गुरूला[3] ७४
होईल जीचें अपवित्र शील नारी त्यजावी पुरुषें अमोल
चंद्रावरी प्रीति करी ह्मणून जगांत निंद्या गुरुपत्नि[4] जाण ७५

---

१ पुढील आर्या पहाः—

धौम्यहि विचार पुसतां सांगे धर्मास तीर्थयात्रा त्या
कविविस्तरभय न हरिति जरिहि हरिति भक्त भवभया ज्ञात्या ॥
सेवी पांडव सिद्धाश्रम तीर्थातें तदीय महिम्यातें
विस्तरभयें न लिहिलें रसिकानुमतें मनोरम हि म्यां तें ॥
मोरोपंत वनपर्व

२ पुढील श्लोक पहा.

ज्याच्या शरें रिपु विराजित कां जळाले
तो जिष्णु लोचनिं वधूवत काजळा ले
युद्धांगणीं परम दुर्धर हात चोळी
तो लेइला पघळ कोपरहस्तचोळी ॥ ७२ ॥
फुलें गुंफणें घालणें वेणिका ते
असें जाणतें जें नये आणिका तें
विडा साजणें घालणें अंजनासीं
बरें शीकवी नृत्यकारी जनासीं ॥ ८३ ॥
वामन—विराटपर्व.

३ महाभारत—आश्वमेधिकपर्व—अध्याय ८-९

४ हरिवंश पर्व पहिलें—अध्याय ४५

न गीतवाद्यांत गुतून जावें स्वकीय कार्यास सदा जपावें
वत्सेश[1] वीणाव्यसनांत गुंते पाहून शत्रू धरिती तयातें ७६
पुष्पापरी कोमल अंगनांतें दुर्भाषणें ताप न देइं त्यांतें
भार्येप्रति ताप अपार होय करी उणें तेज रवी स्वकीय ७७
धूर्तांस देऊन न संपवावें द्रव्यास सत्कारणिं वेंचवावें
देऊन रत्नें सगळीं सुरांला सारा पुरा अंबुधि रिक्त झाला ७८
जें बोधपीयूष असे मिळालें तें मग्नकुंभापरि न त्यजावें
गीतार्थ[3] गेला विसरून पार्थ तेणें असूया शिरली मनांत ७९
ऐश्वर्य सारें निजही सुताला न ओपणें चांग कधीं मनाला
ओपून राज्यास सुयोधनाला तृणापरी कीं धृतराष्ट्र जाला ८०
ज्याला असे आवड शत्रुकार्यीं त्याला न घ्यावें मदतीस पाहीं
तेजोवधें[4] सारथि शल्य मानी कर्णप्रतापास उणीव आणी ८१
बरा न राजाजवळून मान घेणें, तयापासुन कष्ट जाण
बैसे जरी चंद्र शिरीं शिवाच्या देहीं तरी क्षीणपणा तयाच्या ८२
लक्ष्मी असे चंचल, बांधण्यास तिला करीं तूं गुणसंग्रहास
गुणी न ऐशा असुरां त्यजून लक्ष्मी वरी श्रीपतिला सुजाण ८३
श्रुतिस्मृतींनीं कथिलें सुधांहीं आचार सोडीं न कधींहि पाहीं
सोडूनियां धर्म, पवित्र सत्य लक्ष्मीप्रती ते मुकलेच दैत्य ८४
देवास गाईस गुरूस पाहीं होऊन उष्टा न शिवें कदाही
उच्छिष्ट होऊनिच दानवांहीं गमाविली श्री मिळवून पाहीं ८५

१ कथासरित्सागर–तरंग १५
२ हरिवंशपर्व १ अध्याय ९
३ ही कथा महाभारत आश्वमेधिक पर्व यांत आहे.
४ ही कथा महाभारत कर्णपर्व यांत आहे.

धरून कन्या हि कुळें वरिष्ठ व्हावें कसें सांग जनांत शिष्ट
वरी ययाती जरि शुक्रकन्या ये म्लेंच्छता सत्वर त्याहि धन्या ८६
नसे जरी अर्थ न कूळरूप विद्या, न हांसें तरि तूं कुणास
दशास्य हांसे[1] तंव त्यास पाहीं कोपून नंदीश्वर शाप देई ८७
बंधूंतलें वैर न वाढवावें पक्षास एका न कधीं मिळावें
युद्धामधीं कौरवपांडवांच्या लढावया राम न सिद्ध साचा ८८
परोपकारास सदा करावें संसारिं हें सार मनीं धरावें
उत्कर्ष व्हावा सकळा जनांचा लोकीं झटे बुद्ध ह्मणून साचा ८९
गरीब बंधूस धनास द्यावें मित्रास दैन्यांतुन सोडवावें
अर्थ्यांस कल्पद्रुम अन्य होई मित्रांस बंधूंस बळीहि देई ९०
करूं नये जारणमारणास करूं नये क्रूर हि कर्म खास
केल्या क्रिया इंद्रजितें अशाच मारी तया लक्ष्मण यानिमित्त ९१
हो ब्रह्मचारी हि गृहस्थ रानीं बसून मोर्दे यति हो निदानीं
ययाति सारे[2] नरपाळ जाले त्यांनीं क्रमें आश्रम पाळियेले ९२
स्वकीय हस्तें न पुरीं उगेंची प्रसंग पाहून धनास वेंचीं
वातापिला भस्म करी अगस्ती धनव्ययाला परके करीती ९३
होईल जें दुःखद अंतकाळीं कृत्यास ऐशाच सदाहि टाळीं
नऊ शिरांला मुकतां दशास्य स्मरे मनीं स्वीकृत दुष्ट कृत्य ९४

---

१ पुढील आर्या पहा :—

हांसे वरवीर्यमदें कपिमुख नंदीस रात्रिचरपाळ
तेव्हां शिवदास ह्मणे कपीच होतील रे तुझे काळ ॥

मोरोपंत—मंत्ररामायण उत्तरकांड.

२ पुढील आर्या पहा :—

जाय नृप, श्रीकरवीं धरबुनियां पुरुहस्त वनवासा
न गमे प्रजांसि पति तो गुणजितसुरभूरुहस्तव नवासा

३ महाभारत—वनपर्व अध्याय ९९.

होतां जरेनें बहु शुभ्र केश तपोवनप्रीति घडे नरास
पूर्वी महीपाळ सुकीर्ति झाले अन्तीं वनीं जाउन मुक्त झाले ९५
वयःक्षयीं—जन्म दुजा न व्हावा— ह्मणूनियां यत्न बरा करावा
विदूर ज्ञानाग्निमधीं सतेज जाळी पुनर्जन्मविकारबीज ९६
अंतीं परेशाप्रति ओळखावें धन्यत्व जन्मामधिं या वरावें
भीष्में शुकें कीं अठवून त्याला निवारिलें जन्मपरंपरेला ९७
करून कृत्यें बरवीं जगांत राहें बहूकाळ यशें जिवंत
मांधातृभूपाळ यशोतनूस धरून देई सुख मानवांस ९८
नाशीतसे जो विपदा सदैव अंतीं स्मरावा मनिं वासुदेव
पडे जरी तो शरपंजरांत भीष्म स्मरे अन्तरिं लोकनाथ ९९
श्रीव्यासदासें रचिली रसाळ क्षेमेंद्र नामें कविनें सुढाळ
ती ही मराठीमधिं चारुचर्या लिहून मोरेश्वर देइ आर्या १००

मोरो गणेश लोंढे.

---

## सुभाषित

### श्लोक.

ईशा! हें काय शीर्षी? सखि! जल, दिसतें वक्र, तें अब्ज कांते!
नीला वेणी दिसे ही, मधुकरतति ती, भ्रूलता, वीचिका ते;
डोळे हे, दोन मासे; स्तनयुग, असती चक्रवाकी विहारी;
भार्येतें वंचिणारा सुखकर सकला यापरी हो पुरारी १

वैद्य ते कफपित्तवातविकार यापरि बोलती
ज्योतिषी कथिती असें, ग्रह वक्र होउनि पीडिती ( गांजिती )
व्याधिकारण, भूतपीडन हेंचि मांत्रिक सांगती
पूर्वजन्मकुकर्मदुष्फललाभ हें मुनि बोधिती २

विष्णु बाबाजी राव.

मे १८९५, वर्ष ८ वें.

# काव्यरत्नावली.

## अंक ५ वा.

## सुखशोधन *

( विषयविवेचन भाग दुसरा. )

श्लोक.

प्रथम अरि सर्व घे संव बाकी अरींचा
बळकट करि वेढा तोचि चित्तोदरीचा
बळ सुदृढ कराया योग्य एकान्त जागा
अमिळ दुजि ह्मणोनी ने सख्या ह्याच भागा ६५
इतर अरि—सहाय्या चालती कामसंगें
वरल विकृति ओजीं चित्त पोहे तरंगे
हळु हळु मग आशा रंग भंगासि दावी
विकृति दुजि उठे ती क्रोध कां ना वेदावी ६६
तनु अवयव सारे लाविती काम कामीं
धरुनि मन वसे तें चंचलत्वें विरामीं

---

* हें प्रकरण ६४ श्लोकांपर्यंत अंक २ यांत आलेलें आहे. त्या श्लोकांपुढील राहिलेले श्लोक या अंकांत देउन हें प्रकरण सर्व पुरें केलें आहे. १ पाहिला शत्रु. ( काम. ) २ कां ह्मणू नये.

गर्तित अवयवांच्या विघ्न येतां जरासें
झिडकुनि भय होतें क्रोध चित्तीं विकासे ६७
शिरिं तिडिक उठे ती नेत्रिं लालीस सोडी
उरिं धडधडि घाली हस्तकीं गाल झोडी
प्रलयसमयिं अग्नी देह तैसा थरारे
भड भड मुख ओके शब्द जैसे निखारे ६८
प्रतिवचन कराया साम्यतेचा नगारा
दुमदुमुनि विषाते सोडतो शब्द गारा
द्विविध ढग विरोधी भेटतां वज्रपात
करिति कडकडोनी तेविं तेही विपात ६९
लघुच जरि विरोधी हो तरी त्याचि खोड
पवनगतिस मागें टाकुनी घेत मोड
ध्वज सबल उभारी जो प्रतिस्पर्धि गाढा
कटुवचशर त्याचा छेदतो क्रोध बाढा ७०
झडकरि पळ काढों पाहि डोक्यामधोन
अडखळुनि पडे तों हस्थ तो हो लपोन
मुख छबि धरि छाया कृष्ण वर्णी भयाची
गय गय वदनीं ये दीन कारुण्य याची ७१
भय वसति करी तों मार्ग कांहीं सुचे न
चरणिं शरण गेल्या वांचुनी ये न चैन
भय विरल जसें हो तों घृणेचा पसारा
मुखिं पसरुनि जातो बुब्बुळीं जेविं सारा ७२

घृणित नयन होतो बाण जैं अर्ध चंद्र
भिंवइ-धनुसहाय्यें भेदण्या स्पर्धि छिद्र.

तदुपरि हरिणाचा पारधी पाठलाग
करुनि वध करी तैं लावितो तोहिं लाग ७३
प्रियसहचर होती क्रोध आणी घृणा ही
भय धरुनि धुरीला चालती कुंपणाही
विजय अचुक हातीं लागतां लोभ चित्ता-
वरि बसुनि पुढें हो गांठण्यालागिं वित्ता ७४
अभिनव नयनाची भ्रांत विश्रांति शांती
पडुनि मनुजकंठीं झांकवे हेमकांती
हळुहळु जनचित्ता ती बघे चांचपोन
[१]वें उदय दिसेना वोंच राहे [२]चेपोन ७५
रसभरित वचांचे ओघ जाती श्रवांत
शिर कर नयनांचे साह्य त्यां हो निवांत
द्रव हृदयिं जनांच्या मेघ जैसे नभांत
जमुनि कनकरूपें वर्षतो [३]रासभांत ७६
दुरुगसम बलाचे आलिया आंगणांत
कड कड रव फाटे जेविं गोळ्या रणांत
अजय जय गडाचा स्थैर्यि मोडांत राहे
अबल अरि तहाचे बोलणें लावुं पाहे ७७
अजित सबळ लोभीं मोह येतो क्रमानें,
विषय वश कराया योजना वक्र मानें
सरसरुनि निशाणीं मेळवी विक्रमानें
मदभरित कपोलें डोलवी वक्र मानें ७८
मद भरवि अहंता एक देहांतरांत
इतर जग लघुत्वें ये तृणाच्या दरांत

---

१ कांठांकांठानें. २ चपापून. ३ गाढवांत. [ मूर्ख लोकांत. ]

बल, यश, नय, विद्या-गर्व याच्या भरींव
कटुपण रसना घे आढ्यतेच्या सरींव ७९

सहचरबलसंघें थोरवी ये मदास
परि करुनि मना तो सोडि उद्दाम दास
तरि लव सुख चित्ता प्राप्त नोहे जगांत
मृगजलसम भारी भ्रांति भासे दिगांत ८०
श्रवण बधिर होती थोरवीला दुजाच्या
नयन धरुनि सारा सोडिती योग्य जाच्या
सतत मनिं अहंता उद्भवे कर्तबाची
हृदय त्यजुनि भीती टाकिते खोल खांचीं ८१
इतकि दृढ तयारी सिद्ध झाल्यावरीही
गुण गज इतराचा फोडि आकाशिंचाही
श्रवण धरुनि तीतें चित्त घे सिंहरूप
मद खवळुनि होतो मत्सर क्रुद्ध भूप ८२
भयविरहित चित्तें देह सिंहत्व घेत
चरफडुनि बहू तो टांचि बोटें रिघेंत
उकरुनि गजगण्ड स्थान शोधी मदास
पिउनि गटगटा तो त्या कराया स्वदास ८३
स्थिति उलट जरी हो कल्पनेच्या भराची
तिळ तिळ वरि ती हो वल्गना सांभराची
त्यजिन गज गजत्वा सिंह होतो कुरंग
पळत पळत त्याचे भंग होतात रंग ८४

---

७ ध्वनि.

सुखविषयदलाच्या पोटिं जें वाटले ते
थिजुनि काठिण झालें वांकवाया शिलेतें
काठिण जरि शिला हो तींत घे ईश वास
तरि न मग कसा तो चित्तिं पावे सुवास ८५
लव विसर तयाचा बुद्धिनें घेतल्यास
मन भटकत जातें कर्दमाच्या पथास
सुखभरित गमे तो मार्ग त्या फार फार
परि मन विकलत्वें मानितें अंतिं हार ८६
विसर भगवताचा घे न बुद्धी जराही
तरि तनमन याची ती बने प्रेमवाही
सरस निरस खोटे मार्ग दावी खुणेनें
अमित सुखरसाचा स्वाद देती कृपेनें ८७
सुहृद भगवताची दाट छाया समस्तीं
प्रसारित नजरे ये कां तरी मान मस्ती
मनुज भारि पणाला हंकृतीच्या भरानें
विकलित मति होतां शोधि सौख्यार्थ रानें ८८
शुचितर मन नोहे तोंवरी सौख्य रानीं
गिरिं कुहरिं मिळेना निर्जनीं कीं विरानीं
शुचि मतित महौघें संचतें तें मधूसें
मन पिउनि तयातें हो नवोढा वधूसें ८९

विकृति मग मनाच्या जाति साऱ्या विरोनी
मरिचिकिरणयोगें गार जैं होइ पाणी
तम–निशिसमयाच्या चक्ररंध्रीं बसोन
कुमति सहचरांचें चित्त घांसे कसोन ९०

सुमति सुखमयत्वें दे जिवा तेंच रूप
अविरल सुखि ऐशा तो[1] बघे विश्वरूप
तनु उटजि[2] वनीं कीं राजवाड्यांत राहो
निढळ सुख जराही हीन ना अंतरा हो ९१
अवयवगति साऱ्या कर्मभोगांत जाती
श्रवण नयन नासा पाहती एक जाती
सुख सकळ रसांचें एक–ना की विजाती
रस विरस ह्मणोनी सौख्य होवी सजाती ९२
विहित[3] कृति फलाची नाश पावे अपेक्षा
अहितकर फलींही संच घेवे उपेक्षा
सुगति विमति लाटा येति कर्म प्रवाहें
तनु जड तरणीसी त्यांत आपेंच वाहे ९३
घटधृतनभ जैसें भिन्न नोहे महाशीं[4]
मन मति धृति जीव–ब्रह्म तें एक राशी
ह्मणुनि घट फुटे तो हो महाकाश सारें
मन मति ममतेच्या मोडिं आत्मा प्रसारें ९४
हृदयगतविकारां मोडती देव देतां
बळकटि मनिं येते व्हावयालागिं जेता
विनय सुहृद झाल्या अंतिं दुःखा ठिकाण
कुठुनि उरुनि राहे वज्रपातासमान ९५
कपटहि पळ काढे चोरचित्तीं बसाया
तिळभरि न मिळे त्या सन्मनामाजि छाया

---

१ जीव · २ कुटींत ३ शास्त्रोक्त ४ महाकाशापासून

परि छळ करण्यातें सज्जनाचा तयार
वृकसम मुख वासे स्वार्थसिद्ध्यर्थ यार
कपट पळुनि जातां तुष्टि अर्ध्या मनास
विकसित करि जेंवी अष्टमी चन्द्रम्यास
निजतनुहितबुद्धी तुष्टिदीप्तींत लोपे
मग सुमन विकासे पौर्णिमा चन्द्ररूपें १७
तदुपरि परकार्जी देह लागे झिजाया
न तनु मम उरे कीं प्रीतिची माझि जाया
सदयहृदययोगें तो बने लोकमित्र
किरणसमसमत्वें जेंवि आकाशमित्र १८

लक्ष्मण गणेश नावेलकर.

---

## श्रीअंबिकादर्शन.

कोणी अल्पवयस्क स्त्री आपलें दोन महिन्याचें बालक घेऊन देवीच्या दर्शनास गेली; तेव्हां देवीच्या दर्शनानें तिच्या मनांत उद्भवलेले तरंग तिनें देवीस समर्पण केले. त्याचें वर्णन खालील पद्यांत केलें आहे.

श्लोक.

श्री अंबे सुतलाभ त्वां मज दिला ! मातापदा पावलें.
ह्या संसारतरूस सुंदर फळें येती कशी दाविलें.
तूं आदीप्रकृती तुझीच सगळी हें विश्व रम्या कृती.
इच्छेनें तव सर्व गोष्टि घडती चाले जगत्संस्थिती. १

सृष्टीचें घडण्यास दर्शन मला मातापिता कारण;
सत्वांशें असती परंतु सकला तूं कारणा कारण.
नाहीं कारण मात्र तूस, तुजला तूंच स्वता कारण
सर्वव्यापक विश्वदेवि ! नसशी तूं भिन्न सृष्टीहुन. २

ज्यानीं जन्म दिला, लळा पुरविला सप्रेम संगोपिलें,
त्या मातापितरास सोडुनि कुळीं मी पारक्या राहिलें
भर्ता कोठिल, कोण, तो परि मला झाला जिवाचा सखा
सृष्टीचा क्रम हा विलक्षण पहा चाले सदा सारखा. ३

मायेचा तव खेळ हा निजगुणें विस्तारिला अद्भुत.
आहे केवळ त्यामुळेंच सगळी विश्वस्थिती चालत.
मायेच्याच मुळें समस्त सदसत्कार्यें जगीं वर्तती
तीतें आवरितां क्षणांत जग हें पावेल शून्यस्थिती, ४

विश्वाची जननी अगाध करणी माये तुझी अंबिके.
पूर्णत्वें तव रूप कोण सुमती जाणावयाला शके ?
मी आहें मतिमंद मूढ अबला कांहीं कळेना मला.
जाणावें अथवा कसें न कळतें मीं ओळखावें तुला. ५

आपोआप परी विशुद्ध हृदयीं त्वत्कल्पना उद्भवे.
तेथें ती स्थिर होउनी विहरतां थोडें तुला जाणवे.
सारें दुःख हरे तशीच मिळवे विश्रांति त्वच्चिंतनीं
होतो लाभ असा अपूर्व न तसा लाभे दुज्या साधनीं. ६

झालें पुत्रवती जगीं लवकरी ही मानिली धन्यता.
झाला हर्ष किती असेल मजला शद्वीं न ये वर्णितां
जन्माचें फळ पावलें सहजची स्त्रीत्वास ये सांगता.
झाला लाभ अलभ्य ही तव कृपा मानीतसे तत्वता. ७

मोठे लाभ जरी अनेक असती एकाहुनी एक ते;
त्या सर्वां परि पुत्रलाभ अगळा कान्ता मनीं मानिते.
देऊनी सुत देवि ! भाग्य उदया माझें तुवां आणिलें.
संसारीं सुख काय तें अनुभवें मातें खरें दाविलें. ८

नांवाची सरिता असूनि न मिळे प्यायास [illegible] जरी,
नांवानें नुसत्या तिला न ह्मणती [illegible] मोठी तरी.
तोयावीण नदी तशीच वनिता शोभे न पुत्राविणें;
मानी खेद मनीं, किती तरि तिचें धिक् तीस वाटे जिणें. ९

त्या दुःखांतुनि मुक्त देवि ! मजला केलें तुवां सत्वर.
केला जो उपकार तो मजवरी लोटी सुखाचा भर.
कारुण्यास तुझ्या न पार, ह्मण मी आहें तुझें लेंकरूं
कांहींही न कळे तुझा स्तव तरी माते ! कसा मी करूं. १०

ज्या गेहीं गृहरत्न बालक नसे तें कां जसें कानन,
शृंगारें भरलें असो, सजविलें रत्नें हिरे जोडुन.
जेथें बालक खेळतें गृह असो तें मोडकें झोंपडें,
आनन्दास सुखास पार न, उणें कांहीं न तेथें पडे. ११

आली सोज्वल मद्गृहास गृहता अंबे ! प्रसादें तव.
आह्मी दीन असूनि थोर गणिलें जें लाभलें वैभव.
संसारीं सुतहेतुलाभ पुरला, झाला विसावा जिवा.
ह्याला कारण एक तूंच असशी देवी ! भवानी ! शिवा. १२

" मी " शब्दांतचि मीपणा सहज तो " माझा " पदीं ही वसे;
" माझा पुत्र " ह्मणून मी न ह्मणवें, देवी ! तुझा गे असे.
झालें मी जननीनिमित्त तनुजा " कर्तृत्व कोणाकडे " ?
मोठें गूढ तथापि तत्व सहज प्रश्नांत ह्या सांपडे. १३

देवी ! बाळ तुझें ह्मणूनिच तुझ्या ओटींत हें घातलें,
ज्यानें मातृपदीं मला चढविलें सौभाग्य संवार्धलें,
जें जीवास विरंगुळा, प्रिय गमे प्राणाहुनी जें खरें,
ज्याचें दर्शन दुःखताप सगळा होता क्षणीं ओसरे. १४

देवी ! बाळ तुझें तुझ्याच चरणीं ठेऊनि जावें; परी
माया लोभवितें ह्मणूनि परतें मागूनि नेतें घरीं.
माया ही अति दुर्धरा न सुटली कोणासही निश्चयें
माझा पाड तिच्यापुढें तरि किती, हें जाणसी तूं स्वयें. १५

सर्वस्वी [illegible] बाळ मी तर असें संगोपिती केवळ.
साह्यावाचुनि मी तुझ्या खचितची तद्रक्षणीं दुर्बळ.
त्याचें पालन तूं ह्मणूनि करवीं सप्रेम माझ्या करीं.
आई बाळ ह्मणो, ह्मणोत जनही दाई परी मी खरी. १६

ह्या लोकीं सगळेंच नश्वर असे, कांहीं नसे शाश्वत.
त्याचा होइल अंत जें उपजलें, सिद्धांत हा निश्चित.
मी माझें ह्मणतें परंतु न मुळीं माझीच कीं शाश्वती;
पुत्राची वितरी तथापि मजला देवी! सदा संगती. १७

माया ही न सुटो परंतु तुजला ध्यातां मनें निर्मल.
संसारीं असुनी तया तव कृपा देई स्वयें मंगल.
मागावें तरि काय अन्य तुजला? त्वत्भक्ति देई सदा
देवी! तुच्छ जगांतली तिजपुढें सारी गमे संपदा. १८

लाभो अक्षय **नागलाल** सुत हा स्पर्शो न त्या आपदा.
मोठा होउनि तो मला सुखविता होवो सदा सर्वदा.
वंशा भूषणभूत होउनि कुलोद्धारार्थ वर्तो स्वये.
द्यावें हेंच ठकूस वी प्रणमनीं प्रार्थी तुला निश्चयें. १९

जे कां मद्हृदयीं तरंग उठले देवी! तुझ्या दर्शनें.
त्याला कारण तूंच यास्तव तुला ते अर्पिले सन्मनें.
देवी! मी तुजवाचुनी न दुसरी जाणें जगीं देवता.
भावीं देव गणूनि भक्ति तुजला ही अर्पितें तत्वता. २०

प्रार्थिलें तुजला देवी! निश्चयें दृढ भक्तिनें
संसारीं दुस्वरीं तारी, कांहीं नेदी पडूं उणें.

गन्धर्व कवि.

# माझें दैवत.

श्लोक.

मुखीं चारीं ब्रह्मा त्रिपुररिपु पांचांहि वदनीं
तया साहीं स्कन्द प्रमुख फणि निःशेष वदनीं
भवानी त्वद्रानीं कुशल असुनी होति लटिके
तिथें कैंचा कात्यायनि जडमती हा जन टिके १

घृतक्षीरद्राक्षामधुरमधुमाधुर्य सगळें
कवींही शब्दांही विषय रसनेचा नच कळे
तसें त्वत्सौंदर्य प्रकट परमेष्ठीसचि असे
श्रुती जेथें थाके इतर नर त्या वर्णिल कसें २

मुखीं वीटी[2] लोला नयनयुगुलीं कज्जलकला
गळां मुक्तामाळा निटिलें[3]फलकीं केशरटिळा
स्फुरे कांची शोभे कनकपट जीच्या कटितटीं
मनोभावें ठेवूं नगपतिसुता ती स्मृतिपुटीं ३

विराजे मन्दारद्रुमसुमनमाला स्तनतटीं
सुनादें ताटंकद्वय डुलतसे यत्श्रुतिपुटीं[6]
कृशांगी मातंगी[7] गजगति सती तीन जगतीं
मृडानी मीनाक्षी विलससि सदा तूं भगवती ४

---

१ ब्रह्मदेवाला २ विडा ३ कपाळावर ४ मेखला ५ कर्णभूषण [ बाळवड ] ६ कानावर ७ पार्वती

स्वतेजें जे बा[1]लारुणकिरणभा तुच्छ करिती
सुवर्णालंकार प्रवर तनु जीची खुलविती
असे विद्युत्वर्णा वसन पिंवळें जी कटिं कसी
शिवाची अर्धांगी निरवधि सुखा देउं मजसी ५

हिमाद्रीं जी जन्मे सुबककर ही पल्लव जिला
सु[2]मुक्तें हीं पुष्पें [3]अलक [4]अलिसे वाटवि मला
वरी [5]स्थाणुस्थाना सतत कुचभावें अति नवा
हरी आर्ती हाले वचन सरसा चित्सुखलता ६

दलांनीं पुष्पांनीं खचित असती पुष्कळ लता
फलांनीं त्या होती झडकरि जनांते बहु मता
[6]अपर्णा सेवावी सकल मनुजीं एक बरवी
पुराण स्थाणू ही वरुनि जिस मुक्ती त्वरित वी ७

सा[7]वित्री धर्माची गमसि भुवनीं वेदजननी
लता तूं अर्थाची लवति धनदादीक चरणीं
[*]प्रसू तूं कामाची स्मरमथन अर्धांगे असती
सुमुक्तीचें बीज प्रथित परम ब्रह्ममहिषी ८

तुझी भक्ती माझ्या जरि न चलचित्तांत विलसे
कृपापांगा तूझ्या जननि जन हा योग्यचि असे

---

१ सकाळच्या सूर्यकिरणाच्या प्रकाशास २ मोतीं ३ केश ४ सर्प
५ मुंधा [ शंकर ] ६ पार्वती ७ माता * प्रसविणारी

स्वयें वर्षी वारी मधुर जलमुक् चातकमुखीं
विधीनें मोहावें मम मतिस कां सांग सुमुखी ९

कृपादृष्टीं पाहीं शरण शिशु हा शर्वदयिते
उपेक्षा शोभेना पळभरिं तुला साधुचरिते
न अर्पी मंदारें क्षण न लगतां कल्पित जरी
जनां का वाटेना इतर तरुसा तो वनिं तरी १०

धरोनी विश्वासा तव पेंदसरोजीं अति दृढ
न माते मागे मी इतर अमरां आश्रय जड
जरी आतां माझ्याविषयें वरिशी तूं अदयता
तरी मातें तारी कवण धरुनीया सदयता ११

जसा स्पर्शें लोहा पारिस करितो हेम उजळ
जसें गंगावारी विमल करितें वीथिसलिलें
कृपालेशें माते सहज जरि मातें निरखिशी
मनःपापें माझीं जळुनि शुचिता येइल मशीं १२

न नेमानें देती सुर इतर ते वांछित फळ
स्वदासां द्याया तूं विपुल जननी एक कुशळ
पुराणब्रह्मादित्रिदश वचना याच वदती
तुझ्या पायीं देवी मम मन धरो संतत रती १३

---

१ मेघ २ शंकर ३ कल्पवृक्ष ४ पादकमळ ५ देवांला ६ मार्गे रस्त्यावॉल पाणी. ७ इच्छा

छवि त्वद्रूपाची स्फटिकमणिभित्तींत विलसे
विलासाच्या सौधीं[2] चलविधु सदैव स्फुरतसे
मुकुन्दब्रह्मेंद्रप्रमुखसुर दास्यत्व वरिते
तुझ्या द्वारीं ऐसे तव गृह असे ईशदयिते १४

वसे जी कैलासीं सुरगण जिचा बंदिनिकरें
जिला ऋद्धी सिद्धी सकलहि सदा जोडिति कर
महेश प्राणेश त्रिभुवन जिची संतति सरी
तिच्या सौभाग्याची कधिं न पवते वस्तु दुसरी १५

दिशा वस्त्रें ज्याचीं विष अशन ज्या वृद्ध वृषभ
असे वाहक्रीडास्थळ शैवघरा ज्यास अशुभ
भुजंगांचे अंगावरि धरि अशी ही स्थिति जरी
तुझ्या सौभाग्यानें अमरवरता शंकर वरी १६

जगाच्यासंहारविषयिं मति ज्याची अविरत
श्मशानीं जो राही पशुप वपुला फासी भसित
धरी कंठीं हालाहल वरुनि तोही सदयते
तुझ्या संसर्गाचें फल जननि हें स्पष्ट दिसतें १७

तुझ्या सौंदर्याते निरतिशय पाहोनि सुनये
मयें गंगा झाली जळमय नगाधीशतनये
शिरीं ठेवी तीतें निरखुनि,तिचें म्लानवदन
प्रतिष्ठेते तूझ्या प्रकटवि वदा भालनयन १८

---

१ भीतींत २ गच्चीवर ३ माढ ४ खाणें ५ स्मशान ६ भस्म

तयामाजी सांठे सकल सुमनांचा परिमळ
तुझें आई आहे अति रुचिर अभ्यंग सलिल
विधाता त्यामाजी तव पदरजाते मिळवुनी
अनायासें निर्मी अमरगणिकावर्ग जननी १९

वसंतीं पुष्पांहीं बहुविध लता वेष्टिति जया
जिथें नाना पद्में फुलवि करिती हंस सुरवा
सखीसंगें केली करिशि असल्या सुंदर जळीं
अशा तूतें ध्यातां मनुज न पडे संसृतिमळीं २०

दंडी कवि.

## नीच लोक.

श्लोक.

जो स्वीयधर्मास कदा न वंदी । जो अन्य धर्मास सदैव निंदी
वागे न बोलापरि जो जगांत । त्यातें असाधू बुध बोलतात १
पाळी स्ववर्गाश्रमधर्म नाल्प । जो वाढवी वैरि सदा अमूप
ज्याची गती हो न शमादिकांत । त्यातें असाधू बुध बोलतात २
ऐके कधींही गुरुभाषणा न । मान्यास जो देइ न अल्प मान
वांच्छी परस्त्रीधन जो अपूत । त्यातें असाधू बुध बोलतात ३
आशा धरोनी करितो कुणास । जो दावितो दुर्जनता कुणास
अन्यापकारीं रमतो नितांत । त्यातें असाधू बुध बोलतात ४
पाही परेशास न सर्वभूतीं । नाहीं जयाला सम वस्तुजाती
मी आणि माझें पढतो मनांत । त्यातें असाधू बुध बोलतात ५

दंडी कवि.

जून १८९५, वर्ष ८ वें.

# काव्यरत्नावली.

## अंक ६ वा.

### भाग २ रा.

( युद्धाचें कारण मानापमानवर्णन. )

आर्या.

न समर्थ रक्षणा निज भोंकावें बहु तथापि शुनकानें[1]
ऐके कसा सुखानें सत्पक्षविजयकथा[2] पिशुनेकानें[3] १

दूतमुखें ऐकुनि कीं ' माजवि बहुत प्रताप[4] हा[5] ! निकर[6] '
रागानें अति अकबर योजी रीत[7] प्रतापहानिकर २

यममहिषविषाणकुटिलतरमति–यवनेशयोजना[8] साची
कुठली असेल ? न निघे वेश्याकन्या सुशिल नवसाची[9] ३

---

१ कुतऱ्यानें २ खऱ्या पक्षाच्या जयाची बातमी ३ अधम हलकट ४ प्रतापसिंह ५ हाय ! ६ कहर ७, * प्रतापाच्या नाशाचा उपाय ८ यमाच्या रेड्याच्या शिंगाहूनही वांकडी आहे मति ज्याची असा यवनेश – अकबर त्याची योजना–युक्ति, साची ( सरळ कुठून असणार ) १० नवसाची झाली म्हणून काय सुशील निघेल.

अंतर्भेद क्षात्रीं प्रथम कराया प्रयत्न तो करितो
सामिष बहु घालुनिया गेळ हळुं हळुं अमति मीन तो धरितो ४
कोणा पदवी देई नुसती दुसऱ्या कुणास मानकरी
दरबारचा करोनी, मिंधे सर्वां जणां समान करी ५
कित्येकां धनदानें कित्येकां कोरड्याच थापांनीं
परतंत्रता विषाच्या करितो उद्युक्त सर्वथा पानीं ६
सोयरिकीची भारी क्षात्रासमवेत हौस यवनातें
जोडूं पाहे त्यांशीं जेथें साधेल तेथ नव नातें ७
न्यायान्याय न पाही न्याया क्षत्रियसुकन्यका हरुन
आसुरविवाहमार्गें सार्थ असें स्वासुरत्वही करुन ८
मद्वाणी बहु भीते सांगाया कोण कोण यवनाशीं
सख्य स्वमतें करुनी तयार झाले स्वसत्वहननाशीं ९
वाटे त्या अधमांच्या नामोच्चारें जिभेस पाप डसे
माझे सुवर्ण त्यांच्यालिं भाजतीच पांपडसे १०
हाय परी काय करूं तन्नामोच्चाररूप कटु कचला
सेवाया म्यां माझ्या दुर्दैवातें प्रकार हा रुचला ११
भगवान्दास जहाला जयपुरचा प्रथम मित्र यवनातें
सेव्यत्वा गमवुनि निज दासाचें मिळवि नीच नव नातें १२
दुसरा त्या अनुसरला मेंढीसा मारवाडभूपाळ
परतंत्रा कुगर्ती पडला ज्ञातीस होउनी काळ १३

---

१ लालूच २ गळ आग्रह व पाश ३ निर्बुद्ध ४ आपलें राक्षसत्व ५ आपलेपणा घालविण्यास ६ चांगले शब्द व चांगले लोक ७ पापडाप्रमाणें * दुसऱ्याकडून सेवा घेण्याच्या अधिकारास ९ दुष्ट [ अति खोल ] खाड्यांत १० यम, शत्रु

शिक्षा लावायातें प्रतापसिंहास येइ यवन[1]
उतरे कर्णपुरीं[2] तैं कुपुत्र हे त्यास जाउनी मिळती १४

निजभूकुपुत्रतातसहित[3] उदेसिंग जाय नागोरा[4]
सामोरा दिल्लीशा काळें करण्या निजानना[5] गोरीं १५

बहु हीर माणिकांचा आणी कांचा स्वगेहिं सांठविण्या
नजराणा यवनेशा मूढ उदेसिंग धर्म बाटविण्य १६

होय बडेजांव बहू किताब त्या यवन दे ' बडेराजे '
मज वाटे मूर्खांचे न तरी हें पद कसें अशा साजे १७

*पदवीदानग्रहणा याचकसे थोर जाति रजपूत
स्वातंत्र्योत्तरकार्यीं दशदाना जेवि कौरटे पतित १८

भूमातेस-रुचावे कसे असे शीलहीन रजपूत
वद्वंशीं पतिता करि पुनरपि येत्पादधूलिरज पूत १९

मंदोडराव मिळवी ' साधाराजा ' किताब त्यासमयीं
यापरिं कितीक नीचीं केलें निज वीरभूम दासमयी २०

---

१ अजमीर २ वाईट मुलगा ३ आपल्या भूमीचा दुष्ट मुलगा अशा आपल्या बापानें पाठविलेला ४ शहर विशेष ५ आपल्या तोंडास ६ निष्कलंक असा तो मानसिंह ७ मानमान्यता * ह्या पोकळ पदव्या उपटण्यास ९ स्वातंत्र्य रूप पुरुषाच्या सपिंडीस १० उत्तर–कार्याच्या वेळेस दश दानें प्रमुख आहेत व दानें चांगले ब्राह्मण घेत नाहीत ११ करंटे कर्महीन ब्राह्मण १२ भ्रष्ट १३ अबरू अभिमान नाहीं ज्यास असे १४ ज्यांच्या पायानें उडालेल्या धूळीचा कण १५ गुलामांनीं भरलेली

कनोजराजपुत्रा उजव्या हातास मान दरबारं।
लाजे; कपटरतांची अरिजयें-पद्धति समान दर बारीं २१
हे सर्व भूप झाले भ्रष्ट जगीं मूळचे अहीनें-कुळ
ते हि प्रताप झाले परस्परांतें जसे अही नेंकुळ २२
असले अदूरदर्शी निजजात्यभिमानशून्यें नर मोहें
आपपरांचे घातक तत्स्ववनीं क्षणहि चित्त न रमो हें २३
नजराणाचि न देउन राहे तो मालदेवपुत वैर
उपवर निज कन्येला ठरवी तो यवनराजपुत्र वैरें २४
कैसा बुगळा होइल संमत वर हंसकन्यकेला हो
परि या मूढें तिजला बळेंच अग्नींत लोटिलें कीं हो ! २५
लावावें दुर्गंधित नेवोनी पूज्यदेह तुळशीला
तसेंच हेंहि केलें मूढें नेणून आत्मकुळशीला २६
कन्याविक्रय हा त-त्तातातें होय लाभदायकसा
उतरे मान तयानें बहु जड झाला परी तदीय कसा २७
गोद्राडोज्जन देवल-पुर बडनावर असे तया देश
चार मिळाले यवनाकडुनी वरती सुरेख उपदेश २८

---

१ कपटांचा उपयोग करणाऱ्याची २ शत्रु जिंकण्याची रीति ३ प्र-त्येक वेळेस ४ उच्च कुळांतले ५ साप ६ मुंगूस ७ पोंच नाहीं असे
* जातगोताचा अभिमान किंवा चाड ज्यांस मुळाच नाहीं असे
९ वरती आणखी १० अकबराचा मुलगा ११ नवरा मुलगा
१२ मानानें कमी झाला [ अबरू कमी झाली तरी ] १३ कसा खिसा पैसा वाढला खिसा उगच जड झाला पुष्कळसा कीं मानेला वाग .सुन मान उतरे [ अंगरख्याची ]

तदनुकरण बहुतांनीं केलें जयपूर त्यांत अग्रगणी
मुखदर्शनही त्यांचें स्नानार्हचि मनिं चितोडभूप गणी २९
स्वज्ञातिबांधवांच्या नीच कृतींनीं प्रताप खळवळला
चित्तीं कढला पाहुन शत्रुकडे सकळ निखळ खेळ वळला ३०
फुगला बेडुक भक्षुन साप तसा शत्रु तो प्रतापाचा
कष्टें सुधेस खाउन राहु छळी तो रवि प्रतापाचा ३१
राहुग्रासित असतां रवि त्यांशीं जेविं काजवा नावें
लावी बरोबरीचें तैसे रजपूत या जवानातें ३२
यांशीं स्पर्धा करिती सारे रजपूत हा परी मानी
पवित्र वयांना स्वमनीं निज धर्माचा सदैव अभिमानी ३३
यवनांच्या लागे ज्या सोयरिकीचा न डाग ते मात्र
होती प्रताप—मित्र स्वधर्मसेवक पवित्र तत्क्षात्र ३४
भ्रष्टांतें जो कन्या देइल तो न प्रजा असे माझी
वा त्यांची करिलहि जो प्रसिद्धि करि तो अशी जनामाजी ३५
जो जो कोणी ज्या ज्या वेळीं मोडील अधम हा नियम
त्याची प्रताप करिलचि, करुं न शके जी कधींहि हानि यम
हें सोंवळें प्रतापें चालविलें निस्पृहें सदा मानें
लोकींहि पाळिलें तें त्याच्या भुलले कधीं न दामानें ३७

---

१ विटाळ झाल्याप्रमाणें समजून त्याच्या शमनार्थ — आंघोळ करण्या सारखें २ केवळ दुष्ट किंवा वेडे दुर्मति ३ प्रतापसिंहाचा; प्रतापाचा शत्रु शौर्यहीन; नामर्द ४ प्रतापाचा — शौर्याचा रवि—सूर्य असा प्रतापसिंह ५ ग्रहणांत निस्तेज झालेला ६ मर्दांनें, शूराबरोबर ७ समजे * खरे क्षत्रिय ८ मुसलमानांस मुलगी देऊन बाटलेले १० पैशाच्या लालचीनें वगैरे गुंतले नाहींत.

वृत्तान्त हा इकडचा तिकडे शत्रूस जैं सकळ कळला
स्वार्थार्थि दुष्ट परि तो सुशील अकबर मनांत कळकळला ३८

' न करीं युद्ध तुझ्याशीं ' इतकें जरि हा प्रताप बोलेल
विजयानंदीत करि हा अकबर चित्तांत नित्य डोलेल ३९

' मोठें राज्य तयाला देउन त्यातें स्वमित्र मानीन
त्याचें न सोंवळें मी यत्किंचित या जगांत मळवीन ' ४०

यापरि अकबर बोले ' धन्य खरा मी जया प्रतिस्पर्धी
ऐसा कीं ज्यापासुन कोण असे जो जैया प्रतिस्पर्धी ' ४१

कळवी दुतांकरवीं अपुली इच्छा तशी स्वसदरीतें
न वळे प्रताप परि त्या ' कोण ' वदे ' घेइ पाप पदरीं तें '

दक्षिणविजैया अकबर धाडी जैयशील मानसिंहास
जयपूरभूपपुत्रा ज्या रणिं, वनिं जेविं, मान सिंहास ४३

दक्षिणजय तो करुनी परते मार्गीं प्रतापसिंहास
भेटाया येइ जसा कोल्हा दावूं प्रताप सिंहास ४४

होता प्रताप तेव्हां अपुल्या देशांत कुमळमेरास
जेथें दुर्ग[१०] तयानें अभेद्य रचिला कशांहि शूरास ४५

---

१ मतलब साधण्याच्या कामीं मात्र हवा तसा दुष्टपणाही करणारा २ परंतु हाडाचा कोंवळा व सहृदय ३ मोठी फत्ते झाली असें समजून आनंदांत ४ शत्रु ५ फत्ते ६ इच्छा करितो प्रतापसिंहाशीं विरोध करून त्यालीनें जय मिळवीन असें ह्मणणारा कोण आहे ? कोणी नाहीं कदाचित् एक मी गाजेन असा अकबराचा हेतु. ७ दक्षिणदेश जिकण्यास * विजय मिळवून येणारा. ९ जयपूरच्या राजाचा मुलगा १० किल्ला
० अति बळकट.

सन्मान मानसिंहा सामोरें उदयसागरावरतीं
जाउन दिला प्रतापें न उणें पडुं दे कुठेंहि पाव रती ४६
बहुसाळ गोड भाषणिं गौरवुनी त्यास मेजवानीला
बोलाविलें तयाचा उघड पराक्रम दृहांत वानीला ४७
साजेल योग्यतेला अपुल्या त्याच्या असाच थाट करी
मखमालीची त्यातें येण्या तो डोंगरांत वाट करी ४८
परि त्या निज पंक्तीचा देण्यास न मानराव सिद्ध असे
ठावें न परी माना धुंदा तद्व्रत जगप्रसिद्ध असें ४९
सर्व तयारी होतां बहुमानें मानसिंह बोलविला
थाटें अनुजनसह तो संतोषानें दृहांत डोलविला ५०
ठेउन उमरावातें तत्सेवेला प्रताप तापाचें
मिष करुनीया निजला माना तोंड न दिसे अपापाचें ५१
आतां येइल येइल मग ऐसें त्या उगीच वाटतसे
स्वातिरसास्तव बघती ग्रीष्मि घनाची चकोर वाट तसे ५२
परि कांहीं काळानें विनवी उमराव भोजना त्यानां
तेव्हां प्रताप नाहीं येत अशी खूण पटलि सर्वांनां ५३
मान पुसे उमरावा तात तुझा कां न येथ रे दिसतो
त्यावांचोनी आह्मीं एकाकी केविं भोजना बसतो ५४
उमराव उत्तरा दे प्रकृतीस स्वास्थ्य नाहिं ताताच्या
माने न मानसिंहा उत्तर हें, सर्व चित्तिं ये ज्याच्या ५५

---

१ प्रतापसिंह २ सर्वांस जाहिर झालेले ३ आपल्या लोकांसह ४ प्रतापाचा मुलगा हा केवळ आठ वर्षांचा होता ५ शुद्ध—आचणानें अशा प्रकारसिंहाचें ६ स्वातीच्या पावसाच्या पाण्याकरितां ७ चातक पक्षी.

मान ह्मणे ' मीं जाणे कारण त्या व्हावयास ही विकृती
परि त्यास एक कळवा सादर माझी पुन्हां अशी विनवी १६

कीं भूत गोष्ट आतां परते न प्राणदानही करितां
पश्चात्तापें जळत्या, सूज्ञा न गमेच सौख्य टोकरितां ५७

कन्या दिली न दिधली शुद्धि तया आपुली परी स्वांगें
नाहीं तसाच केला कांहीं संसर्ग अन्य त्यासंगें ' ५८

' निज कन्या यवनासी अन्यायवना दिली अशासंगें
भोजन करितां मानी मी कीं मद्वंशशुद्धता भंगे ' ५९

प्रत्युत्तर यापरिचें प्रताप वदला तयास शेवटलें
जें त्याच्या नाकावर, ताकावर मोहरी तसें, वैठलें ६०

अपमान हा न साहे माना रागें तसाच तो उठला
नमुनी पुढल्या अन्ना दुरुनी, स्पर्श न करून पात्राला ६१

इतक्यामाजी तेथें राणा आला तयास पाहून
' मानवें दे ' मान वदे ' काय कुणा मान ईश्वराहून ' ६२

' आह्मी अपुल्या बहिणी दिधल्या यवनांस, राज्य राखाया
निर्वंध नित्य तुमचें टपलों ज्यातें सदा जैरा खाया ६३

तो आणखीहि बोले कीं गेला मान आमुचा जावो
त्यास न उपाय आतां झटवों तुमचा परी जगीं राहो ६४

---

१ मी स्वतां २ अनीतीचें अरण्य अशा- अन्यायी ३ चुरचुरलें ४ प्रतापसिंह ( उदेपुरच्या राजासचे हा किताब आहे ) ५ मनुष्य काय कुणाला मान देणार आहे ह्मणजे थोरपणा देणार आहे. त्या कामाला समर्थ एक ईश्वरच ६ अबाधित ७ जुनेपणामुळें आलेली अशक्तता ह्मातारपण.

इतकें असुनीहि जरी आह्मांविषयीं मनीं जनीं धरितां [*]
वैषम्यभाव[1] अपुल्या हस्तें अपुलीच हानि हो करितां ६५
राखा मान कुलाचा नेकुलाचा[2] गुप्तपंथ सोडुनिया
धोका न येउं द्यावा रक्षा राज्यास कीर्ति जोडुनिया ६६
दावा मज मी बघतों टिकतें पाऊल केविं देशीं या
तुमचें तुह्मी न जातां कोठवरी शरण हो विदेशीयां[3] ६७
निसटेल ही चढाई आतां जरि सौख्य देइ चित्तास
रडवील सर्व तुमच्या नयनांतुन[4] उतरवील पित्तास ६८
राणा वदे तयाला येवो आला तसा प्रसंग तरी
आह्मास एक ठाउक तारक जगतीं स्वधर्मसंग—तरी[5] ६९
या उत्तरें चढे तो रागावरती तसा हैयावरती[6]
चालू लागुन वळुनी बोले राण्यास उत्तरें सरतीं ७०
हा मान मान तूझा खालीं उतरील सार्थ मान तरी
तेव्हां कळेल तुजला तारक जगतांत एक मान तरी ७१
प्रत्युत्तर दे राणा आहे आनंद त्यांत फार मला
जाणुन बुजून जो नर सर्पबिलामाजि सर्वथा रमला ७२
परि मान[*] मान[7] माझें आण[8] तुला आण[9] जाण येतांना
मन्मान घालवाया[10] अकबराचा[11] अपुला मदीय रणसदना[12] ७३

---

[1] वैरभाव २ मुंगसाचा ३ परकीय लोकांवर ४ डोळयांतून येणाऱ्या पाण्याच्या रूपानें आपणांस आह्मास पाहून चढणारें पित्त उतरेल ५ होडी ६ घोड्यावर, राग येउन त्यासरसा तो घोड्यावर बसला ७ [नावाचा मानसिंह असें] ह्मण.* ऐक ९ शपथ १० बरोबर घेऊन ये ११ अकबर १२ युद्ध भूमीरूप माझ्या घरास

थावर निघून गेला टवकारुन मान तो विमान तसा।
अश्व तयाचा सत्वर लपवी त्या क्षितिजिं जो घरानतसा ७४

माना या दहशतिला प्रताप न धरी मुळींच निज चित्तीं
सागर-गंभीरांची वांडदलाच्या रवें ढळे शांती ? ७५

मानाच्या दृष्टीनें वासानें अन्न बाटलें ह्मणुनी
टाकुन दिलें तयानें विषसम तें सर्पदृष्टपय गणुनी ७६

झाडून सारवूनी स्थलिं त्या शिंपून गोमयांगंगा
शुद्ध तयानें केली सारी तेथील आपुली जागा ७७

भांडीं कुंडीं सारीं पावकिं टाकून केलिं पावन तीं
संसर्गजन्यदोषापासुन मुक्त्यर्थ सर्व घरभूती ७८

स्नानें सचैल केलीं तत्स्पर्शाचा विटाळ दवडाया
या नांव सोंवळें हें शोभे, इतरांस सर्वथा वाया ७९

नारायण कृष्ण. गद्रे.

---

१ मानरहित ओशाळलेला, पक्षी विमानाप्रमाणें २ ( लाजून ) जमिनीकडे तोंड केलेला पक्षी भूमीस नमस्कार करणारा [ वेगाविशयानें ] 'विमान व धरानतसा' हे दोन्ही शब्द मानसिंहाची मानसिक स्थिति व घोड्याचा वेग दाखविणारे आहेत. ३ समुद्राप्रमाणें शांत अशा प्रतापसिंहाची ४ ताडाच्या पानाच्या नादानें ५ स्थिरता पंख्याच्या हलण्यानें अथवा आवाजानें समुद्र खवळेल काय ? ६ सापानें पाहिलेलें दूध ७ गाईचें शेण गोमूत्रादि. * विस्तवांत ९ घर धुणें

# माझें घर

श्लोक.

एकाकि मत्स्थितिंत अंतर काय झालें
माझें स्वतंत्रपण हा विलयास गेलें
हा हेम–पिंजर बघूनि कुबुद्धि केली
हा ! भूल केविं पडली मति गुंग झाली. १
स्वच्छन्दवर्तन अतां मज नष्ट झालें
माझे स्वकीय जन ते मज दूर झाले
माझ्या नवीन हिरव्या मृदु खाद्यपेयां
मी आज सांच मुकलों, फसलों गृहीं या २
येथें न आज दिसतो गण पक्षियांचा
तैसाच संघ दिसतो नच पादपांचा
दैवा ! दिसे न मम सुंदर नीड कोठें
हा ! हा ! जगीं विफल जन्म मदीय वाटे ३
हा पिंजरा सुघडसा जरि कांचनाचा
बंदींत वास मम येथ असेच सांचा
स्वातंत्र्यसौख्य न मिळे कसल्याहि वाटे
स्वातंत्र्य यापरिस तें मम गोड वाटे ४
यावें मनास जयिं बाहिर जावयास
माझ्या घरीं मज नसे प्रतिबन्ध खास
जावें उडोनि गगनीं परतोनि यावें
किंवां सुखें सतत वृक्षशिरीं बसावें ५
हा पिंजरा सुघडसा करण्यास सारी

कारागिरें कुशलता जरि खर्च केली
मज्जन्मवृक्षघरटासमसौख्य कोठें
नाहीं ह्मणूनि मजला बहु दुःख वाटे ६

खर्चूनिया बहुतसें धन मत्धन्यानें
हा हेमपिंजर पहा बहु आवडीनें
वाढो मदीय सुखवृत्ति ह्मणूनि केला
वाटे क्षणेक परि सौख्य न मन्मनाला ७

खाण्यास डाळ बदरीफळ जांब देई
स्वादिष्ट दाडिम फळें, दुसरीं तशींही
दे मत्सुखार्थ मनिं उत्सुक जो भुकेला
वाटे क्षणेक परि सौख्य न मन्मनाला ८

पाणी सुनिर्मळ असें अपुल्या करानें
आणूनि नित्य मज दे बहु आदरानें
जो नित्य ही शिकवितो प्रभुनाममाला
वाटे क्षणेक परि सौख्य न मन्मनाला ९

घे काळजी निशिदिनीं विविध प्रकारें
माझ्यावरील अपघात हि टाळण्याला
माझ्या सुखार्थ बहु कष्ट तयास होती
नाहीं मुळीं किमपि सौख्य मदीय चित्तीं १०

दे दुःख संतत जगीं परतंत्रता ही
स्वातंत्रतेहुनि दुजें सुख तें न कांहीं
चिंतानलीं निशिदिनीं शुक दग्ध झाला
दैवा! स्वतंत्रपण कोंधि मिळेल त्याला ११

नारायण गणेश शिरसाळकर.

# दृष्टांतबोध

## आर्या.

व्यायाम शरीराला नसतां वें चांगलें न चालेल
नसतां उपसा पाणी विहिरीचें सहज फार माजेल. १

श्रम उत्साहावाचुन किति केले तरि न सफल होतील
विस्तव नसतां नुसतें फूं फूं करुनी न जाळ होईल. २

बल एक ज्ञानाचें बहुबलाचा वृथैव बडिवार
वार न करावयाला धारेवाचून शक्त तरवार ३

युक्तीनें जें होतें काम न वें होय दांडगाईनें
दगड सुरंगें उडतो तितका निघतो कधीं न हातानें. ४

सदसत्कार्य करीते विद्या योजक जसा असेल तिला
[1]रसभस्में रोग हरे अपाय करितें अपक्व परि तनुला. ५

मोठेंच कार्य होतें अल्पहि उद्योग नित्यशः करितां
मधुमक्षिका न करिती त्त्द्योग, तरी कुठून मधु मिळता ? ६

दीर्घोद्योगस्थैर्यापुढें मुळींच न अशक्यता टिकती
उदधींत कीटकांहीं बेटें कित्येक निर्मिलीं असतीं. ७

उद्योगें फळ लाभे तरि त्याला उक्त काळ लागेल
बीं पेरिलें तरीही पदरीं तत्काळ धान्य न पडेल. ८

थोडें थोडेंच परी न ह्मणे, होणार काय तितक्यानें
मोठा ग्रन्थहि होतो पुरता एकेक शब्द लिहिल्यानें. ९

---

१ भस्म केलेल्या रसायनाच्या योगानें.

गोष्टी दोन यथास्थित एका काळीं न साधितां येती
शेतांत एक वेळीं दोन पिकें कधिं न चांगलीं पिकती. १०

सत्य स्वीकारावें लाभ नको होय जो असत्यानें
जवळ ह्मणूनी जाणें बरवें न कदापि आड वाटेनें. ११

अति सूक्ष्म कारणानें घडतें कार्य प्रचण्ड वेळेस
ठिणगी लहान अगदीं जाळुन करि खाक तूळराशीस. १२

थोराच्या सानिध्यें थोरपणा सहज लाभतो पाहीं
अंकासंगें पावे मोल नसे शून्य जरि तया कांहीं. १३

दुर्जन निज सहवासें स्वसम करी दुर्गुणी स्वयें मनुजा
सडकें एक विड्याचें नाशी वर खालच्या किती पाना. १४

बहुगुणसमुदायाचें दुर्गुण करि अल्प एक मातेरें
दुर्गंधास्तव एका कन्दर्पा निंदितात जन सारे. १५

गोष्टी विरुद्ध एका काळीं घडणें अशक्यची पाहीं.
रविचन्द्र एक काळीं प्रकाशणें गोष्ट शक्य ही नाहीं. १६

मन रिक्तें सोडितां त्यामध्यें अविचार शीघ्र भरतील
शेत रिकामें पडतां रान भराभर तयांत माजेल. १७

उद्योगीं रत असतां अविरतें मन तें विशुद्ध राहील
जल वाहतें सुनिर्मल रुचिलाही मधुर फार लागेल १८

मन आंवरून धरिलें न तरी भलतीकडेस भटकेल
कैंणी न वळविली तर इष्ट दिशेनें न नाव चालेल १९

वारंवार मनाला विवेक केल्यास तें न बिघडेल
दररोज फिरविल्यानें घोडा चालावयास न अडेल. २०

---

१ कपाशीच्या राशीस. २ रिकामें ३ निरंतर ४ नौकेचें सुकाणू.

वारंवार हिताचे प्रसंग येती जगीं न मनुजातें
इन्द्रधनूचें दर्शन वर्षाकाळीं न सर्वदा होतें. २१

काळ असे तोंवरती विद्या केल्यास साध्य ती होते
तीरस्थ नाव भरती आल्या ढकलावया सहज येते २२

मोठीच हानि होते लाभावर दृष्टि ठेवितां सगळी.
पाहून आमिषाला मीन भुले गळ पडे परंतु गळीं. २३

रूपैकसदृशतेनें गुण न खऱ्याचे कदापि येतील
मोल खऱ्याचें नकली नाणें पावावयास न शकेल २४

मानस निर्मल नसतां वरच्या रूपें न साधुता येते
मुनिरूपानें केवळ ह्मणेल जन कोण साधु बगळ्यातें २५

लक्ष निरंतर असतां कामावर तें कधीं न बिघडेल
चाळींत नित्य गेलें तर वस्त्रा वाळवी न लागेल. २६

यत्न अखंडित करितां परिणामीं सिद्धिलाभ तो घडतो
घाव कुऱ्हाडीचे तरुवर करितां सारखे तुटेलचि तो २७

आरंभीं श्रम कार्या तितके पुढती न लागतात तय
विस्तव पेटवितांना श्रम न तसे लागतात राखाया. २८

काठिण्य हात जोंवर कार्याला घातला न तों दिसतें
जात्यावर बसल्यावर ओवी सहजच ह्मणावया येते. २९

बाह्य स्वरूप अन्तर्गुणदर्शकसें न मानितां येतें
मधुर गरे आंत खरे वरती कांटे परंतु फणसातें- ३०

गन्धर्व कवि.

# सूर्योदय

श्लोक.

आरक्त रागें बहु पूर्व झाली । येईल आतां वर अंशुमाळी
जाईल सारें तम हें लयाला । प्रकाश वेढील पहा जगाला १
गेलीं पहा तीं किरणें नभांत । वर्णी सुवर्णासम वाटतात
तेथून कांहीं फिरतात मागें । खालीं जणूं तीं बघतात रागें २
धनुर्धराचे बहु तीक्ष्ण तीर । ते भंगिती स्पर्श करून उर
हीं भास्कराचीं किरणें उदार । लागून देती न कुणास मार ३
स्पर्शे पदार्थां नव रूप देती । तत्कांतिला उज्वलतेस नेती
आनन्द त्यामाजि भरून देती । ही सज्जनांची अवघ्याच रीती ४
आनन्दमूर्ती उदयास आला । पिटून लावी अवघ्या तमाला
जीवित्व वाटे नव द्यावयाला । सृष्टींतल्या वस्तुगणास आला ५
उठा मुलांनो हि पहा रवीला । भेटावया तो पसरी करांला
उद्योग त्याला प्रिय फार वाटे । आलस्य त्यालागिं कधीं न भेटे ६
जो सर्वदा चालतसे नभांत । राहे न कोठें पळही निवांत
विश्रांति ज्याला अगदीं न ठावी । त्याची मुला मूर्ति तुवां बघावी ७
नेत्रीं मुला सस्मित मूर्ति पाहीं । आनन्दवृत्तीस धरीं सदाही
तयार जैसा रवि उद्यमातें । व्हाया तसें तूं वळवीं मनातें ८
हा सूर्य जैसा उगवे नभांत । सुज्ञान तैसें उगवो मनांत
काळाख तैसा रविला न ठावा । ठावा तुला आळस तो नसावा ९
क्रमी क्रमानें रवि अंबराला । हा ज्ञानमार्गांत धडा मनाला
सोडी न तो स्वीय कधींहि पंथ । तूं ठेव चित्तामधिं हेच रीत १०

मोरो गणेश लोंढे.

# काव्यरत्नावली.

## अंक ७ वा.

## प्रीतीची भेट

श्लोक.

कोठें [1]नभश्चुंबित [2]तालताल
अत्युच्च [3]मोहद्रुम ते विशाल
[4]न्यग्रोध विस्तीर्ण [5]सुसांद्र कोठें
कोठें कदंबद्रुम मोठ मोठे १
ते शुष्क कोठें तरु, पल्लवांनीं
गेले कुठें पुष्पफळीं लढोनी
कोठें दिसे सुंदर [6]वंशजाळी
वाढोनिया जी बहु उंच गेली २
कोठें घनश्यामल [7]शैलशृंगें
कोठें दरी खोल विशाल लागे
कोठें कडे उंच भयाण कृष्ण[*]

---

१ गगनचुंबित २ ताडवृक्ष ३ मोहाचीं झाडें ४ वड ५ घनदाट ६ वांबूचीं बेटें ७ पर्वताचीं शिखरें * काळे ( काळे कुठें उंच कडे भयाण ) असा पाठ.

कोठें दिसे रम्य सपाट रान [३]
कोठें झरे स्वच्छ अमृत जलाचे
ते वांकती ओघ कुठें नद्यांचे
बेटें जयांच्यामधिं जांभळीचीं
कुंजें[1] कुठें वीं बनलीं लतांचीं [४]
कोठें दिसे निश्चलशून्य रान
जाई कुठें पक्षिरवें भरून
ते हिंडती यूथ कुठें मृगांचे
तेथेंच होतें स्थल आश्रमाचें [५]

एके दिनीं त्या वनिं अस्तमानीं
ये लांघुनी चालत पांथ कोणी
चोहोंकडे भीत उदास दृष्टी
लावून चित्तीं बहु होय कष्टी [६]
जाण्या पुढें जो नच मार्ग ठावा
कोणी गमे येउनि दाखवावा
योगी तिथें एक तशांत आला
पाहून तो पांथ वदे तयाला [७]

" जिथें मानवांचा कधींही न वास
" घडे, तेथ वाटेल शांती मनास
" म्हणोनी क्षमाळा मला दाखवा तो
" दरीमाजि त्या कोणता मार्ग जातो ८

१ लतागृह -वेलींनीं आच्छादलेली जागा २ कळप.

" श्रमें शिथिल जाहलों पडति मंद हीं मत्पदें
" शरीर शिणलें किती गमति हीं वनें भीतिदे
" तनू पवव कंप ही चुकुनिया पथा चालता
" न कर्मफळ भोगिल्याविण परी सुटे तत्वतां ९
" क्रमून पथ आक्रमी जसजशीं वनें हीं अहा !
" मला त्यजुनि वाढवी बहुत दूर जाती महा.
" नशीब फिरतां जरी अशिच वाट ही लांबते
" स्वमार्ग वनदीपिका[1] परि मला स्वतां दाविते १०
" पहा थोर त्या दीपिकेच्या प्रकाशें
" किती दूरची ती दरी रम्य भासे
" मला वाटतें शुद्ध आनंदधामें[2]
" असे तेथ होईन मी पूर्णकाम ११
" हलवुनी शिर तो मज बाहवे
" निज करीं[3] मज सन्निध पावते
" करुनि मंद कधीं निज तेज तें
" मज गमे जणुं खेदाचि दाविते १२

" निज मना धरिं आवरुनी मुला !
" दुरुनि जें रमणीय दिसे तुला
" समज तो वनवन्हि न दीपिका[4]
" भुलुनि त्या व्यसनीं पडतोस कां १३

---

१ अरण्यांत प्रकाश देणारी दिवटी २ आनन्दाचें घर ३ आपल्या किरणांनीं ४ अनिश्चित आणि मनुष्य चाललें असतां पुढें पुढें दिसणारा जाळ.

" पिशाच कपटी बहू धरुनि रम्य रूपासि ते
" नरा भुरळ घालुनी व्यसनिं त्या जसें पाडितें
" तसे तुजपुढेंहि वे पळुनि त्वन्मना कर्षुनी
" विनाशसदनीं[1] तुला समज जातसे घेउनी १४
" चुकून पंथ[2] ह्या वनीं भ्रमति द्यावया आश्रया
" विमुक्त मम हें असे सतत दार पांथा तया
" न संग्रह जरी बहू अतिथिला तरी द्यावया
" गमे मजसि हर्ष त्या बघ निजाश्रमा न्यावया १५
" सुखें तूं क्रमीं आजची रात्र येथें
" असे जाण शय्या तृणाचीच जेथें
" मला लाभ दे आपुल्या संगतींचा
" तुला ही घडो बा! मदाशिर्वचाचा[3] १६
" येथें सुखें जे मृग थोर सान
" स्वच्छन्द मोदें चरतात जाण
" घेतों न तच्चर्म[4] बसावयातें
" मारून मी दुर्बल त्या पशूंतें १७
" जी कां दया त्या सदया प्रभूची[5]
" रक्षी मला घोर वनीं हि साची
" ती सांगते नीति मला अशी हे
" [ हिंसेंत कीं पाप बहूत आहे. ] १८
" तैसेंच हें स्वोदरपूरणातें[6]
" मारी कधीं मी न पशुद्विजांतें.[7]

---

१ नाशाचें घर २ मार्ग ३ माझ्या आशिर्वादांचा ४ मृगाजिन ५ ईश्वराची ६ आपलें पोट भरण्याकरितां ७ पशुपक्षांस.

[library stamp]

" हिंडोत ते स्वैरें सुखें उडोत
" भूमीवरी हर्षभरें नभांत १९
" हे दीसती पर्वत जे समोर
" वृक्षीं तृणीं व्यापृत थोर थोर
" आणून धान्यें तिथुनी तृणांचीं
" तैशीं फळें कंदमुळें वनींचीं २०
" मी वारितों नित्य मुला क्षुधेत
" पाणी झऱ्याचें पिउनी तृषेते
" मानीतसे त्यांत अखंड भद्रा
" दर्भासनीं घेउनि सौख्य निद्रा २१
" तूं सोड चिंता पथिका ! समग्र
" ती काळजी तापद घोर उग्र
" ह्या दुःखदा केवळ, सोड सोड
" कांहीं नसे जाण तयांत जोड २२
" थोड्यांत लोकीं नरकार्य भागे
" ते ही न त्यातें बहुवार लागे
" चित्तांत हें तत्व मुनी धरीती
" आनन्दसौख्यें स्थिर ते वरीती २३
" येवोनिया शांत मदाऽश्रमांत
" त्वां शांतवावें निज तप्त चित्त
" जें श्रांत झालें सुख तें शरीर
" पावो, करूनी सुफलोपहार " २४

---

१ स्वच्छन्द २ गवत आणि झाडें ह्यांनीं भरलेले ३ कल्याण ४ मनुष्याचें काम [ गरज ] ५ चांगल्या फळांचा उपहार करून.

जसें स्वच्छाकाशांतुनि दंव पडे भूमिवरती
मुखांतूनी वैसे मधुरतर हे शब्द निघती
मुनीच्या, पांथाला बहु सुखद ते रम्य गमले
जणूं संतप्ताते अवचित सुधापान घडलें २५
सन्मानुनीया मुनिच्या वेचाते
त्याच्यासवें पांथ तदाऽश्रमाते
गेला, मुनीनें नच लोटियेलें
तों दार तें मुक्त अपाप झालें २६
कीं शुद्ध जी पर्णकुटी वियेला
संशुद्ध हें पाहुनि युग्म झाला
आनन्द, तत्स्वागतहेतु चित्तीं
द्वारा धरूनी उघडी स्वयें ती २७
झाली निशा तें वन शांत झालें
पक्षी नगीं स्वस्थ सुसुप्त झाले
आले पशू स्वाऽश्रयद स्थलाते
सारोनि काजा जन ही गृहाते २८
लावून काष्टें करण्या प्रकाश
बेदींतला चेतविला हुताश
देऊनिया आसन पांथिकाला
तेव्हां मुनीनें बहु गौरवीला २९
अन्नें सुसिद्धें मग जीं तृणांचीं
सावीं फळें गोड रसाळ वींचीं

---

१ दरानें २ भाषणाते ३ झोंपडी ४ जोडपें ५ निद्रिस्थ ६ आश्रय ७ अग्नि * चांगल्या प्रकारें शिजविलेलीं ९ तृणधान्याचीं.

प्रेमें वदोनी अति आदरानें
पात्रीं तया वाढियलीं मुनीनें ३०
चोहोंकडे पवन मंद सुगन्ध वाहे
अग्नीसमीप रजनीकृमि[1] बोलताहे
ज्वालाप्रकाश करि शोभित पर्णशाला
आनंद दे स्थल मनास हि तें दशेला ३१
वाढी मुनी करुनि आग्रह पांथिकाते
सांगे मनोहर कथा सुरसा तयाते
हासून चित्तमुचिता निज मित्रभावा
दावी, न खेद पथिकास मनीं गमावा ३२
मुनीच्या त्या ऐशा कृतविविधयत्नीं[3] न गमले
तया पांथा सौख्य क्षणहि न तच्चित्त रमले
स्वदुःखोद्वेगानें पथिक मनिं होऊन विकल
दिसे आलें त्याच्या मुनिस नयनीं बाष्पसलिल[4] ३३
त्यांची अशी दुःखित दीन मुद्रा
दे दुःख चित्ता मुनिच्या दयार्द्रा[5]
तो त्या ह्मणे ' दैवहता ! तुला हें
बा ! दुःख कां कोठुनि होत आहे ' ३४
" पुरा[6] श्रीमंताच्या सदनिं धन सन्मान तुजला
" मिळे, तेथें कोणी तुज कटु वचें काय ? वदला
" विषादें त्या बा ! कां वद भटकसी घोर विपिनीं
" स्वकीयाप्ता नित्ता त्यजुनिहि तसा तातजननी ३५

---

१ रात्रिकीटक २ मनाचा शुद्धपणा ३ केलेल्या अनेक प्रकारच्या यत्नांनीं ४ अश्रुजल ५ हें चित्ताचें विशेषण ६ पूर्वी-

" मुनी मित्रत्वाचा धरुनि बहु हेतू निशिदिनीं
" तुवां केले यत्न श्रमहि परि तें ये न घडुनी
" ह्मणूनी वैराग्या धरुनि फिरसी निर्जन वनीं
" स्वधामीं टाकून प्रिय जनकबंधुस्वजननी ३६
" खेनी लावण्याची बघुनि युवती रम्य सुदती
" स्वभावें त्वत्प्रीति प्रकट जडली तीजवरती
" असा जो प्रीतीचा अनुपम तुझ्या ओघ वळला
" तया स्त्रीनें गर्वें उलट वद कीं तो फिरविला ३७
" संपत्तिचा क्षुल्लक नाशवन्त
" आनन्द, त्या जे सुख मानितात
" तूं जाण कीं नीच तयाहुनी ते[3]
" कां दुःख देशी निज मानसाते ३८
" मैत्री असे केवळ शब्द मात्र
" कीं जादुचा मोहक एक मंत्र
" छायाच ती कीर्तिधनानुसारी[4]
" दुःखीं अभाग्याप्रति लोटणारी ३९
" मैत्रीहुनी शब्दच फोल आहे
" बा! रे! खरी प्रीति जगांत नोहे
" ती होय कामी नरवंचनाला[6]
" सध्यां जगीं साधन सुंदरीला ४०
" धुंडाळिताही नच सांपडेल
" भूमीवरी प्रीति जरी असेल

१ मनुष्यें नाहींत २ खाण ३ सुख मानणारे ४ द्रव्याला अनुसरणारी ५ दरिद्री ६ कामीजनास फसविण्यास.

" अहे तरी केवळ चक्रवाकीं[1]
" तैशी नसे स्त्री पुरुषांत लोकीं ४१
" वाटो तुझ्या कीं अविचारशीला
" रे ! लाज कांहीं तरुणा ! मनाला
" आतां मनीं दुःख न लेश वाही
" स्त्रीजातिचें नाम पुनः न घेई " ४२
वैराग्य भीतीस्तव घेतलेला
तो पांथ ह्या ऐकुनि भाषणाला
झाला मनीं लज्जित वे नवश्री[2]
त्याच्या तपेची[3] विलसे सुवक्त्रीं[4] ४३
प्रभातकालीं गगनोदरांत
जसे क्रमें सुंदर वर्ण होत
पांथा मुखीं अस्थिर चित्र रंग
पाहून चित्तीं मुनि होय दंग ४४
उत्तुंग[5] वक्षस्थल होत त्याचें
जे भाव वक्त्रीं दिसले तपेचे
ते पाहुनी किंचित भीत झाला
आश्चर्य वाटे मुनिच्या मनाला ४५
झाला मुनी विस्मित पाहुनी ती
पान्थ तपेची उबगोन[6] वृत्ती
अंगावरील्या निज गोपनाला[7]
काढून टाकी मग अंबराला ४६

---

१ चक्रवाक पक्षांत २ नवीन छाया [ लज्जेचें नवीन तेज ] ३ लज्जेची ४ मुखावर ५ उन्नत ६ टाकून ७ आपलें खरें रूप झांकणराला

दिसे न तो पांथ दिसे कुमारिका
बघून मानी मुनि थोर कौतुका
तदा वदे ती सुदती मनोहरा
मुनीस कन्या मग जोडुनी करा ४७
" त्रासें त्यजीलें सकलीं जियेला
" ऐशा अभागी मज पापिणीला
" दावा अहो मार्ग सुसौख्यदाता
" कीजे क्षमा साधु दयार्द्रचित्ता ४८
" जेथें असे केवळ दिव्यशर्म[1]
" नांदे जिथें सोज्वल मूर्त[2] धर्म
" वास्तव्य जेथें अमरादिकांचें[3]
" कीं शुद्ध युष्मत्सम साधकांचें ४९
" ऐशा बहू शुद्ध पवित्र जागीं
" मी पातकी ही शिरलें अभागी
" अन्याय हा जो मम थोर झाला
" कीजे क्षमा शांति विवेकशीला ! ५०
" भीतीच जीस शिकवी भटकावयाला
" शोधीत जी फिरतसे वनिं शांतवेला
" सर्वत्र जीस दिसते परि ती निराशा
" बाळेवरी करि अशा सुकृपा मुनीशा ५१
" माझा पिता स्वर्णनदीतटाला[4]
" राहे सुता एकचि मी तयाला

---

१ स्वर्गाचें सुख २ मूर्तिमंत धर्म. ३ देव. ४ एक नदी ( सोन नदी– शोणभद्र. )

" माझ्याविना पुत्र दुजी सुता ही
" होते न त्या अन्य अपत्य कांहीं ९२

" माझें पाहुनि रूप यौवन मनीं मत्ताव संपत्तिला
" होऊनी अति लुब्ध दाविति मला मिथ्याच कीं प्रीतिला
" कामी वंचक ते कितीक करिती मच्चित्त मोहावया
" यत्नाते, निज रूप यौवनमदें मी तुच्छ मानी तया ९३

" होता त्यांतचि चन्द्रसेन ह्मणुनी रूपें गुणें आगळा
" शोभे सुंदर तो जसा शशि नभीं तारागणीं शोभला
" माझी त्याजवरी जडे मजवरी प्रीती तयाची अती
" गर्वे मी अवमानुनी परि तया बाहेर दावी न ती ९४

" पोषाख साधा सरल स्वभाव
" चित्तीं वसे प्रीतिविशुद्ध भाव
" वर्णू किती सद्गुण रूप त्याचें
" औदार्य ही थोर तसे मनाचें ९५

" सूर्योदयीं सुंदर फुल्ल पुष्पें
" बिंदू दंवाचे निज शुद्ध रूपें
" जे शोभती ते पवतील कैंची
" ती तुल्यता[१] तेच्छुचिमानसाची[२] ९६

" सौंदर्यकांती कुसुमीं दवाच्या
" बिंदूवरी जी सम मौक्तिकांच्या
" ती राहती अल्पचि काळ त्यांच्या
" ठाईं परी संतत मत्प्रियाच्या ९७

---

१ बरोबरी. २ त्याच्या निर्मळ अंतःकरणाची

" अहा ! किती मी परि नष्ट दुष्ट
" किती तरी दुःखद हाय ! गोष्ट
" कीं जे तयांचें क्षण भंगुरत्व
" माझ्या मनीं तेंच करी प्रभुत्व ५८

" अद्यापि ही व्याकुल चित्त होते
" माझें मला दुष्कृत आठवें तें
" कैसें धरूनी वितथाऽग्रहाला
" संपादिलें मीच निजाऽहिताला ५९

" मत्प्रीतिनें व्याकुल होय जेव्हां
" तो नाथ वाटे मज हर्ष तेव्हां
" बुद्ध्याच कीं मी अति नीच नीचा
" धिःकार तो बाह्य करी तयाचा ६०

" तिरस्कारें माझ्या त्रासित बहु तो होउनि मनीं
" मला गर्विष्ठेला त्यजुनि विजनीं घोर विपिनीं
" सखा गेला गेला पुनरपि मला तो न दिसला
" कसा रे ! दैवा ! हा मजकडुनि अन्याय घडला ६१

" स्वकृत्याचें भोगी[2] फल अणिक भोगीनहि पुढें
" जिथें गेला माझा प्रियतम सखा मीहि तिकडे
" तया घोरारण्यीं शिरुनि गुण त्याचे निशिदिनीं
" स्मरून प्राणातें त्यजिन झुरुनी त्यास्तव वनीं " ६२

देवा ! होवो नच कधिं असें बोलुनीया वियेला
योगी देई कवळुनि करीं घट्ट आलिंगनाला

१ पुष्पें आणि दवांचे बिंदू ह्यांजवरील सौंदर्याचें व तेजाचें २ भोगतें

बोलाया जों धरि मनिं तया हेतु निंदून पूर्ण
आलें ध्यानीं तव युवतिच्या हाच कीं चन्द्रसेन. ६३

बहु दिन विरहें जो फार संतप्त झाला
झडकरि परिरंभा देइ साध्वी तयाला
विसरुनि निज दुःखें खिन्नता सोड चिंता
सकल बहु जेयांहीं कष्टवीलें स्वचित्ता ६४
" असासि मम सुखांचें धाम तूं पद्मनेत्री
" मम नयनचकोरा चंद्रिकायुक्त रात्री
" बहुत दिन तुला जो दूर सोडुनि गेला
" परत अजि तुला त्वत्प्रीतिला हा मिळाला " ६५

परिसुनि वचनात ह्यापरी स्वप्रियाच्या
स्मरुनि सकल वाटे खेद चित्ता तियेच्या
निज कृति अनुतापें दीन होऊनि त्याते
कमलमृदु करांहीं देइ आलिंगनाते ६६
" पुनरपि नच ऐसा होय जेणें वियोग
" पडल नच कदाही मंद हा स्वाऽनुराग
" करुनि सतत ऐसें गे वसूं स्फुंदनाला
" त्यज तुज असुखा दे भेदि जें* मत्हृदाला " ६७

केशव नारायण वैद्य.

---

१ आलिंगन २ ज्या चिंतादिविकारांनीं ३ आपल्या मनाला ४ आपल्या पूर्व कर्मांच्या पश्चात्तापानें ५ चंद्रसेनाते ६ आपली प्रीति ७ दुःख * जें स्फुंदून ९ माझ्या हृदयाला.

# एका कवीचा धांवा.

श्लोक.

अजामिल महीतळीं परम पातकी जाहला
परी सुतमिषें हरि स्मरुनि मुक्तिला साजला
पुरातन कथा अशी परिसुनी मवी योजितों
अनंत हरिकीर्तनीं हरिकृपें सुखा मोजितों १

मायेनें तव ईश ! हे जन बहू सर्वतही मोहिले
जे तूझे भजना त्यजूनि सहसा या संसृतीं रंगळे
आहे जें गृह दुःखमूळ गणुनी तें शांतिचें आगर
तत्प्राप्त्यर्थ सदैव दंग असती रंगांत नारी नर २

पावोनी नरदेह दुर्लभ हरे ! अव्यंग यत्नाविना
त्वत्पादांबुज सेवि जो न सुमनें धिक् त्याचिया जीवना
वापीच्या वरले तृणास भुलुनी वोमाजि जैसा पडे
मूढत्वें पशु त्यापरी मनुज हा गेहांन्धकूपीं पडे ३

माझेंही वय त्यापरी अजित हें गेलें असें निष्फळ
राज्यश्रीमद वाहतां अनुदिनीं मन्मानसीं केवळ
गोतापुत्रकलत्रमित्रकनकप्रेमें गणोनी प्रिय
देहीं स्थापुनि आत्मता न रचिलें मी कोणतें अप्रिय ४

---

१ संसारांत. २ घर. ३ तुझें पादकमल. ४ गृहरूप अन्धकूपा-मध्यें ५ स्त्री.

जेवीं दृश्य घटादि वस्तु दिसती तेवीं तनू ही असे
तीते मी नरदेव कल्पुनि पहा कैसा प्रपंचीं फसे
सेनानी[1] रथहस्तिपत्ति[2]हयही ज्या वेढिती सर्वदा
ऐसा दुर्मद मी महीं विहरतों त्वां नाठवोनी कदा ५

मोहें होउनि मत्तचित्तयुवतीविन्यास चिंती सदा
लोभें क्षोभ चळे न शांतिस मिळे तेणेंच थारा कदा
दंष्ट्रां[3] चाटुनि साप सावध जसा आखू[4] मुखीं घालितो
नेतो काळ तसा असावध नरा ऐशा लया शीघ्र तो ६

देहाते नरदेव मानुनि रथीं हेमीं जया वाहिलें
ज्याते मत्त गजावरी बसवुनी सौख्यांत मी ठेविलें
त्याते तुच्छ तृणाहुनी अकरुणें काळें कसें लेखिलें
योजोनी कृमिफेरुभक्ष्य भुवनीं मातींत कीं लोटिलें ७

जिंकोनी महिला[5] समग्र बसला जो सार्वभौमीं पदीं
सामन्त क्षितिपाल सर्व लवती ज्या भूपतीच्या पदीं
त्याते ही ललना सलील करिती क्रीडा नृपाच्या परी
कामाचा पगडा असा दृढ असे पाहा नरेशावरी ८

जो होवोनि वशांत लीन करितो कर्मी नृलोकीं जन
ह्या जन्मीं न मर्ते फळास शिवतो भोगस्पृहा त्यागुन
मी होईन पुढें नरेश अथवा देवेश तृष्णा अशी
ज्याच्या मानसिं जागरूक असते शांती तयाते कशी ९

---

१ सेनापती. २ पायदळ. ३ दाढ. ४ उंदीर ५ पृथवी. ६ सहज.

संसारीं भ्रमतां जनावरि हरे ! जैं त्वत्कृपा ओसरे
तैं सत्संगति त्या घडे असुलभा संसार त्याचा सरे
जेव्हां साधुसमागमांत धारतो प्राणी खरी ती रती
तेव्हां त्वत्पदपद्मिं मोक्षद जडे वेगें तयाची मती १०
त्वां केलास हरे ! अनुग्रह कृपें या दीन दासावरी
भोगाची अरुची खरी स्फुरतसे ती सत्वरें अन्तरीं
जी व्हावी करगा ह्मणोनि करितों कष्टें तपा काननीं
निष्ठेनें नृपसाधुवर्यविषयां अक्षां क्रमें मर्दुनी ११
मी मागे न वरा दुजा सुरवरा ! त्वत्पादसेवेविना
वेघी एकचि कामना महितळीं जी निस्पृहाच्या मना
तूं देशी अपवर्ग सर्व हरुनी दुःखास आराधकां
त्या तूंते त्यजुनी वरास दुजिया वांछील तो आर्य कां ? १२
ईशा ! सत्वरजस्तमादि अवघीं तोडोनिया बंधनें
शोकाचीं पटु भाजनें पदिं तुझ्या माझीं सदा वंदनें
आणीते प्रकृती जया न विकृती ज्याला शिवे ना व्यय
सच्चिद्रूप गुणत्रयापलिकडे पूरुष जो अद्वय १३
कर्माते करितां सदोदित हरे ! मी फार संतापलों
भोगीतां फळ भागलों ह्मणुनिया दुःखें अती तापलों
मायाजालिं कुठें न मी पळभरीं विश्रांतिला पावलों
तूं सच्चित् सुख देशि तुज शरणा याकारणें पातलों १४

दंडी कवि.

---

१ हस्तगत. २ इंद्रियांस. ३ मोक्ष—स्वर्ग. ४ आराधना क—रणारे. ५ कुशल. ६ पात्रें.

आगष्ट १८९५, वर्ष ८ वें

# काव्यरत्नावली.

अंक ८ वा.

## चोविस गुरू.

[ एकनाथी भागवत या महा प्रासादिक ग्रन्थरत्नाचा परिचय वाचक वर्गास असेलच. आमचें धर्मरहस्य भागवतांत चांगलें व्यक्त आहे. परंतु उद्धवास जो केवळ अमृततुल्य उपदेश श्रीकृष्णांनीं केला व जो एकादशस्कन्ध केवळ सर्व भागवतसार आहे. त्याच स्कन्धावर नाथांनीं केलेली मराठी टीका " एकनाथी भागवत " या नावानें सुप्रसिद्ध आहे. याच स्कन्धांत अवधूतानीं यदुराजास आपण " चोवीस गुरू " कोण कोणते केले, हें कथन केलें आहे. हाच बोधपर विषय कवीनें पुढील श्लोकांत दाखविला आहे. ]

श्लोक.

निर्विण्ण होउनि यदू यतिला विनीत
होतांच वत्सल गुरू वळला प्रशांत
विज्ञान त्या त्वरित जें वितरी-समस्त
तें प्राकृतीं गुरुरूपें वदवो अनंत

एके दिनीं नृप यदू मृगयेस जातां
मार्गांत एक अवधूत बघोनि, माथा

तत्पादिं ठेवुनि तया अति दीन वाणी
बोले नरेंद्र, परिसा बुध ती सुवाणी. १

बालोन्मत्तपिशाचवत् जरि मही सर्वत्र ही हिंडता
त्यांचे दुर्गुण आपणांत किमपी नाहींत हो तत्त्वतां
कैसें ब्रह्मरसांत एकवटला टाकोनि मायापिसें
आहे हा भगवत्पदीं नत कथा तें तत्त्व या सौरसें. २

विराग स्थिती पाहुनी भूपतीची
मुमुक्षा वशी आणुनीया स्वचित्तीं
तया वेधवां ब्रह्मवित् तो यती जे
गिरा बोलिला आयका तीच वोजे ३

ज्ञानास सद्बुद्धि निदान आहे । वैराग्य जीवाचुनि तें न लाहे
विवेकही अंकित दास तीचा । जो सूचवी भेद हिताहिताचा ४

दिसे मला हें सगळें जगत् गुरू । महीपते ! तूज कथीन जे गुरू
तयामधें चोविस मात्र वाटले । नरा जयांहीं परतत्त्व आकळे. ५

परोपकारार्थ तपे धराधर । तरू परावीन पराचनापर
सर्वास हा नाम यथार्थ हे जिला । त्रिधा गुरू होइ अशी मला इला

तदा प्राणवायू न देहांत दंग
तसा सौरभीं बाह्य वायू न गुंग
अनासक्तता दों प्रकारें अभंग
गुरू दाखवी यापरी वायु चांग ७

असंगता अभेदता । समानता विशुद्धता
अशा गुणांस तत्त्वतां । नभ प्रकाशवी स्वतां ८

दुर्धर्षता आनन मात्र पात्रता । सदा स्वभक्तेप्सि दानशौंडता
सर्वाशिता चंचलता विधूमता । परात्मता पावक दावि तत्वतां ९

सदा असे निर्मल जें स्वभावें । धुरीं जया माधुरिनें धरावें
सदैव जें पूत करी खलातें । गुरू न कां मानुं अशा जलातें १०

कला वाढती आणि त्या क्षीणवाती
द्विपक्षीं क्रमानं तरी पूर्णता ती
कदापी कलानाथ सांडी न राया
उपाधीमुळें भासती त्या नरा या ११

जरी जला ग्रीष्मि करीं प्रकर्षी । पयोदरूपें पय तेंच वर्षी
जेणें बुडे सृष्टि समग्र हर्षी । तरी न आसक्ति हरीस तर्षी. १२

दारासक्तैवी स्नेह पुत्रांदिकांचा । हा दुःखाचा कंद संसारिं साचा
ह्याचेसाठीं बद्ध झाला कपोत । ज्या मानीला आठवा मी गुरूंत १३

विपुल अगर अल्प प्राप्त हो जें अदृष्टें
उदर भरि तयानें व्यर्थ कष्टें न कष्टे
अमित बल असोनी सांडिना शांतवेला
अजगर गुरु मी या कारणें मानियेला १४

अगाध उदधी असे अति गभीर जो निर्मल.
प्रसन्न मनुजां कदा न गणवे जयाचें जल
विषाद विपदीं शिवे नच हि हर्ष ज्या संपदीं
समुद्र गुरु मानिला•संमुद सौरिच्यस जो पदीं. १५

दैवी माया जी गुणें होय नारी । यद्रूपातें मोहतें विश्व भारी
लासी दीपा भूलुनी जो निजांग । मानी भूपा तो गुरू मी पतंग १६

दिसे सदनिं मक्षिका नयनिं शर्करा पाहतां
यथेच्छ निज सेविते न करि संग्रहा तत्वतां

कसे वनिं न सेविले सतत सांठवी माक्षिका
नृपा ! मजसि होतसे गुरु अशी द्विधा मक्षिका. १७

न का करूं स्त्रीसमवेत गोष्टी । एकांति पाहा न वयांस दृष्टीं
ज्या कूपिं पाडी करिणीहि काष्टी । मातंग तो हो गुरु याचसाठीं १८

कदा करोनी न परास साधीं । सदा सुखानें स्वहितास साधी
घे सार तो संतत थोर सानी । भूपा गुरू भृंग ह्मणोनि मानी. १९

चपल हरिण रानीं राहतो जो भयानें
झडकरि वश होतो तो जनां गायनानें
वनिं हि मुनि वसोनी गायनें होय दंग
ह्मणुन गुरु यतो ! मी कल्पितो हा कुरंग २०

रसास जो लंलुप मीन झाला । त्या धीवरीं आमिषिं रोधियेला
साधूस जिव्हाजय योजियेला । या कारणें मी गुरु मीन केला २१

विदेहनगरीमधें चतुर एक वारांगना
धनार्थ विकिजे तनू सुतनु कोणत्याही जना
निराशपण बाणतां विजसि होय ती मंगला
यथातितनुजा गुरू ह्मणुनि मानिला पिंगला २२

निज वदनिं धरोनी आमिषा एक जातां
कुरर पथिं मिळाला संघ त्याच्या सभोंता
त्यजुनि सकल मांसा मुक्त झाला पळांत
ह्मणुनि कुरर राजा ! गोंविला म्यां गुरूंत २३

नाहीं जयाते अपमान मान । मानी निजा आणि परा समान
चिंता न ज्या आत्मरतीं विलोल । केला गुरू यास्तव भूप ! बाल

पहाया जधीं वृद्ध आलों घराला
तया एकली दावि शालीनतेला

करीं कंकणाच्यां ध्वनीला न काढी
गुरूच्या पटीं त्या कुमारीस मांडी २५

आणावया सरलता शरकार बाणीं
एकाग्रता प्रचुर पावि न आम जाणी
जो नायके नृपविभेरिनिनाद कानीं
भूपा ! गुरू ह्मणुनि मी इषुकार मानी. २६

परिग्रह नसे जया परगृहीं वसे सर्वदा
करी न सदना कदा कठिण मौन सेवी सदा
जनांत मिसळे न जो सतत आत्मता भोगितो
ह्मणोनि गुरु मानितो वसुमतीस मी भोगि तो २७

जो सृजील निज नाभिपासुनी । जाल मांडि बहु तंतु काढुनी
तेंवि ईश विलसे चराचरीं । ऊर्णनाभि गुरु मानितों तरी
ठेवि जो धरुनि कीटक नीडीं । डांस घेउनि तया बहु पीडी
तो सुपेशकृत मृत्युभयानें । हो तयास गुरु मानि मनानें २९

नृपा ! तूंतें ऐसा प्रमुख गुरुचा वर्ग कथिला
परी आहे जो त्वन्निकट गुरु तो जाण वहिला
न भोगी न त्यागी नरतनु उदासीन असणें
सदा होतें सच्चित्सुखमय तुझें सर्व करणें ३०

संवाद झाला यदुचा यतीचा । तत्सार हें प्राकृत सूज्ञ वाचा
सदा ययाच्या मननें असार । तुटेल संसार जडेल सार ३१

दंडी कवि.

# अर्थसादृश्य.

श्लोक.

जयंति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् १

भर्तृहरि.

Hail, bards triumphant! born in happier days;
Immortal heirs of universal praise!
Whose honours with increase of ages grow,
As streams roll down, enlarging as they flow;
Nations unborn your mighty names shall sound!
And worlds applaud that must not yet be found!

Pope—essay on criticism.

वर्णूं कवींचें किति थोर दैव
सरस्वती लीन जयां सदैव
यत्कीर्ति-देहास न मृत्यु येई
स्पर्शे तशी ती न कदा जराही.

सुजनो याति वैरं परहितकार्ये विनाशकालेऽपि
छेदेऽपि चन्दनतरुः सुरभयति मुखं कुठारस्य. २

कोणी एक कवि.

Forgive thy foes;—nor that alone—
Their evid deeds with good repay;
Fill those with joy who leave thee none,
And kiss the hand upraised to slay.

So does the fragrant Sandal bow
In meek forgiveness to its doom,
Aud over the axe at every blow
Sheds in abundance rich perfume!

H- Knowles.

विपत्ति आली जरि सज्जनाला
ते साधितीही परकार्यतेला
छेदी जरी चन्दन तो कुठार
तो दे कुठारास सुगन्ध थोर

पतंति नास्मिन् विशदाः पतत्रिणो
धृतेंद्रचापा न पयोदपंक्तयः
तथापि पुष्णाति नभः श्रियं परां
न रम्यमाहार्यमपेक्षते गुणम् २

भारवि–किरातार्जुनीय.

——Loveliuess
Needs not the foreign aid of ornament,
But is, when unadorned, adorned the most.

Thomson—autumn.

आकाशभागीं न बलाकपंक्ती
मेघीं नसे तेविं धनुष्यकांति
तरी किती तें रमणीय आंगें!
जात्या गुणाला नच साह्य लागे.

किमित्यपास्याभरणानि यौवने
धृतं त्वया वार्धकशोभि वल्कलम्

वद प्रदोषे स्फुटचन्द्रतारका
विभावरी यद्यरुणाय कल्पते. ४

कालिदास—कुमारसंभव.

As the sweet Moon on the horizon's verge,
The maid was on the eve of womanhood.

Byron—The dream.

गे ! टाकुनी यौवनकालभूषा
कां सेविली ही तरि वृद्धदीक्षा
युक्ता निशा जी शशितारकांनीं
शोभेल कैशी अरुणोदयानीं ?

चित्रोक्तिवक्ता कवि.

## सह्याद्रि

श्लोक.

तापीपासुनि दक्षिणेस जलधीपर्यंत जो दक्षिण
व्यापी अंबर चुंबि रम्य शिखरीं लावण्य सल्लक्षण
यत्पृष्ठीं सुविशाल ताल शिसवा यांचीं बनें शोभती
तो श्रीसह्यगिरींद्र वर्णित करूं लोभे मदीया मती. १

गोदा, भीमरथी तशा हरितनू कावेरि पूर्वेकडे
गायत्र्यादिक, पश्चिमेस सरिता फोडीत जाती कडे
यांहीं दाक्षिणदेश सस्ययुत हा श्रीयुक्त तेलां तुवां
सह्या, उत्तरनाथ तो धनद ही लाजे तुझ्या वैभवा. २

ठायीं ठाइं असंख्य निर्झर नद्या झोंकावुनी खालती
येतां इन्द्रधनुष्यकांति झळके दे तोष नेत्रांस ती
स्नानप्राप्त-ससंभ्रमामरसतीविस्रस्त भूषावली
स्वर्गंगा शतधा विकीर्ण तनु, हा आणी जणों भूतळीं ३

तुंगाद्या विजिता मृता बहु नद्या पुण्यावहा वाहती
स्थानें रम्य महाबळेश्वरमुखें उत्तुंग संशोधिती
ऐसें देखुनिया अमूल्य गुण हे सह्याद्रिचे, लाजती
मैनाकादिक सागरांत दडती, निर्लज्ज ते राहती. ४

राहे पश्चिम दक्षिणाब्धि निकटीं देशास रक्षी सदा
स्वप्रांतस्थित वीर धाडुनि करी निर्वैर भू केकदा
नामें सह्य जरी असह्यच जया अन्याद्रिशोभा तरी
ऐसा पर्वत चक्रवर्ति विलसे हा शैल भूमीवरी. ५

किति तरु किति वल्ली शोभती सह्यशैलीं
सुरतरुसम ज्यांची लोक विख्यात शैली
विहरति विबुधाली नाचती चंचलाते
बघुनि फसति देव स्वर्ग मानून यातें. ६

प्रतिध्वनित कंदरा फिरति आगगाड्या किती
जयांतुनि असे इथें बहुत बोगदे शोभती
पुरें कितिक वाट ही धरितसे स्वपृष्ठावरी
शरीर झिजवून हा गिरि परोपकारा करी. ७

प्रति शिखरिं धरीं हा सह्य शैलेंद्र दुर्ग
बघुनि पळति पूर्वी ज्यांस हो वैरिवर्ग
परि बहुत विपत्ती भोगिती सर्व आतां
सकळ गिळति नाशा वांकडा काळ येतां ८

नैसर्गिकी वरिच कृत्रिम चित्रता जे
ह्या सह्यशैलवरि, निस्तुल ती विराजे
कीं पाहतां थबथबे हरपेच भान
लेणीं[१] बघून; न कलापटु थक्क कोण ? ९

असति फणस कोठें काजुचे वृक्ष कोठें
पिकति बहु लवंगा वेलदोडेहि कोठें
कनकखनिहि मोठ्या शोभती ठाइं ठाईं
चकित बघुनि सह्यैश्वर्य हें, चित्त होई. १०

इथें या शैलाचे शिशुच जणुं हे दंति फिरती
तिथें जाळ्यामध्यें मृगभयद ते व्याघ्र फिरती
वराह स्वच्छंदें समद, डबक्यामाजि रुळती
कुठें चंचन्नेत्रें चपल हरिणें स्वस्थ चरती. ११

घेरी ये बघतां जयास गगनीं गेलीं कशी तीं शिरें
कोठें खोलचे[२] खोल पाहुनि दऱ्या अंधार नेत्रीं भरे
कोठें आपटती तटा, जलधिच्या लाटा कठोर ध्वनि
ऐसे सह्यगिरींद्र—भाग दिसती नानापरी लोचनीं. १२

ऐसा हा सह्यशैल क्षितिवर मिरवे सर्व शैलांत राणा
हिंदुस्थानेतिहासा प्रकट करि, धरी चित्रतेचाहि बाणा
उच्चैश्वर्य ज्याचें अतुलच, विलसे शील, अन्वर्थ नाम
होई उद्योगि लोकां सतत शिवद हा सद्गुण श्रेष्ठ धाम. १३

सदाशिव मोरेश्वर भिडे.

---

१ घारापुरी वगैरे ठिकाणचीं २ सदाशिव गडाकडे वगैरे फांट्यावर

# धनगराचा विलाप

श्लोक.

जेव्हां मत्समवेत घेउनि पहा जाईं सदा मीं प्रिये,
तेव्हां सौख्य किती मला गमतसे तें पाहतां हो ! तिये !
नाना सौख्यपयोधिवीचि उठवी मन्मानसीं त्या किती
सारे ते अविपाले अल्पसुखभाक् माझ्यापुढें वाटती १

गेली ती मजला प्रिया त्यजुनिया पाहा कसी मागुती,
मागें चित्र विपर्यया करुनिया टाकीं अकस्मात् किती
जेव्हां सर्व मला दिसेल कुरणीं जैसें असावें तसें
तेव्हां वाटवसे वसंत; परि ती मद्वल्लभा मी फंसें २

संगातीं सखिच्या सदा असुनिया मेंढ्या वनीं राखितां
होतों घेत खुशाल झोंप, उठुनी किंवा कधीं खेळतां
आनंदीच खरोखरी दिसत मी होतों विनोदी महा
तैसें मन्मन काळजीरहित तें होतें किती हा ! अहा ३

आतां मीं तुसडा परंतुहि अती येतों तसा क्रोधनीं
पूर्वीं होइं न जो कधीं परि तसा अस्वस्थ होतों मनीं
गेली ज्या समयीं सखीहि विलया आनन्द माझा तसा
येई मद्वपु अल्प भार वजनीं ! झालों पहा मी कसा ४

कारंजें किति शांत खेळत असे ! नामी किती वाटलें
त्या धोंड्यावरुनी किती गमविनें कैसें सदा नाचलें !

---

१ सौख्य रूप समुद्राच्या लाटा २ मेंढपाळ

मत्सुखीं प्रिय जी मला प्रियतमा राहे पहा ती जयीं ५
सौंदर्या तुझिया वदा निरखिं मी ऐकें स्वराला तयीं

आतां सन्निहिता नसे प्रियतमा; जातों पदा तेथ मी
तेव्हां तत्स्वर ऐकुनी किति तरी रागावतों फार मीं
'पाहूनी मजला असाहि असुखी सानन्द तूं का असा ?
'मद्दुःखा कथितोंचि ऐक, तव ह्या टाकीं भ्रमा सारसा' ६

जेव्हां व्यापृत[1] मेंढरेंहि अमुचीं होतीं पहा क्रीडनीं
जेव्हां तत्सम मत्प्रिया अणाखि मीं सोल्लास होवों मनीं
शोभा, प्रीति, वसंत, प्रौढ इतकीं होतीं 'अहो जेधवां'
मोठी शान बहार त्या सुमयीं वेला कशी तेधवां. ७

मेंढ्या मारुनिया उड्या बसुन त्या जेव्हां मसीं खेळती
तेव्हां मूठभरी तृणा भरकटीं तें टांकिं मीं त्यांप्रती
'राहा चूप' असें ह्मणे बघुनि हो सानन्द तुह्मीं अवां
'चित्तक्लेश घडे पहा ह्मणुनिया मी पावलों म्लानता ८

जेव्हां हालवि सारमेय[2] अपुल्या आह्मांपुढें लांगुलीं[3]
तेव्हां त्या बघुनी मला किति तरी आनन्द तो वाटला
दैवा ! घालविलें कुठें सुख तरी ! आहे कुठें ती प्रिया
झाली मत्स्थिति ही कशी ! तुज विधे ! येऊं नये कां दया. ९

जगन्नाथ धोंडू भांगले.

---

१ खेळण्यांत दंग २ कुतरा ३ शेंपटी

# वेळाचें गायन

ग्रंथ संग्रहा

श्लोक.

नाहीं घेत कधीं वनूवरि पहा वस्त्रादि राजाई तीं
वैशीं गौरवलांछनें न कधिंही घेई सुभव्यें रितीं
ऐसें होइ तरी धनाढ्य जन ते, तैसेच्च ते भूपती
होती भ्रष्ट पदाहुनी मजपुढें लीनत्व ते दाविती १

रत्नांनीं जडिता नसे जरि पहा भूपालयष्टी मला
'कोणी मत्करिं येइ ना' जरि असें कोणा ह्मण का भला
तूंते मीहि कळेन कोण कुठला तेथें असे नादें तो
मन्नामा कथण्या महा रव करी 'वेळाभिदार्धीश' तो. २

रात्रीं तस्करवत् करीं प्रगमना मीही तसा त्या पहा
गालीमाजि हि फुल्ल नेत्रिं हि तशा सर्वां मनोज्ञीं महा.
पाऊलें उठलीं मदीय दिसती वृद्धांचिया भ्रूवरी
तैशीं तीं स्वपराक्रमा करिति हो या सर्वही भूवरीं. ३

हास्या कोण करी मदीय विभवा ? कौमार्य उल्हास का ?
त्यां हो काय कळे सदा फिरतसे मागूनिया बालकां ?
थोडा धीर धरीं ! जरा फिरत ते कांहीं स्वदेशांवरीं
ना ते नंतर हांसती कधिंहि हो जें कांहिं वेळा करी. ४

शीघ्रत्वें धनकोश तो करितसे मी गट्ट, वाडाहि तो
मोठा भव्य तरी धुळीप्रत तसे नेवोनिया टाकितों.
निर्भेद्य स्थिर कोटभाग करितों खिंडार माझा वसा
भिंती त्या घटिनाहि भस्म करितों, अग्नी तृणाला जसा ५

१ चिन्हें २ राजदण्ड ३ वाघ ४ सुंदर ५ पराक्रमास ६ मजबूत किल्ला.

होऊनी रत उद्यमीं करिं नरा ! देवालयें पत्तनें
बांधी थोर खुशाल रे रुचिर तीं जीं घेतलीं त्वन्मनें
खालीं खास पडेल सर्वहि पहा शंका नसे यांत रे
माझें राज्य असे सदैव, मजला कांहींच ना अंत रे ६

जगन्नाथ धोंडू भांगले

---

## अल्प वयांत मरण.

'Its not growing like a tree, — B. JONSON

( तेलंग, आपटे, मोडक, वैद्य, गोखले वगैरे मंडळी अल्प वयांत मेली याची आठवण होऊन कवीस वरील बेन जानसनच्या उताऱ्यावरून विचार सुचले. अशा मंडळीस बायरन कवि असें ह्मणतो कीं

"Grown up in deeds & not in years",

फार दिवस जगून " यज्ञपशु " ह्मणवून घेण्यापेक्षां अल्प काळांतच जगास हळहळ लावण्यासारखीं कृत्यें करून क्षणांतच चमकलेल्या ताऱ्याप्रमाणें चमकून जाणें फार चांगलें. )

पद.

( पंच तुंड नररुण्डमालधर—— या चालीवर. )

एरंडापरि उंच वाढतां सत्व नसे मुळिं त्याला रे
किंवा तो वड माजुनि भारी फार दिवस जरि टिकला रे
परी शेवटीं जरठ होउनी वाळुनि कोळचि झाला रे
तो नच जैसा कामा येइ वाढुनि व्यर्थ जहाला रे

एक दिसाचा पुष्पगुच्छ तो फारचि सुंदर दिसला रे
जरी तत्क्षणीं सुंदर दिसुनी कीडे लागुनी झडला रे
क्षणिक असुनि तो प्रकाश दिव्याचि त्याजमधें किति भरला रे
प्रमाण अल्पचि सुंदर गुणगण झळकत सोडी त्याला रे
अल्प काल जरी टिके जीव हा पूर्ण होउनि गेला रे
एरंडापरि उंच वाढतां सत्व नसे मुळिं त्याला रे १

माणि कवि.

---

## चन्द्रप्रकाश

श्लोक.

या वेळिं कुंकुमच चर्चुनि भाळ–देशीं
राहे पतीस निरखूं युवतीच जैशी
तैशी दिशा सजलि उत्सुक काय पूर्व
ती तांबडी धरुनि कांति दिसे अपूर्व १.

निर्वीर भूमि-तल पाहुन अंधकार
चाले मदांध गज–हर्ष–भरें पुढार
पूर्वेस त्यास मृगराज मृगांक भेटे
हे अंधकार–गज–रक्तच काय वाटे २

लक्षावधी उगवती गगनांत तारे
हे भालदार शशि–भूपतिचेच सारे
बुक्का गुलाल उधळीतच भूनपानें
हे आणितात निजनाथ महोत्सवानें ३

अन्य स्थळीं दिवस घालवुनी विलासें
येतो पुन्हां परत लाजत चंद्र भासे

डोकावुनी हळुच रात्रि-वधूच पाहे
मर्जी असेल कशि काळजि हीच वाहे ४

सारून दूर पडदे जलद-स्वरूप
आला प्रगल्भ नटराज पुढें अमूप.
जों लावितात टक एकच लोक मात्र
तों रंग मंडपिं नभीं शशि रम्यगात्र ५

चंद्र-प्रभा गिरि-शिरावर फांकतात
ज्यांच्या लपे तम भयार्त गुहोदरांत
राजाच तो मन उदार करून ठेवी
डोक्यावरी कर-जणो अभयास दावी ६

नाना लतौषधिंस जीवन घालणारे
एकाच काळिं जन-नेत्र सुखावणारे.
पृथ्वी सुधा-धवल सर्व करून घाले
हे शीत शीत-किरणें कर धाडियेले ७

आकाश-भूमि-गिरि-कंदरिं पूर्व साचे
ओघावरी पडति ओघच चंद्रिकांचे
क्षीराब्धिच्या उठति या लहरीच काय!
कीं सर्व चंदन-रसांत बुडून जाय ८

या चांदण्यांत अमृतांत जणों बुडाल्या
हर्षांत डोलति हि नाचति मत्त झाल्या
वेली कशा स्वतनुनीं तरु वेढितात
प्रेमें प्रिया धरुन तन्मय काय होत. ९

वासुदेव वामन शास्त्री खरे

---

१ धनी, पक्षीं चंद्र. २ चुन्याप्रमाणें शुभ्र

# काव्यरत्नावली.

## अंक ९ वा.

## ऐतिहासिक करमणूक

आर्या.

एके दिवशीं रवि-कुल-भूषण शिवभूपतनय वीरवर
शिवनीति-दर्पणीं रत असतां तो, जेविं पंकजीं भ्रमर. १

तों कलि कलुश आला लोलुप मनभंजनार्थ तो कुमती
झाला कलिप्रतापें नृप पुण्यश्लोक नलहि हीनमती. २

प्रतिनिधि दुष्ट दुरात्मा संभाजीचा अमूल्य कंठहिरा
कलुषांकित संभाजी सर्वस्वीं जनहितास तो बहिरा.
येतांचि कुमति बोले " गर्क अहां हो ! कशांत राजाजी ? "
" वातोपदेशपठणीं " बोलें हें त्यास नृपति संभाजी. ४

" हें राजनीतिदर्पण आनंदें वाचण्यांत मन रमलें
उपदेशोक्तिसुधारस सेवाया लुब्धचित्त न विरमलें " ५

नृपवच ऐकुनि दुर्मति शांतपणें बोलिला तया भूपा
पीयूषनदी सोडुनि जावां कां व्यर्थ नाकळे कूपा ६

" दुःखद सुखापहारी उक्ति तया ह्मणति जन कसे नीती
कां वेड लागलें हो न कळे दुर्बुद्धि आठवे नृपती ७

घ्या इकडे पाहूं घ्या अर्थ करूं स्पष्ट ताम्र-लिखित-पट
ना तरि बहुधा करिलचि घात नृपा तव शिवाजिचें कपट ८

दुर्बुद्धि वचन ऐकुनि दिधलें त्यानें सुनीतिदर्पण तें
कुक्कुट मोल करिल कां जरि केलें त्यास रत्न अर्पण तें. ९

धिःकारयुक्त वचनें हांसुनि बोले नृपास तो अधम
सदसत् बुद्धि वयासी कुठली जो मग्न दुर्गुणीं परम १०

'गोब्राह्मणपालन करिं' ताताचें अप्रबुद्ध मत पाहें
इतुकें कां न कळे त्या, परमेश्वर त्यांसि काय नच पाहे. ११

शिंगें धारण करिते व्यर्थचि कां धेनु मस्तकावरती
निजरक्षणबल सकलां ईशें दिधलें कमी न पाव रती. १२

ब्राह्मण-पालन करणें कंकणधारीच सर्व कां असती
कीं ईश्वरसदनांतिल सकल जनामाजि काय ते नसती. १३

त्यांनीं कां न करावें निज संरक्षण जसेंचि अन्य जनें
पयघृतपक्वान्नाशनिं निशिदिनिं त्यानींच स्वस्थ कां निजणें. १४

आह्मी जन तेही जन आह्मामध्येंच जास्त काय असे
ब्राह्मण जरि मी आहें तरि मद्हृदयीं असत्यता न वसे. १५

नृपरक्षणिं रत नसतां स्वीकारूं पाहती नृपति-सेवा
सेवुनि चिर सुख शांती सेवाया मागती सुरस मेवा १६

तो आत्मकार्यसाधू दादोजी कोंडदेव राजगुरू
त्याची मसलत सर्वहि अलसप्रिय तोच विप्र रणभीरू. १७

'धर्म स्वकीय राखीं' ताताचा सदुपदेश हा दुसरा
ज्ञाते ह्मणतिल कां हें नृपतीकर्तव्य हा सुबोध खरा. १८

धर्मावन करणें हें सर्वस्वी व्यक्तिचें असे काम
कर्तव्य काय हें ही ? जन त्या वानीत ह्मणुनि नयधाम १९

जो निज धर्मद्वेष्टा त्यासि नृपें व्यर्थ काय दंडावें
भिन्न प्रकृत्यभिरुचि स्मृतिवच कां तें बळेंचि मोडावें. २०

बहुविध जाति जनांच्या त्यानां असतो स्वधर्म आवडता
स्वेच्छें रक्षण करिती स्वीकारीतिल कशास नावडता. २१

हें धर्म–तत्व सारें आहे त्या मूर्ख रामदासाचें
तो वृद्ध बकध्यानी बसुनि असे खेळ करि सदा साचे २२

'स्नेह न यवनासी करिं' हाहि दुराग्रह पहा शिवाजीचा
संग नको कां न कळे शांतीसाठीं गजासि वाजीचा. २३

म्लेच्छांहि सुखकर झाले तरि त्याचा स्नेह काय दवडावा
निज जन दुःखद होई यास्तव तत्संग कां न सोडावा. २४

तन्नाशेच्छा केली सेवावी शांतताच कां त्यांनीं ?
होइल सुबोध हा कां ! परनाशेच्छा करिल कां ज्ञानी ? २५

परपीडोत्सुक नर जो ईश्वर त्या योग्य शासना देतो
जो निज कर्तव्योत्सुक कधिंही त्या अपयशास ना दे तो २६

स्नेही दुःख निवारी रिपुनाशातें सहाय बहु करितो
शिव–रिपु झाला ह्मणुनी व्हावा कां तत्सुतास वैरी तो २७

हें मूर्खतत्व कवण्या अल्पमतींचेंच शुद्ध मज दिसतें
सदसद्विवेक गंधहि नसतो त्या ज्ञान कोठचें असतें ! २८

'ग्रहण करीं साधूवच' ऐकाया अगडबंब बोधावे
न कळे कोण सुधारक गेला या नीति–वचन–शोधातें. २९

साधू कां असती ते स्वर्गींचे देवदूत भूवरती
ईशप्रेरितवचनप्रसाद त्यांचाच कां अह्मावरती. ३०

साधू वचोपयोगी आहे आह्मास काय संसारीं
साधू षड्रिपुहारी वचनें त्यांचीं तशींच हो सारीं. ३१

हा राज्यभार सोडुनि तद्वच ऐकूनि साधु कां व्हावें
मग निरपेक्ष मतीनें राज्यावरि या तिलांजली द्यावे ३२

तद्वच मात्र हितावह ऐसें जाणूनि कोणिही वंदो
आह्मा ग्राह्य नसे तें किमपी ह्मणुनीच अल्पमति निंदो. ३३

ही सूचना कुणाची कथणें नलगेचि नृपति ! दासानें
शिव-कर्ण फुंकले हो सत्य नृपा ! भोंदु रामदासानें. ३४

‘ गत देश दुर्ग जिंकीं पराक्रमें मिळविं आणि दुर्ग दुजे ’
गेला बळेंचि पीडा आणाया पढत मूर्ख कोण सुजे. ३५

अहिशीं वैर करूनी क्षणांत जरि आत्मदुर्विपाक घडे.
किंवा हुताशनीं पद ठेविलिया फल तयास जेविं जडे. ३६

कितिकांची प्राणाहुति होते हे विकट कोट मिळवाया
गत देशार्जनिं झटणें त्रासाचि हा राज्यसूत्र वळवाया. ३७

ऐसें असतां ह्मणती दुजे हराया परिश्रमा द्यावें
वदणें स्वल्प असे परि करावया सज्ज कोणिहि न व्हावें ३८

शिव नृपतीनें मिळवुनि नेलें तें काय आपणासहित
जरि देश जिंकिले बहु तरि होतें काय आपणास हित. ३९

अल्पहि चिंता मनुजा सौख्य न दे सत्वरीं चिता दावी
चिंताधाम सदा नृप दासानें स्पष्ट गोष्ट न वदावी. ४०

ईश्वरदत्त तनूनें परतनु नाशार्थ. काल जरि नेला
आधीं क्रूरपणें त्या दोरीनें धर्मदूत मानेला ४१

मग काय धन्यता ती नृप होवोनीच या जगावरती
व्यर्थ जिणें त्याचें हो ज्या नाहीं राज्यसौख्य पाव रती ४२

ही सूचना दिसे मज कपटाची आपल्याच नाशाची
शिवमंत्रीजन यांतिल त्वद्द्वेष्ट्याचीच कल्पना साची ४३

दुष्टां शासन देउनि शिष्टांशीं नित्य लोभ ठेवावा
हा मात्र शिवाजीचा सत्य दिसे आत्मबुद्धिचा ठेवा ४४

परि मज वाटे त्यानें निंदेनें बोध हा खचित केला
जणुं आपण दुष्टांचा संग करुनि शासिलेंच शिष्टांला ४५

जनहितदक्ष, विवेकी राजमदें धुंद मूरती नसता
स्वप्निं न मुद्दां यावें कीं संभाजी असें सुगुणशास्ता ४६

शिष्ट जरी अपराधी झाला तरि त्यास कां न दंडावें ?
दुर्लक्ष्य जरि केलें पुनरपि तो शिष्ट करिल बंडावे ४७

शिष्ट कुणा मानावें अथवा हा पक्षपात कां व्हावा
अमका दुष्ट ह्मणोनी व्यर्थचि तो काय शासिला जावा ४८

हें राज्यशकटचालन नेइल कां पूज्यतेस राजाला
असुनीही अपराधी अन्यायें शिष्ट मानिलें ज्याला ४९

विषयपराङ्मुख होई केला कां श्रवण बोध तातचा
हाही योग्य असे कां बोध[^१] तरी रामदासभक्ताचा ५०

विधिनें जन्म दिला कां व्यर्थ नृपा सर्वथैव कष्टासी
असुनी सुखोपभोगा सेवुं नये काय वस्त्वभिष्टासी ५१

१ गाडा.

कां सर्व संग टाकुनि वास करावा सदा विजन जगतीं
कां श्रीयुत नगरातें सोडावें, योग्य काय ही रीती ५२

जें निर्मिला मनुज हा त्याच्या सौख्यास वस्तु जी केली
ती श्रमहारक मोदोत्पादक हो ! हीच, नच दुजी केली ५३

सुरवर मुनि वंद्यहि जे विषयोत्सुख पुरविती निजेच्छेते
साक्षात् त्या विधिनें हो श्रमही केले तया स्वकन्येते ५४

हेतु न जरि ईशाचा गोपीसदनीं कशास हो जावें
आह्मी मात्र नरांनीं संगोत्सुक व्हावयास लाजावें ५५

कामिन्यधर सुधारस आनंदें तो न मात्र चाखावा
विषतुल्य सोम रस तो प्रसाद ह्मणुनी कुवल्लिचा खावा ५६

कां तो शचिवर संतत परिरंभाधररसास हो सेवी ?
विषयपराङ्मुखवृत्ती ह्यांच्याठायीं न ईश कां ठेवी ? ५७

लावण्ययुक्त योषा यौवनकालांत कां बहू खुलती ?
कां मधु मृदु सुमकलिका वासंतीं गन्धयुक्त बहु फुलती ५८

तत्कृत्यगाथ ऐशीं असेल कां व्हावया अनुपयोगी
विद्वज्जन कां ह्मणती सृष्टींतिल सर्व वस्तु उपयोगी ? ५९

अज्ञानाचें वर्तन आणिल न क्रोध काय ईशाशीं
वस्तूनाश कराया यत्न करी त्यासि सत्य तो शासी ६०

गोपाळ कृष्णाजी जाधव.

# महिम्न

## श्लोक.

न जाणोनी तूझा सकल महिमा मत्स्तुति जरी
बरी न ब्रह्मादि स्तवनिं तव कां कुंठित तरी
स्वबुद्धीनें गातां तुज हर न निंदास्पद नर
अशा न्यायें होतो उचित अवघा हा परिकर १

मनातें वाणीतें तव न महिमा गोचर असे
निषेधानें तूतें श्रुतिहि चल चित्ता वदतसे
कसा कोणें गावा सकलसुरसंसेव्य अगुण
मनानें वाणीनें कवण जन वर्णी न सगुण २

विधात्याची वाणी मधुर असुनी आद्य कवि तो
विवो भव्यें काव्यें न तरि तुजसी वो तुकवितो
विभो वर्णोनीया तव गुणकथापुण्यनिकरा
कराया पूता वाक् मम मति सरे शर्व सुकरा ३

जगाची उत्पत्तिस्थितिलय करीतें सहज जें
त्रिधा मूर्ती वस्तुत्रय गुण तिन्हीं होउनि सजें
अशा ऐश्वर्यातें वरद तव ही कुत्सिते मति
कुशद्वें दूषूनी त्वरित वरिती रौरवगति ४

असे कांहीं चेष्टा कवण तनु ह्या साधन कसें
कशाच्या आधारें कवण भुवनातें रचितसे
अतर्क्या ऐश्वर्या तव शिव न जाणोनिच कवीं
कुतर्कीहीं ऐशा भुलविति जगा संवत कुधी ५

स्वयंभू लोकांते ह्मणुं वरिच ते देहज कसे
कशी सृष्टी स्रष्ट्याविण सकलही संभवतसे
अनीशा कैशी ही सुकर सजते दुष्कर कवि
भवभ्रांतीनें ह्या बडबडति भारी जडमति ६

श्रुती सांख्या योगा पशुपतिपथा वैष्णवमता
रुचीच्या भिन्नत्वें ऋजुविषममार्गांस अमिता
वरोनी अंतीं त्वन्निकट भव येतात अखिल
समुद्राते जैसें सकल सरितांतील सलिल ७

फणी नंदी नागाजिन परशु खट्वांग भसित
कपालादीतंत्रीं वरद असती तूं विलसित
तुझ्या भ्रूभंगानें विबुध बहु भूती मिळविती
न ऐशा योग्याला विषयमृगतृष्णा मळविती ८

किती विश्वा खोटें ह्मणति वदती सत्यहि किति
अशा सत्यासत्यें जगतिं अनुमानास न मिती
अशा मोहें लाजे स्तवन करण्याला मम मन
परी वाचाळाचें कधिं न नसतें धृष्ट वचन ९

कळाया ऐश्वर्या पवन तनुचे पद्मज[१] वरी
हरी खालीं जाती परि परतती आनतशिरीं
तिहीं भक्तीश्रद्धें करुनि तुज गातां प्रकटशी
स्वयें सेवा देवा तव विफल ती होइल कशी १०

अनायासें चाले दशवदनसत्ता त्रिभुवनीं
रणाची कंडू ही परम विलसे यद्भुजवनीं

---

१ कमळ

तुझ्या भक्तीचें हें फळ उदित झालें शिव खळीं
शिरोब्जांची माला तव चरणिं त्याणें रचियली ११
न लाभे पाताला वसुनि असल्या ही भुजबळा
बळातें झेलाया धवल अचला वाली कवळा
तया तूं अंगुष्ठें दडपिशि तदा होउनि कुशी
कुशीला टाकीना खल काय करोनी चवकशी १२
सुरेशाची लक्ष्मी विपुल असुनी नीच गणितो
स्वदासांहीं बाण त्रिभुवन जयातें मिळवितो
न वाटे हें गूढ त्रिपुरहर जो त्वत्पदिं नत
न कां होतो सिद्धी तरि मग तयाच्या करगत १३
क्षयाच्या धाकानें सुर असुर जैं होति चिकुर
तथां त्वां रक्षीलें सकरुण विभो प्राशुनि गर
तुझ्या कंठा काळें विष हि बहु दे रम्य सुषमा
विरूपानें श्लाघा भवभय हरा ये निरूपमा १४
अमोघां बाणांहीं जिणुनि सुरदैत्यर्षि मनुज
जगज्जेतृत्वातें निज मनिं धरी जो मनसिज
तुला तो लेखीतां इतर सरसा जीवि मुकला
वशीसंगें नोहे रण उचित हें सार उकला १५
जगातें ताराया पुरमथन तूं नृत्य करिशी
पदाघातें खालीं धरणि भुज भेदी रविशशी
नभातें लीलेनें भ्रमविशि सुखें स्वर्ग हि तरी
जटेनें तारीशी जण विभुपणा काय न करी १६
नभव्यापी तारासमुदय गमें फेनसम तो
जलौघ त्वन्मौलीवरि सलिलबिंदूच दिसतो

तयामाजीं द्वीपापरि जग जया सिंधु परिखा
सदानंदा मूर्ती गिरिविशी म्हणती निजसुखा १७
विधू भानू चाकें रथ माहि विधीसारथिवर
धनू मेरू तैसा प्रखर शर लक्ष्मीकरवर
खटाटोपा ऐशा त्रिपुरतृणदाहार्थ रचिशी
प्रभू स्वेच्छाचारी असति गुज हें स्पष्ट करिशी १८
सहस्रा पद्मांते हरि जमवुनी ठेवि निकटीं
कमी येतां एक त्वरित नयनाब्जास उपटी
सपर्या प्रायाची तव करुनिया चक्रवपु हो
तुझ्या भक्त्यौदार्यें त्रिजग हरि रक्षी हर अहो! १९
श्रुतीमाजी श्रद्धा धरुनि दृढ जे कर्म करिती
फलाचा दाता तूं समजुनि तुला चित्तिं धरिती•
ऋतू भंगे त्याचा तरि फल तया देशी विपुल
प्रभो तुझ्या सेवेविण फल न दे कर्म सकल २०
प्रजास्वामी कर्मी मखपति मखातें करितसे
ऋषि ऋत्विक् आणी सुरगण सदस्या वरितसे
अशा दक्षाच्या तूं करुनि मखभंगा विमुख जे
तयांच्या यज्ञाते विषम फल तूं देशि सहजें २१
बलात्कारें धाता मृगतनु धरूनी निजसुता
रमाया जैं धांवे वरुनि मनिं ईहा अनुचिता
शरें त्या लावीशी शिव उचित शिक्षा सुरवरा
दिसे तो आकाशीं मृगशबर अद्यापिहि नरां २२
जरी त्वां जाळीला रतिपति रुषें तो तृणसम
सुजाणी पावोनी वरद तव अर्धांग परम

अर्धे लावण्याच्या निज तुजसि ती स्त्रैण गणिते
प्रभो शंभो ऐशी सतत दुरुणी मूढ गमते २३
स्मशानीं जो खेळे स्मरहर पिशाचा मिळवुनी
चिताभस्मा अंगीं नरशिरकुमाला मिरवुनी
असो तूझें ऐसें अशुभ बहु शील प्रतिदिनीं
स्मरे तूतें भावें परम शुभ त्या देशि सदनीं २४
सदा योगी चित्तीं तुज अखिलतत्वाप्रति धरी
विधीनें वायूनं दमुनि तनु रोमांचित वरी
तया आनंदाश्रू स्रवति हृदयीं पाहि तुजला
बुडे आनन्दाच्या ह्रदिं सतत जो ब्रह्मि मुरला २५
रवी तूं तूं तारापति वसुमती तूं पवन तूं
त्रिपेत्र तूं वन्ही तूं हर सकलसाक्षी सलिल तूं
तुझ्या तत्वाची ही करुन गणना कुंठित अशी
विभो वाणी होते ऋत अनृत तूं एक असशी. २६
तिन्ही वृत्ती वेदत्रय तिन्हि सुराते त्रिभुवना
प्रभो ओंकारानें निखिल करिशी शब्दघटना
तुझ्या चौथे धामीं प्रणव करि नादाप्रति महा
समस्तव्यस्तानें अविकृत तुला वर्णि शिव हा. २७
भवा शर्वा रुद्रा पशुपतिस उग्रा सहमहा
सुभीमा ईशाना स्मरुनि तव नामाष्टक महा
श्रुति प्रत्येकाते स्तवन करिते शंकर नमो
तुला तेजोधामा शिव अतुलरूपाप्रति नमो २८
नमी नेदिष्टाते पुरहर दविष्ठाप्रति नमो.
नमो क्षोदिष्ठाते स्मरहर महिष्ठाप्रति नमो

नमो वर्षिष्टाते भवहर यविष्टांप्रति नमो
नमो सर्वात्म्याते शिवहर अचिंत्याप्रति नमो २९

बहुत रजरूपाते विश्वा करी शिव त्या नमो
प्रबल तमरूपाते नाशी तया हर त्या नमो
जनहित करी लोकीं सत्वें प्रभो मृड त्या नमो
त्रिगुणपर जों तेजोरूपा शिवाप्रति त्या नमो ३०

माझें चित्त कुठें प्रपंचविविध क्लेशांमधें जें लुठे
सीमा सर्व गुणां न हो तव अशी ईशा महत्वी कुठें
झालों भीतिमुळें बहू चकित मी स्वामीं मला आपली
भक्ती स्थीर करी ह्मणोनि चरणीं ही वाहि पद्यावलि ३१

मिळवुनि गिरिरूपी कज्जला सिंधुपात्रीं
सुरतरुवरशाखा लेखनी पृथ्विपत्रीं
जरि गुण लिहिण्याते शारदा नित्य जागे
तरि न तव गुणांचा पार देवेश लागे ३२

असुरसुर मुनींद्र प्रार्थिती चंद्रमौळी
अजगुण महिम्याते वर्णिताती कपाळी
सकलगुणवरिष्टें पुष्पदन्तें रचीलें
स्तवन रुचिर त्याचें दीर्घ वृत्ती उदेलें ३३

प्रतिदिनिं पठती जे शंकरस्तोत्र लोक
विमल मन करोनी लाधती रुद्रलोक
शिवसम असती ते तव कांता सुपुत्र
अमित धनयशायू पावती तेहिं अत्र ३४

दीक्षा दान तप तीर्थ होमादि सकल क्रिया
महिम्नस्तुतिपाठाची सोळावी न कला तया ३५

समाप्त झालें हें पुण्यस्तोत्र गंधर्व-भाषित
रमणीय न ज्या साम्य. शुभ ईश्वरवर्णन ३७

महेशापरी दूसरा देव नाहीं। अघोरापरी दूसरा मंत्र नाहीं
महिम्नापरी दूसरें स्तोत्र नाहीं। गुरूच्यापरी दूसरें तत्व नाहीं

सुमन रदन नामा सर्व गंधर्वपेंद्र
शिवपदकमलाचा दास ज्या मौलि चंद्र
सुरगुरुगुरु कोपें स्वाधिकाराहुनीं तो
च्युत तव महिम्याचें स्तोत्र हें रम्य गातो ३८

कुसुमदशनें दिव्य स्तोत्र जें हें रचीतो
सुरमुनिगण ज्याला फार सन्मान देतो
नर जरि पठतो हें मोक्षकामार्थ भावें
स्तविति सतत त्यावें किन्नर स्वर्ग पावे ३९

श्रीपुष्पदंतमुखतामरसातुनीं जें
घें उद्भवा स्तवन पापमला हरी जें
तेणें शिवप्रिय अशा स्तुतिलागि गातो
भावें प्रसन्न हर त्याप्रति शीघ्र होतो ४०

श्रीपुष्पदन्तगुरुकोप निवारण्याला
तूझी महिम्न ह्मणुनी स्तुति बोलिजेला
तीची अनंत करि प्राकृतदीपिका हीं
त्वत्पादिं पंडित मुदें सुजनांत वाहीं. ४१

दंडीं कवि.

## उद्यान-वर्णन

श्लोक.

उद्यान भाग अति सुंदर सुप्रभातीं
ज्या शोभती रुचिर पाटलसूर्यकांति
दुःखीजनां ह्रदय रंजक रम्य शोभा
आनंद दे न कथवे प्रभु दत्तलाभा १

विस्तीर्ण ही रुचिर सुंदर बाग पाहीं
आहे जिच्या निकटही घन अंबराई
शोभे जिला कनक सुंदर हें अवारुं
मध्यें लता रमण शोभति देवदारु २

या निंब नांदरुखिच्या अति उंच हारी
वाटे जयां गगनचुंबन सौख्य-कारी
ज्याच्यावरी पसरल्या हिरव्या लता रे
ज्या शोभल्या स्मितमुखी, जणुं गुच्छभारें ३

व्योमीं मेघा भेटण्या वृक्ष नाना
गेले; कीं तो प्राणदाताचि; याना
कां हो; ऐसें बोलतां वृक्ष साना
कोणीं कोणीं वांकवील्याचि माना ४

चौबाजूंनें शोभती चार हारी
ज्याचीं पर्णें हीरवीं गार सारीं
कांहीं झाडें नम्र झालीं फलांनीं
ठायीं ठायीं वेष्टिलीं तीं खगांनीं ५

कोठें कोठें मंजु मंजु स्वनानें
पक्षी गाती तर्पिण्या कर्णरंध्रें
कोठें कोठें कौतुकें मोर नाचे
जाणों स्नेहें सुंदरी नूपुराचें ६

ज्यांच्या खालीं मृत्तिका भोर काळी
ऐशीं नाना साधिलीं थोर आळीं
त्यामाजीं ही शोभल्या वृक्ष वेली
देती मोदा सर्वदा गंधशाली ७

कोठें कोठें मालती चंपकाची
शोभे जोडी; पुष्पभारेंचि साची
कोठें कोठें केतकी आणि जाई
आनंदाते भृंगवृंदासि देई ८

देती मोदा गंध ज्यांच्या फुलांचे
किंवा ठाणें मंजु गुंजारवाचें
कीं मोदाचें स्थान कामी जनाचें
ऐसे नाना कुंज येथें लतांचे ९

ठायीं ठायीं हे सुरू उंच गेले
जाणों व्योमा स्तंभ हे सत्य झाले
कोठें यांच्या वांकवील्या कमानी
मोठ्या यत्नें युक्तिनें माळी यांनीं १०

स्वर्गद्वारासारिखे शुभ्र मार्ग
शोभे तेणें सर्व उद्यानभाग
ठायीं ठायीं मांडिले दाट प्याले
द्याया मोदा चित्रपुष्पानुकूल्यें ११

कोठें कोठें मार्ग हे लंबमान
कोठें कोठें वक्र सर्पासमान
कोठें कोठें दीसती वीनं कोनीं
कोठें कोठें भांडती मच्छ दोन्हीं १२

कारंजीं हीं ऊडती उंच भारी
पाषाणाच्या रम्य हौदांत सारीं
झाडें झालीं गार ज्यांच्या तुषारें
लोकीं नांदें जीवनें जीव, बा रे १३

कारंजे कां होय हे धूम्रधारा
वाटे व्योमा जाय वेगें सरारा
भूपृष्ठीं हें जाहलें सर्व पाणी
वृष्टिच्छद्में लाज मेघासि आणी १४

बालार्काचें तेज ज्यांच्या तुषारीं
बिंबे; तेणें इंद्रचापानुकारी
कारंजे हें रंजवी चित्तरंगें
नाहीं कोणा सौख्य सन्मित्रसंगें ? १५

कोठें लाहो मंद मंदानिलाचा
कोठें लाहो मंजु गुंजारवाचा
कोठें पक्षी मंजु मंजुस्वनानीं
गावी कोठें ये झणत्कार कानीं १६

कोठें कोठें माधवी मंडपान्वीं । देवी मोदा सोज्वला चंद्रकांवी
कोठें कोठें पुष्पमालांकिता या । भ्रूसंकोचें वाढवी कामराया १७

मधुकर कवि.

काव्यरत्नावली.

अंक १० वा.

# कुन्तीकृष्णसंवाद

आर्या.

वनवास पूर्ण झाला कुंतिसुतांचा तसाच अज्ञात
राज्यविचारा बसती पांडव घेऊनि आपुली ज्ञातें १
सर्वहि कृष्णा वदती तूं जा वळवावयास कुजनांसें
वळती न तरी त्यांचा करण्याला ना उशीर तुज नास २
षण्मित्रकार्य करण्या जाई षड्शत्रुधारकाजवळ
त्या शठ पाषाणांवरि सत्वर तूं कृष्णमेघ आज वळ ३
विदुराघरा गेला पंडुसुतांचा सुमित्र मध्यान्हीं
भक्तांस जो सुजीवन दुष्टांते प्रळयकाळचा वन्ही ४
तेथें मग आतेते भेटे मग आतही गळां पडुन
प्रेमें पोटाशीं धरी न्हाणावि ती नेत्रिंचे जळाकडुन ५
देउनि आसन पूजन करुनि फिरुनि कुंति होय सद्गद ती
जो स्वसुत प्राणप्रिय त्या कृष्णा काय जाहली वदती ६

---

१ आपल इष्टमित्र २ दुर्योधनादि कौरवजनास ३ नाश ४ पाण्डव आणि द्रौपदी हे सहा, मित्र ५ कामक्रोधादि सहा शत्रुधारक दुर्योधन. ६ विदुराचें घर ७ कृष्ण. * कुंति.

माझे पांचाहि सुत जे पंचानन, ते खुशाल आहेत
गुरुसुश्रुषा घडावी ऐसा यन्मानसीं पुरा हेतु ७
दिसती जना कसे ते जेवी त्या शंकरा मुखें पांच
होती विधितनयाच्या तन्मतिभेदार्थ व्यर्थ खेपाच ८
ऐशां सुयोधन करी राज्यापासून दूर कपटानें
भूगोल वेष्टनातें मूर्ख जसा कृमिज-दोरकें पटानें ९
मत्सुतें मजला येथें गेले बुडवूनि दुःख-डोहांत
तेही विपन्नदीमधिं देवा बुडतात त्यांस दे हात १०
पांडव दयाब्धि असतां होती ते बिंदुचे परीसि मज
ऊर्न कसे हे कृष्णा कोणि न दुःखी हिचेपरी समज ११
घोर सभय कांतारीं पशु वसती व्याघ्र सिंह हिंसक शें
तेथें या गोवत्सीं क्रमिले असतील सांग दिवस कसे १२
येथें जागृत होती परिसुनि मत्पुत्र शंखभेरीस
तन्निद्राभंगास्तव तेथें त्यांच्यापुढें उभे रीस १३
जागृत करण्या येती गायक मग येत, मित्र उदयाते
वानीं त्या सहांसें हिंसक पशु जागविती जयांस न दया ते १४
सिंहासनीं बसुनीया राज्य करायास योग्य मम पुत्र
जे, कां खरे जितेंद्रिय त्यांना वनवास ! धन्य विधिसूत्र १५
या मत्पुत्रांमाजीं सर्वांहुनि जेष्ट तोचि धर्म खरा
दुर्योधन छाळि त्यातें कैचें ठावें सुनीतिमर्म खरा १६

---

१ हेतु २ नारद ३ किड्याचे पोटांतील तंतु ४ पाण्डव ५ पेक्षां ६ समुद्रापेक्षां बिंदु कमी आणि बिंदुपेक्षां ऊन–फारच कमी हा भाव ७ पांडव आणि द्रौपदी मिळून सहा.

जो षड्रिपुंतें जिंकीं सर्वांभूतीं करी समान दया
धर्मातें मानिति बहु दिलिपांबरिषीपरीस मानेद या १७
नवनाग-सहस्र-बळी दुसरा सुत तोचि भीमसेन तसा
काळासि दंड-कर्ता मत्स्यपुरीं वागला कसा नरसा १८
हेडिंब, बक निशाचर कीचकही मारि गुप्त राहून
तो भीम काय बल्लव ! ना दुसरें नीच कर्म याहून १९
जो का करद्वयानें युद्धीं दश शत-करासि हारविता
शूरां प्रताप दावुनि तेजें लोकांत मिरवितां रविता २०
क्षमा तो क्षमा कराया पराक्रमानें द्वितीय अमरेश
निष्पाप महर्षीसम रूपें मदनापरी न कम रेस २१
सर्वहि राजे जिंकुनि राज्य दिलें दुष्ट कुरुज पापिष्टा
जात्या कुबेर असतां नसतां मागे तुझी कृपा पिष्टा २२
त्याशीं करूनि युद्धा योद्धा जाई यशाविणें परत
यास्तवें जिष्णु वदति त्या यन्नामें तरति तेहि पापरत २३
सकल सुरवरा आश्रय शचिपति कीं मेदिनीस अहिहि तसा
त्याच परी हे कृष्णा त्वत्प्रियं आहे स्वबंधुंलों हिवसा २४
त्या नकुळा सहदेवा माद्रीनें सांडिलें लहान-पणीं
ते मज न कधीं त्यजती माझी होती तयां बहू जपणी २५
त्या तांन्हां त्यजुनि वनीं राहे अद्यापि कुंति-काय जित
आई न दुःखदायी मी मज माद्री करील वैरें फजित २६

---

१ दिलीप–अंबरिषी २ मान देणारे ३ नम्राप्रमाणें ४ सूर्यपणा. ५ पृथ्वी ६ यश न घेतां ७ अर्जुन * धर्मादिक पांडव ९ नकूल–सहदेव १० नकूलसहदेव ११ स्वर्गी.

कृष्णा द्रुपदसुता मज मत्पुत्रांहूनि बहुत आवडती
सावित्रीच मज गमे अन्यासम पुजिन वरि वरी वड ती २७
तद्वर्गा वर्णावें वितुकें थोडेंचि॰ अग्निपासून
झाली मिळे म्हणुनि मज ती मीं केलें बहू तपा सून २८
रूपें गुणें तशी ती मर्यादेनें असूनही कुलिना
तिजसम पातिव्रत्यीं कोण्या स्त्रीते कदा सुकवि तुलिना २९
पतिसंगें जाय वनां सोडुनिया लाडक्या स्वपुत्रांस
तेथें सोशीत तिची कुसुमाहुनि कोमला वपु त्रास ३०
बलवान शूर असतां पति आणिक बंधु जीस केशव ना
दुःखें भोगित फिरली वेणीविण मोकळेचि केश वनां ३१
पुण्यानें सुख लाभे लागे पापेंचि दुःख भोगाया
पापें कितीक केलीं कृष्णेनें मज कथीं प्रभो गा या ३२
त्वद्भगिनीचा केला दुष्टीं छळ त्या षठाधमामाजीं
गुरु भीष्मादिक तेथें होते सतिचेहि अंध मामाजी ३३
इतक्यासमोर आणी दुःशासन केश धरुनि दूरशिला॰
ज्याचे हल्का ठिण्या पाहुनियाही पळेल दूर शिला ३४
तेव्हां गुरुजन बसले स्वस्थाचि ऐकुनि अलाहि राग मला
त्या स्फटिकमालिकेमधिं क्षत्ता मात्राचि भला हिरा गमला ३५

---

१ अन्वयार्थ - तद्वर्गा वर्णावें तितकें थोडेंचि. कारण ती अग्नीपासून झाली अशी जो ती द्रौपदी. मीं बहु तपा केलें; ह्मणून मज सून झाली. २ शरीर ३ पाठभेदः— प्रथम आणि तृतीय चरण बदल नाहीं " पतिजीला तूंहि बंधु जगदीशा. सति ग, विना नंदिवइनभुजगदीशा ४ द्रौपदी ५ श्रेष्ठ ( भीष्मद्रोणादि ) ६ विदुर '

दुर्योधनादि दुष्टां भीष्में बोलूं नयेचि कां कांहीं
मम हंस[1] पंकिं रुवतां बहु केलें काव काव कोकांहीं ३६
धृतराष्ट्रा विदुर वदे वाटे ही बहुत तव-सुतांस मजा
परि तूं त्यां बोधि असें येणें मिळवाल अनसुता[3] समजा ३७
तोंडपुजेपण सोडुनि सत्य-वचें मदारि वे करी सुकट
यास्तव पूज्य विदुर मज सर्वां आर्यत्व ना मिळे फुकट ३८
भेट सुविद्या, पंडित शास्त्री धनवान, कीर्तनी[4] वक्ता
त्यापरि वेदांतीही दुर्लभ देखों सुवर्तनी वक्ता[6] ३९
कृष्णा त्या समयाचें होतें मजला क्षणोक्षणीं स्मरण
मज मत्सुत नावडती ह्या स्थितिहुनि गोड वाटतें मरण ४०
निजसत्तात्मक वस्तू तद्विनियोगा दुजा करूं शकतो
पाहुनि सहन करी जो पुरुष न केवळ जगीं नपूंसक तो ४१
मत्पविनें मृग वधुनी आणियलें विघ्न आपणावरि तें
द्यूता खेळुनि माझे झाले हे पुत्र नीचता वरिते ४२
नाहीं दुःख मला तें गेलें जरी राज्य कौरवां हातीं
कृष्णा-च्छल दुःख-नदी माझे हृदयीं अखंड वाहावी ४३
होतो सुखोपभोगें पुण्यक्षय पापनाश तैसाच
बहु दुःख भोग होतां नाहीं होणार काय बा साचें* ४४

---

१ पांडव २ कावळ्यांनीं ३ अन्र—असुता ह्म० मरण ४ कीर्तन करणारा ५ वेळेवर ६ सदाचरणी असून बोलणारा असा ७ पारतंत्र्य स्थितीहून * पाठभेदः—

पुण्यक्षयासि कारण सुख, तैसें पापदुःख भोगावें
तेव्हां मत्सुत पापी कां नच वदतील जन विभो गा वे

कृष्णा बाई दुष्टीं जरि अमुची धृष्टि धुवुनि गे हात
पुरविलि परी न भीऊं राहूं तुझिया ममत्वगेहांत ४५
पूर्वगणें मज वाटे फेडिल हें दुःख तुझि कृपा उसनें
बहु दिवस सांचलेल्या उष्णाप्रति तो क्षणांत पाऊस नें ४३
प्रस्तुत कौरव ऊद्धत रुचती त्यांना कदा न व्यासमतें
वर शेपकन्यकेच्छुक वर्षा ऋतुंतील दानव्यांसम ते ४६
कर्त्ताचि करविता तूं सर्वहि कार्यें प्रभो तवाधीन
त्वल्लीला समजाया श्री सांबाचि योग्य मानवां धी न ४७
विनयनंमृतोदधि मलौ सांप्रत तरण्या बहू असामान्य
पांडवनौका तेथें नावाडी कोण तुज असा मान्य ४८
येथें दिलें म्हणुनि मज मी हा दे दोष मायबापांला
अग्निसान्निध वसुनी तेजा पावेल काय वा पाला ४९.
कोठवरी तरि सांगूं दुःखें हीं संपणार नाहींत
तूं सर्वसाक्षि असशी सारें तुजला असेंचि माहींत ५०
तो दुःखसिंधु मातें दुस्तर यास्तव वेद असें तुजला
तरि मत्सुबंधुजों बा हो त्या तूं कीं कृपाळु सेतु जलां ५१
ऐसें वाटे चित्तीं आला हा व्यर्थ काय जन्मातें
मत्सुत कृतीस बघुनी निंदित नसतील काय जन मातें ५२
तो पार्थ जन्मतांची आकाशांतूनि होय वाणी ती
जीच्या सत्यत्वाची कीर्ति जगीं सर्व लोक वाणीती ५३

---

१ त्या किड्यास सातार-प्रांतीं दानवा ह्मणतात २ धृतराष्ट्र ३ कुंतीला ४ कृष्ण ५ भावाचा मुलगा कृष्ण ६ पूल ७ आकाशवाणी

हे कुंती कुमर तुझा वसुधा जिंकुनि मिळविल मान[1]
पाहूनि यत्पराक्रम स्वर्गीं शचिपतिहि डोलविल मान[2] ५४
कौरव वधूनि राज्या मिळवुनि हा करिल तीन वाजिमखें[3]
तो पार्थ मत्स्यनगरीं[4] अन्याचे भक्षि काय ! आजि मख ५५
मी त्या नभेश्वरीची गा भिंदा नाहीं अशा वचें कारित
काथें धर्मामध्यें सत्यत्वाची दिसे न एक रित ५६
मज पति सोडुनि गेला गेली टाकूनि संपदा सारी
ह्याचें दुःख न मजला कौरव झाले त्वदीय दामारी ५७
मज सुतवियोग झाला कृष्णा त्या आज वर्ष चवदावें
सुतविरहजन्यदुःखा[6] वैऱ्यानींही कधीं नच वदावें ५८
गोत[7] प्रिय अन्य न मज तान्ह्याविण कंठुं काळ कोठवर
सौभाग्यवतीस दिसे मंगलसूत्राविं तसे न गोठ[*] वर ५९
बहु दिन भेटि न होणें, तें बीजचि नष्ट जीवनाशेचे
जन करिती श्राद्धादिक कां मेघावीण सुकति ना शेतें ६०
या न्यायें[10] ते मजला कीं मी त्यां मरण पावलें वाटे
आतां धर्मास कधीं अजुनि तरी टाक पांवलें[11] वांटे ६१
धर्मासि सांग अणखी नुरलें त्वद्धर्मिचें सदाचरण
क्षत्रियकुलज असा तूं वाटावें प्रिय तुला सदाच[12] रण ६२
ऐसें असूनि मानें परि परराष्ट्रीं खुशाल मत्स्यपुरीं
वसशी श्राद्धीं द्विज तो जेवी[13] जेवीतसे यथेच्छ पुरी[14] ६३

---

१ प्रतिष्ठा २ मान डोलविणें—वाहवा करणें ३ अश्वमेध ४ विराट नगरामध्यें ५ भाकरीचे अति बारीक तुकडे [ कण ] ही संज्ञा सातारा प्रांतीं आहे. ६ वियोगानें होणारें ७ पांडव * हातांतील भूषण ९ जगण्याची आशा १० - ११ रीतीनें चाल १२ अक्षय १३ जसा १४ पदार्थ.

बैसावया सुखासनें आहे लागे न मळ जरा टांचे
जनवच-कवचें परी वरि पांडव आश्रित वैसे विर.टाचे ६४
जो निज पराक्रमानें अन्या द्योतवि तयापरी सैत्व
नाहीं अन्य नराला अन्या लोहत्वें या परीसत्व ६५
जो निज भुजसामर्थ्यें गाजे धरणी तयास जननी ती
प्रसवूनि धन्य झाली धर्मा तूज कां न ठावि जननीती ६६
हे धर्मा त्वत्कृतिनें केलें तुजला जगीं उणें तेजें
अन्य दिनीं परसदनीं पवती अपमान पाहुणे ते जे ६७
क्रीडाशी जाणुनि तेथें नामार्थें मत्स्यपूर तें पाणी
पारे तद्भूपाश्रयमल तूझें मळवील पूरतें पाणी ६८
तरि तूं ती पुरि सोडीं निजराज्याची तशी निरास पणीं
घालुनि निरास शब्दीं 'ल, तिजे अक्षरिं वरी निरालपणीं ६९
न करी दीप तयाला तात तुझा पंडुराव हा रावि कीं
तूं प्रखर तेज रिपुतम नासुनिया कीर्ति घेइ हार विकी ७०
जो थोर पुरुष आहे तो संतोषे न अल्प लाभांत
खाई न सुधाप्राशक मिटक्या देवूनि करपला भात ७१
धर्मा न मान्य होई राज्याविण पांच सात गांवांस
उच्छिष्टास्तव हंसा करशी कां वायसांत गा वास ७२
बा, निजपूर्वज कैसे होते तत्सत्प्रताप तो कानीं
परिसूनिया करावें त्यांचें अनुकरण सुज्ञ लोकांनीं ७३

---

१ पालखी २ जगाचें बोलणें ( नावें ठेवणें ) चिलखत ३ या क्रियापदाचा कर्ता कवच ४ तेज ५ लोखंडपणा-परीसपणा ६ निपाश ७ परंतु * निरालसपणा-पाठभेद ( ल, उपांत्यक्षरि ) ९ करूं नको.

[library stamp]

मग त्या चौघांसि कथी पत्नी छाळितां कसे पटापट ते
वदलां सत्य करा वच दडबडणें व्यर्थ पोपटां पटतें ७४
भय दाविण्यास चोरां भोकति ते श्वान कीं बघा सारे
मग पुच्छा हालविती त्यांच्या घेऊनि एक घासा रे ७५
वदणें सोपें आहे जीवावरि ये करावया करणी
बोलें तसाच चाले निपज लक्षांत एक या धरणीं ७६
तुह्मि पांच शूर असतां राज्यमदें करिति शत्रुजन नखरे
त्यां, निजवाल रणीं तरि मज्जठरीं घेतलें, सुजनन खरें ७७
वदले वृषभ तुम्हां जे गेलां जेव्हां वनीं अशा-[1]करितां
त्यांची तुम्ही करा रे त्वरित रणीं दावुनी दशा [2]करिता ७८
द्यूतीं विरुद्ध फासे झाले तेव्हां तुझ्याचि दादानें
भीमा सर्व हरविलें तरि तूं घे परत तें गदादानें ७९
[3]तूं सिंह [7]शत्रु [*]करि ते मारुनि [9]करि [10]मुक्त जाण मग कंठीं
त्या मुक्तांचा करुनी [11]पतिम दे घालण्यास [12]मग कंठीं ८०
पार्था सुवीरजा मी झालें वरिलेंहि माच वीरास
मज वीरमाय करण्या छेदुनि कुरुकंठ सांधवी रास ८१
तो समय जवळ आला युद्धा करिं तूं वरूनि सावधता
सीतेच्या कैवारें राम जसा होय राक्षसा वधता ८२
क्षत्रिय तेचि वदावे शूरपणें जे रणांत भिडतात
समरीं सुत पितयाची वा पुत्राची धरी न भिड तात ८३

---

१ धर्मेवर चौघे पांडव २ पांडवांना ३ ह्यासाठ ४ गजपणा ५ दंगाणी ( द्यूतांत जो डाव पडतो ) गदारूप डाव टाकून ६ भीम. ७ कौरव * हत्ती ९ कर १० मी तीं [ सोडविंग, मुक्त देंग. ११ दागिना विशेष १२ गळ्यांत.

वद नकुळा सहदेवा सुत हो धैर्ये रणांत हेमाद्री
होउनि युद्ध करावें स्वर्गी हर्षों बघूनि हें माद्री ८४
रिपुभूमि नांगराया प्रभु नांगर बैल तूमचा दादा
नांवा मात्र खरे तुह्मि हांकिव मी बोलुनी वचा दादा ८५
मग शत्रुशेषतृण हें मन्मार्गांचें तें न तेथ राहील
मग बीजराज्य त्यांतें लोकप्रियताहि वृद्धि येईल ८६
कुरु-वंश-वंशी जाळिल त्यावांचुनि शांत होइना पुरवी
कृष्णा, अग्निसुता मग तोषें पाहील हस्तिनापुर ती ८७
युद्ध कराया सिद्धचि वेगें व्हा कृष्ण दुष्ट का वारे
जाणे वर त्यां चिंता स्पर्शील तुम्हां अनिष्ट कां वारें ८८
कृष्णा त्यां वद मरणा भीतां न रणीं घुसा अगा जा हो
राज्यास्तव सुत माझे युद्धें निमाले असा अगाजा हो ८९
मेला नाहीं नर-वर ज्याची जगीं कीर्ति तो चिरंजीव
माझा निरोप परिसुनि रुसती ते मारि न तोंचि रंजीवें ९०
अंर्वा सांग असें बा तुमच्यानें हें जरी घडे ना कीं
प्राण त्यजूनि जा रे नरकीं दुष्कृतिहि नावडे नाकीं ९१
"हरि हरि" वदलें ऐसें शेवटिं मी लाडक्या मुलांना तें
ठाउक आहे ह्यांचें कृष्णा दुःखांशिं कीं तुला नातें ९२

---

१ पर्वत २ नकुलसहदेवाची आई ३ वेळू, बांबू ४ पूर्ण ५ द्रौपदी ६ अग्नीची मुलगी द्रौपदी अग्नींतून निघाली अशी कथा आहे. ७ कृष्ण काळजी ( कृष्णाला काळजी तुह्माला नको. ) ८ स्मरा ( कृष्णाला स्मरा ) ९ प्रसिद्धी १० रमवावें ११ नरकांत १२ स्वर्गांत १३ अशा बोलण्याचें १४ द्रौपदीचे [ कृष्णा हें संबोधन केल्या-वर कुंतीचे दुःखाशीं समजावें ]

कोठवरी तरि आत्वां दुःखें-हीं सहन करिल हा काय
हरि तूं माझा[1] असतां रिपु गांजिति[2] मज वदूं अहा! काय ९३
कृष्ण वदे हे आते विरला मति ही अशी नरांमाजी
तुजसम सुगुणी आहे धन्य वदावी कशी न रामा जी! ९४
होइन वरमाय कधीं हीं इच्छा सर्व कामिनी वैरिती
पारि वीरमाय होण्या उत्सुक आशि विरल मेदिनी[3]वरि[4]ती ९५
इतकी ज्ञानी असतां सुखदुःख न मानिशी समान कशी
भरजारिचे वस्त्रावर लोकारिची काय उत्तमा नकशी[5] ९६
होतिल तव सुत विजयी सरले बघ आज अब्द[6] तेरा गे
मग तूं वदाशिल शिशुंना व्यर्थचि वदलें कुशब्द दे रागें ९७
तव सुत न नीचकुलिचे अल्प सुखातें न भुलति पाहून
तवहेतु पूर्ण करें होतिल वरँ[7] भूमिचे* नृपांहून ९८
पुसुनी आतेस निघे कौरव-कांकाचिया[9] अगारास
बोधवचमौक्तिकांची दे त्यां[10] पारिक्षिती[11] अगा रासि[12] ९९
वैशंपायन बोले राया धन्या तुझी निपर्ण[13]जी ती
स्वर्गी गेली हि जरी राहे सत्कीर्ति करूनि पण जीती[14] १००

नारायण रघुनाथ अनगळ.

---

१ कुंतीचा आग्र २ करिताव ३ पृथ्वी ४ वर ५ कशिदा. ६ वर्ष ७ श्रेष्ठ * पृथ्वीचे राजापेक्षा [ सार्वभौम ] ९ कावळ्यांच्या १० कौरव कावळे ११ हे जनमेजया १२ मोत्यांची रास—ढीग १३ कुंति १४ जिवंत

# करुणविलास २ रा

## ( भाषांतर* )

श्लोक.

माझें कसें कठिण दैव असे विलोका
जाते प्रिया त्यजुनिया मज आजि नाकां
कोणा मना निज गुजां कथिशाल बापा
वारील कोण वचनीं तव तीव्र तापा १
दारीं मला निरखितां विनयें उठोनी
पाहोनि कामसचिवप्रियलोचनांनीं
बाले अतां चतुर मंजुल भाषणांनीं
वारील कोण वद गे मम तापवन्ही २
सारेंच मद्विषय विस्मृतपंथिं जाती
विद्या हि खेदमलिना मज न स्फुरे ती
देवीपरी हरिणबालकचंचलाक्षी
अन्यस्थला न हृदयाविण याच लक्षी ३
जातां त्वरें परमधामपदा दयेते
कैसें तुवां त्यजियलेस दयालुचित्ते
जो नीलवारिजमदाम हरी नितांत
तो कां न दाखविशि भामिनि दृष्टिपात ४
माझ्या करा धरुनि साहणिं तूं विवाहीं
झालीस रूढ पदअंगभयेंच कांहीं
स्वर्गास एकलि विलासिनि कोंवि जासी
ही त्वत्कृती मम मनास अतीव लोसी ५

---

* पंडित जगन्नाथरायकृत १ सर्गास २ जाळवे.

सालंकृती रसवती गुणभावमूर्ती
जीची गमे श्रुतिस मंजुल वर्णपंक्ती
चित्तानुसी कवि निघे न मनोभिरामा
निर्दोष मन्मुकवितेपरि ही सुरामा ६

सींना समग्र शमने सरसोरुहांची
कांति चढे अतुल रातिपतीस साची
दुर्थे अती करिति कोकिलकूजिताते
कांते प्रयाण परिसोनि तुझे दिवाते ७

सौदामिनीसम मला अमरेशभोगा
देवोनि कांहिं दिन कां वरिलेंस त्यागा
मंत्रोज्झिता नृपतिला नृपलक्ष्मि जेवी
भाग्यच्युता मजसि टाकियलेंस तेवी ८

नेणों प्रमाद घडला मजपासुनीया
जेणें तुवांहि धरिला मनिं कोप वाया
साध्वी असोनि करभोरु त्यजोनि कैसी
मावेंच, मुक्तिसखिच्या गृहिं दूर जासी ९

भोगांस सेवुनि तुझ्या रमणीयशीले
पीयूषतुल्य कवनें रचिलीं रसाळें
जातां सुधांशुमुखि तेंचि निवार्तवर्त्मा
काव्यांत केंवि मम येईल काव्यआत्मा १०

तेणें धरे धवलता तव हासकांति
राकेश ये विफलता कवि मानिताती

---

१ कमळाचे २ चन्द्रास ३ स्वर्गास ४ नाशमार्गास ५ पौर्णिमेस

स्वर्गास तूं अवचितां करितां प्रयाण
राका पहा मिरवि कांति जगांत पूर्ण ११

मंदस्मितामृतरसें अभिषेकुनी ही
पूजी मला विकसितोत्पल लोचनांही
कामेश्वरी अनिशमंगलकार्यकर्त्री
सोडी प्रिया न हृदया गृहदेवता ती १२

मन्मानुनी ' रमण नाथा ' अशा पदांही
स्वर्गीं मला चढविलेंस महीवरी ही
जावोनिया सुरगृहा-अवनीरजांत
कैसें मला ढकलणें तुज हें प्रशस्त १३

लावण्य उज्वल तसेंच अपूर्व शील
विद्या कला विनय न्याय तसा अमोल
ऐशा गुणां करुनियां हि अनाथ कैसी—
नाथा त्यजूनि मज, सुंदरि नाकिं जाशी १३

चामीकरद्युति शुचित्व हि पाहुनीया
भारीच कृष्णवदना चढते असूया
तेणेंच कोपदहनीं तुज जाळियेलें
चेतोहरे अनुभवा मज आजि आलें १५

कर्पूरवर्तिपरि जी हरि नेत्रतापा
कंठा जिची कमलराजिसमा भुजा पां
माझ्या मनास कवितेपरि रंजवी जें
देवांगनेपरि जगांत सदैव गाजे १६

---

१ संतत २ अपूर्व ३ सुवर्णकांती ४ अग्नीस ५ पापा.

स्वप्नीं कधीं हि अभिलाष धरोनि चित्तीं
चिंती न अन्य पतिवांचुनि कुंददंती
कैसी मला त्यजुनिया परपूरुषाते
त्या निर्गुणास वरि भामिनि आजि हो वे १७

जीची गिरा मधुर फार सुधेसमान
यद्रूप पाहुनि रती गलिताभिमान
तीची अलौकिक कृती परिसोनि थोर
वत्सद्रुणस्वनिं कां बनती न मोर १८

दंडी कवि.

---

# जन्मभूमि

श्लोक.

ज्या भूमीं जनना अम्हीं सकल हे येवों तिथें तो असे
जो ना मायिक बंध वाच्य वदना; कोठेंहि काया वसे
भूमी ती अमुची कुठें तरि असो भूचक्रिं किंवा ध्रुवीं
वेथें थार असे अयोमणि अम्हां तो ओढवो त्या भुवीं ! १

दासानीं भुइ ती अदासिंहि तसी रक्ता असे हो खरी
भीरूलाहि वसी रथी प्रबल जो त्यालाहि त्याच्यापरी
'जागा सुंदर कोणती जगिं ?' असें कोणा विचारूनियां
पाहा; उत्तर साभिमानः- 'कुठली ती जन्मभूहूनियां ?' ५

मद्भूमि ! प्रिय ते हरिद्रिरि तुझे होती किती गे मला !
सारे अन्य समुद्रतीर तुळितां त्यां ठेविं मी बाजुला !

---

मदनस्त्री २ मांत्रिक, मायेचा ३ प्रीति केलेली अशी

कैंचा घेर हरिन्मणी अणखिही नीलोत्पल स्पर्धिती
त्वच्छादा तुझिया नभा हरित त्या ग्रीष्मा मुकांता करी? २

मात कोण म्हणे किती असती नाना स्थलीं तीं बरीं
पुष्प, जा करितात नंदनवना भव्य प्रभा भूवरी
यांतील कधीं न होती रुचिरा माला मला कोमला
त्यापेक्षां मजला अतीव विमला ज्या होति मद्भूमिला ३

मद्भूमि ! प्रिय तूं मला किति तरी ! जातों विदेशीं जरी
पाहातों विविधाहि शोभा जगतीं अन्य स्थलीं मी, तरी
आनंद करितांच सेवन सदा त्या वायुला जो मला
नेतो वारिपथें सुखें करुनियां त्या हृद्य मद्भूमिला. ४

जगन्नाथ धोंडू भांगळे.

---

## सोंगटी

**श्लोक.**

ही सोंगटी गमतसे मज वारनारी
जी रंगे दिवसयामिनि वर्णि चारी
जीच्याच अक्षकपटें सखया विलेकीं
धर्मार्थलोपहि घडे झणि मृत्यु—लोकीं. १

---

१ वारांगना —वेश्या. २ चार वर्ग (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र) वेश्यापक्षीं (कांवडा, पिंवळा, हिरवा व काळा) सोंगट्यापक्षीं. ३ अक्षकपट (नेत्रकौशल्यानें) वेश्यापक्षीं (फांशाच्या पटानें) सोंगट्यापक्षीं ४ धर्मार्थलोप [धर्म व अर्थ यांचा नाश] वेश्यापक्षीं (धर्म राजाच्या धनाचा नाश) सोंगट्यापक्षीं.

# काव्यरत्नावली.

## अंक ११ वा.

### शांत विलास ४ था

( भाषांतर* )

श्लोक.

दवानल उठे महाविषयकाननीं वो घन
जयांत गवसोनिया विकल जाहलें मन्मन
रम्य मधुरिमा जया सतत सेविवी सुंदरी
मुकुंदवदनेंदुते चिर भजो चकोरापरी १

अये उदधिनंदिनी परमदीन मी शीणलों
अति प्रखर संसृतिज्वलनजालिं हीं पोळलों
प्रभातजलजास जे नयन लाजवीतीं तव
तिहीं मजसि शांतवीं त्वरित आजि वो माधव २

कृपें मनुजताप जी गुरु निवारि येवो मनीं
तनु द्युति सदा अशा भजति जीस सौदामिनी
सहर्ष यमुनातटीं विबुधपादपालंबिनी
मदीय मतिला रुचो अशि नवीन कादंबिनी ३

सदैव यमुनातटानिकट शोभवी जो वना
पथश्रम निवारुनी सुखविशी सदा जीवना

* जगन्नाथराय पंडितविरचित भामिनीविलासांतील शान्तविलास.

अपूर्व वपुकांति जो विपुल ज्या लता वेष्टिती
तमालतरु मत्श्रमा सकल तो हरुं संमती ३

धरा सारी ज्योत्स्नामयनवसुधेनें मढवितो
जनाच्या संतापा त्रिविधाहि क्षणीं जो शमवितो
वसे वृंदारण्यीं नत अमर ज्याचे सहचर
हरो अंतर्ध्वांता मम नव असा तो जलधर ४

ग्रीष्मार्कचंडकिरणीं क्षिति तप्त होतां
वर्षापयोधर जसा विस शांतिदाता
संसारतापतपनें बहु तप्त दीन
मातें तसा यदुपती करुं तापहीन ६

अपारीं संसारीं विषम विषयाच्या कुविपिनीं
सदा घेरे घेतां अतिशयित ही दुःखित मनीं
धरी कालिंदीचा पुलिन आजि मद्ग्लानि बघुनी
तमाल श्रीकृष्ण त्वरित निवतूं यास म्हणुनी ७

आलींगि सागरसुता सुरसा तमाला
जैसी प्रियंगुलतिका दयिता तमाला
प्राणावसानिं हृदयीं धरि जो निवास
पावो विकास करुनीच तमोनिरास ८

जी पाहतां लोचनिं हो अपार
आनंद ज्याचा गणवे न पार
कदांबिनी तो मम ताप वारो
सदैव चित्सौख्य मनांत धारो ९

ईशा निर्मल आणि शुद्ध वचनीं जें त्वा दिलें शिक्षण
स्वप्नीं ही न तया स्मरोनि वरिलें या निश्चयें मीपण

यावें मानिशीं आपुला ज़ारे असे हा सत्कृतीनें खुजा
दूजा मत्त न याहुनी तुजहुनी नाहीं दयाळु दुजा १०
जा पाताळिं सुखें करी वसतिला स्वर्गांत मेरूवरी
राहे सात रसांत ही उदर तूं आशा न भंगे परी
आविद्याधिविनाश आणि परम क्षेमा जरी वांछिशी
सेवीं कृष्णरसायनास इतरां आयासिं कां शीणशी ११
तारिलेंस गणिका अजामिल
पापिवृंद अशि कीर्ति उज्वल
ऐकुनी विनवितों तुज कांहीं
तूं नुपेक्षि भवगर्तिं मला ही १२
जाणोनी रिपुषट्क दृश्य अवघें जें सर्व तें दूषित
मुद्रा नेत्रिं करोनि पंच विषयां सारोनि दूरीं द्रुत
अंतर्ध्वांत समस्त ही पळवुनी पावेन केव्हांचि ती
सच्चित्सांद्रं अखंड नूतन नभीं जे वारिदाची द्युती १३
जीवीं संसृतिचाक्रिं नित्य फिरतां द्राक्षारसा चाखिलें
भक्षीली सित शर्करा अमृतही स्वर्गांत आस्वादिलें
प्राशिलें विमला जलास विपिनीं रंभाधरा खंडिलें
कृष्णीं जें मधुरत्व त्यासमवसे कां त्यांत बोला भले १४
पापाच्या गिरिला पवी भवगदा जें औषध प्रस्फुट
मिथ्या ज्ञानतमास उग्र तरणी जें भासले उद्भट
क्लेशाच्या तरुसंहतीस गमतें जें हो शिखी निर्दय
मुक्तिद्वार असें जगीं गजबजे तें कृष्णवर्णद्वय १५
रे चित्ता ! कथितों तुझें हित धरीं त्याची न तूं संगती
चारी गोव्रज गोकुळांत असतो जो गोप मेघद्युती

मोहूनी तुजला स्वकीय मधुरीं पीयूषमन्दस्मितीं
स्वान्मिता विषयासमेव तुजला नाशील तो दुर्मती १६

होतां मानसिं नम्र जें निपजवी प्रेमा अती निर्भर
होतां कंठिं सलग्न जें खाणितसे मूलाज्ञतेचा भर
द्राक्षाचें मधुरत्व ही मधुरिमा सस्नेह वाहे शिरीं
तें जिव्हे वद कृष्ण नाम असती तूं गे रसज्ञे जरीं. १७

भूमीभागीं विहग असतीं रम्यरूपी अनेक
त्यांमाजी हीं मम मन वसे चातकीं मीत एक
आहे ज्याचा प्रिय जलद ज्यां पाहतां स्वीय चित्तीं
स्फूर्ती पावे सहज परम ब्रह्म कृष्णाख्य मूर्ती १८

यत्तेजानें भुवन अवघें भासतें भासमान
जीवीं जागे अनुदिनिं अहंवृत्ति जें तन्निदान
ऐशा तत्वा स्वहृदयगता नेणुनी एकमेकां
तत्स्थानातें पुसति किति ह्या जीव मोहा विलोका. १९

सेवेची तुज लालसा जरि असे तूं सेविं लक्ष्मीवरा
चिंता चक्रधरास चितिं जरि तूं बा चिंतनीं हांवरा
आलापीं अनुरक्त तूं जरि सदा कंदर्प शत्रूस गा
निद्रेची तुज आवडी तरि परब्रह्मीं मुरावें अगा २०

भवग्रीष्में तापें प्रबलतर पोळोनि मनसीं
तमोग्रंथीलागीं त्वरित शिथिलत्वास अणुनी
विशुद्धी ह्या आत्मामृतसरसिं नैराश्य शिशिरीं
बुडोनीया धूर्ती सुकृति गज स्वेच्छें अघपरी २१

बंधाच्या मुक्तिसाठीं प्रथम मख अशा कर्मपाशां वरीती
चित्ताच्या शांतिसाठीं विविध मुनिमता सर्वदा चिंतिवाती.

तीर्थीं स्नाना करीती अशुभ जलधिंच्या पार जायास लोक
भ्रांतीनें भ्रमलेले कितिक करिति ते न प्रमादा अनेक २२

चुंबोनि आधिं हरिच्या चरणास जंघा
ज्ञानोरुनाभि हृदया मम मानसा गा
प्रेमोत्कटें कवळुनी मग आननाब्जीं
तूं नित्य राहि अलि ज्यापरि तो सरोजीं २३

मलयगिरिवरीचा वायु किं कालकूट
फणिततनुगत ? किंवा सुभ्रूचे केश दाट
सकलभुवनकर्ता की श्वभक्षी कनिष्ट
मम मनिं परमात्मीं मानुं एकत्व नीट २४

अवघे जग नाशिवंत आहे
न वयाहोनि नृदेह भिन्न राहे
तदवाप्तिं किति हे महा प्रयास
नर करिती न विवेक अल्प त्यास २५

घडिं घडीं जन कालमुखीं पडे
बघुनिया नर मानस कोरडे
विषय लाचवितें मम मानसा
न त्यजितें परि तें दृढ लालसा २६

पडो लयांत नृपलक्ष्मि घडोत सर्व
मन्मस्तकावरि पडोत असी अखर्व
छेदो शरीरास मम काल सुखें तथापि
धर्माहुनी मम मती न चळो कदापि २७

अति वळी अरि संतत संचरो ,
मम शिरा निकटीं असि वावरा
शिर ही सर्व फुटो न तरी कदा
करि न उक्ति तयाप्रति तापदा २८

तरुणोपाय दिसे तुला जरी
करिशीं जीव विषाद कां तरी
अझुनी काय तुझ्या मनीं अरे
शिरला नंदकुमार नाहिं रे २९

वार्धक्यानें ग्रासिलें सर्व काय
निःशंकेनें नीजशी येथ काय ?
किंवा सौख्यें घेइ तीला अमूप
जागे माता जान्हवी वत्समीप ३०

वरातळीं धांवुनिया बहूत
संताप कां तूं हृदया करीत
मद्रक्षणीं नंदकिशोर नित्य
उभा असे उक्ति न ही असत्य ३१

रे रे मना मनसिजारिपदांबुजाते
वंदी सदैव त्यजुनी सुविपाद याते.
संसारकूपिं मज लोटुनिया-वृथा कां
वारावयास अभिलाषसि पुत्रशोका ३२

*गंळे ज्यांच्या गंडातुनि विपुल दानोदक भरी
गजांच्या भोंताली भ्रमर मिळती ज्यास न मिती
अशी लक्ष्मी मार्ते किमपि हि नको जींत रमुनी
हरीच्या सेवेला मनुज मुकला हा अनु दिनीं ३३

मरकतमणिवृक्ष वा तमाल
वरु विलसे अति सांवळा विलोल
रघुपती अवलंकुनी दुगोनी
करिति असे मुनि तर्क ही करोनी २४

तपनतनया कल्पूं आहे तरी जलयुक्त ती
मरकतमणिश्री ही मानूं तरी मधुरा कृती
रघुपतितनुछाया रानीं मुनीस ही दीसतां
प्रथम अमितभ्रांतीमाजी पडे मुनि तत्वतां २५

त्वरें कीं एकाकी पडलि चपला अभ्रारिहुनी
लता वातें आली तुटुनि अथवा ही तरुहुनी
न या देशीं चतुर चकला वा नरमणी
परी उष्णोश्वासीं तिस समजला तो विरहिणी २६

नीचाच्या गृहिं संपदा द्विजगृहीं राहे सदा आपदा
अल्पायू सुमती परंतु कुमती दीर्घायु ते सर्वदा
नीती ही गहना विलोकुनि मनीं कोपाग्नि पेटे महा
तूं लोकत्रितयाधिनाथ असशी आहे परी दीन हा २७

मेरूचें मूल आणी जलनिधि मलयच्छिन्न या भूप्रदेशीं
जे कोणी काव्यकर्मीं कुशल करितसे एक मी प्रश्न त्याशीं
पक्क द्राक्षारसें ही मधुरपण जिचें नेइजे वंदनाला
त्या वाग्स्वामित्विं माझ्याहुनि कवण दुजा पात्र तो स्पष्ट बोला

वीणा सारुनि दूरि मद्वचगिरा देवी स्वयें शारदा
कर्णीं सांठवि सादरें त्रिजगतीं जगीं एक ही सारदा
ऐशी पंडितराजवाणि मधुरा ऐकोनि ना हालवी
शीर्षा तो नृपशू असे पशुपती किंवा वदे हा कवी २९

मात्सर्ययुक्त खल हे करितात निंदा
व्याकरणेंच मम वाणि वरी न खेद।
काव्यारविंदमधुमार्मिक जो मिलिंद
दिग्भागिं भूवरि सदा भ्रमतो अमंद १०

पाहोनी परकाव्य वंदिति न ते लोकां कवी ही सुधी
लक्ष्मीवैभवसिंधु सेवुनि सदा पृथ्वीपती वीतधी
जे कामालसनाकलोकललना माधुर्य निंदी अती
कोणाच्या तरि धन्य आननिं अतां नाचेल मद्भारती ४१

मधु द्राक्षा साक्षात् अमृत किमु बालाधरसुधा
स्वयें जी झाडी ती झडकरिं अशांच्या गुरु मदा
जगीं जन्मोनीया जन मृत खरे तेच न मनें
धरीती मोदातें परिसुनि जगन्नाथवचनें ४२

पक्क द्राक्षिं मधूंत निर्भर वसे माधुर्य जें कोमल
त्यांचा गर्व हरील यापरि जरी वाणी तुझी उज्वल
काव्याची मग गोष्ट काढ सखया माझ्यापुढें तूं तरी
मौनातें धरि ना तरी जन जसा पापा धरी अंतरीं ४३

द्राक्षांत इक्षुरसिं दुग्ध सुधा मधूंत
नैसर्गिकी मधुरिमा वसते नितांत
हा काव्यमाधुरिस पंडितराजयाचा
पाहोनि शीघ्र धरि हास शिरीं स्वतांच्या ४४

शास्त्रां आकळिले विधी सकल ही नित्य कर्मे सारिले
दिल्लीनायकपाणिपल्लवतळीं तारुण्य ही घोळिलें
अतां सोडुनि वासना मधुपुरीं सेवीं मुकुंदा हरी
केलें त्यापरि सर्व पंडितवरें या आर्यभूमीवरी ४५

आहेत हीं मम मनोहर पद्यरत्नें
तीं नीच लोक हरितील अनेक यत्नें
शंका अशी निजमनीं निपजोनि कांहीं
तद्रक्षणीं रचियली दृढ पेटिका ही ४६

ंडी कवि.

---

## औरंगजेबाचा पश्चात्ताप.

श्लोक.

यद्गर्जना परिसुनी हि सकंप चित्तीं
प्राणी समस्त निजजीवितशंक होती
होतां हरी परम निर्बल तो जरेनें
त्या क्षुद्रही छळिति पारधि निर्भयानें १
माझी स्थिती तरि हि आज अशीच झाली
तच्चिंतनीं मति मदीय बुडोनि गेली
मन्नाम ऐकुनि हि जे बहु भीत होते
ते आजि मद्रिपु अहा ! छळितात मातें २
ज्या शत्रुनें भुजबलें जरि दीन केलें
मद्भीम शौर्य भुवनीं जरि गाजवीलें
मी होय संप्रति बघोनि जराभिभूत
अत्यंत उद्धटपणें रिपु वागतात ३
ते दुष्ट शीख रजपूत तसे मराठे
हे मद्रिपू मिळवुनी बहु सैन्य मोठें

निर्भीतिनें करुनि बंड मम प्रदेशीं
नेती अपार लुटुनी जन संपदेशीं ४

आजी इथें तरि उद्यां तिकडे करूनी
बंड स्वयें बहुपरी यवना छळोनी
माझे प्रदेश ठक हे बहु आक्रमीती
मत्सैन्यकासि कपटेंचि पराभवीती ५

ऐशापरी परिसुनी रिपुदांडगाई
अत्यंत चित्त मम कोपुनि लाल होई
अंगीं चढे स्फुरण घेउनिया बलाते
जावें गमे रिपुमदा उतरावयाते ६

युद्ध स्वयें करुनि शत्रुगणा हरावे
तद्राज्य सर्व मग अंकितसे करावे
तैसें बळेंचि सकला मम धर्मदीक्षा
द्यावी गमे मच अशी रिपुलागिं शिक्षा ७

कीं मन्मना समयिं या भ्रम साच झाला
ही दुस्तरा कृति कशी परिपूर्णतेला
जाते कळे न मज शत्रु बलिष्ट मोठे
तद्विक्रमा परिसुनी मम ऊर फाटे ८

द्याया प्रचंड चमुते तनखा पुरेना
कीं जाय सोडुनि मला रिपुवृंदि सेना
माझ्यासमीप उरली बहुसान आतां
मी शक्य केविं मग होइन शत्रुघाता ९

झालों पहा अतिच जर्जर मी जरेनें
गेली लया सकल शक्ति मदीय तेणें

माझ्या करें समर घोर घडे न आतां
मी शल्य केविं मग होइन शत्रुघाता १०
होईल या कवण संकटिं साह्यकारी
त्याच्या कृपें त्वरितिं दुःस्थिति ही निवारी
योजूं रिपूंशिं कवण्या वर सैन्यपातें
होईल भंगकर जो रिपुपीडनातें ११
किंवा करूं कवणता सदुपाय, होतें
राज्योपरक्षण जयें, न सुचेहि मातें
कांहीं मला ममहिताहित तें कळेना
ऐसी ममास्थिति दुरावह जाहली ना ? १२
जें राज्य म्या मिळवितां बहु कष्ट केले
अन्याय कर्म करुनी जगिं जोडियेलें
दुष्कीर्तिते, प्रबल मद्रिपु सत्वरेतें
संहारतील म्हणुनी मज दुःख होतें १३
केलें जरी बहुत दुःख न लाभ आतां
पर्वा न चित्तिं धरिली रिपुतें छळीतां
जें कर्म मी बहु सुखें धजलों कराया
का दुःख आजि मज तत्फल आदराया १४
धर्माभिमान धरुनी स्वमनांत थोर
हिंदु प्रजेस दिधला बहु दुःखभार
तीच्यावरी बसवुनी ' जिजिया ' करातें
केला तदीय अपमान हि पक्षपातें १५
मात्सर्य चित्तिं धरुनी कपटी शिवातें
पाचारुनी स्वपुरिं संधि करावयातें

विश्वासघातकृति आचरुनी तयाते
केले सुतासह अहा! प्रतिबंधनाते १६

त्यानंतरीं धरुनिया बहु कैतवानें
संभाजि भूपहि अमानुष निर्दयेनें
म्या मारिला स्मरुनि ते उठवी शरीरीं
रोमांच दुःखित तथें जन होय भारी १७

तैसेचि शीख रजपूत जना करूनी
तद्धर्मनाश, छळिलें सुनया त्यजोनी
कीं काढुनी सकल हिंदुजनाधिकार
स्वज्ञातियांहि दिधला मम कारभार १८

वैरी छळोत मज दुःख न फार होतें
माझ्यासवें मम कृतीसम वर्तती ते
होतें असह्य मम मानसिं दुःख साचें
कीं पाहुनी कुटिल वर्तन मत्सुताचें १९

तो दुष्ट आकबर शत्रुगणा मिळाला
मद्राज्यनाश करण्यास हि सिद्ध झाला
नम्र स्मरोनि उपकार सदा असावा
मत्पुत्र तो मजासि का प्रतिकूल व्हावा! २०

प्राणाहुनी अधिक ही ममताकरूनी
ज्या पाळिलें स्वमनिं आस असी धरूनी
वृद्धापकाळिं बहु देइल सौख्य मातें
मद्दैव दुष्ट मग केविं घडेल हो तें .. २१

म्या व्यर्थ दोष बहु लावियला सुताते
तद्दोष यांत न गमे मम मानसाते

मी ज्यापरी सुखद वर्तविलें पित्यातें
तैसाचि मत्तनय वागविलोच मातें ! २२

हा ! हा ! नृपालपदलोभ मनीं धरूनी
म्या निर्दयें परम दुष्कृति आचरूनी
वंशा कलंक अति निंद्यचि लाविला जो
ऐशास जन्म दिधल्यास्तव ईश लाजो २३

ज्या भूपतीउदरिं जन्म मदीय झाला
जैं पाळिलें मजासि साहुनिया श्रमाला
विद्यार्जना करविलें मज युद्धदीक्षा
जैं बोधिली मम हितार्थ दिली हि शिक्षा २४

ऐसे जयें मजवरी उपकार केले
ते केविं चित्तिं कुकृती करितां न आले ?
प्राप्त्यर्थ राजपदवी कपटें स्वतात
म्या ठेविला अहह कीं प्रतिबंधनात २५

साधोनि कर्म इतुकें उगि राहिलों न
केलीं भयंकर कृति त्यजुनी स्वभान
दारासुतादिक नयज्ञ मदीय भ्राते
प्रात्पासनावनभयें वधिलेचि म्या ते २६

या भूतलीं निपजले असतील भूप
धर्माभिमानि महतीच्छु कुधी अमूप
लोकीं असें स्वकुलनाशक मीच पाहीं
झाला न पूर्विं नच होइल यापुढें ही ! २७

हें सर्व आठवुनि कंठ भरूनि येई
दुष्कर्मतप्त मम बुद्धि साचेंत होई

हें कृष्णवक्तृ जगिं दाखविण्या हि पेक्षां
कीं वाटतें बहु बरी मज मृत्युशिक्षा २८
देऊनि दुःख बहु जन्मद त्वपित्यास
बंधू वधोनि मिळवूनि नृपामनास
त्वां साधिलें तरि हि दुर्यश मात्र लोकीं
धिक्कार रे अलमगीर ! असो तुला कीं * २९
पैगंबरा ! ममकरें घडलें कुकर्म
केले तरी जगति विस्तृत त्वत्सुधर्म
याकारणें मदपराध तुवां क्षमावे
ही प्रार्थना करितसें तुज दीन भावें ३०

विष्णु बाबाजीराव कुळकरणी.

---

## देवास नवस

श्लोक.

व्यापी जो भुवना, चराचरिं वसा राहावसे सर्वदा
जे त्यासी भजती अनन्यमतिनें त्यां विस्मरेना कदा
ऐसा जो जगदीश त्यास नमुनी हस्तांस या जोडुनी
याचीं शक्ति सुनाथ आज मज दे त्वत्कीर्तिच्या वर्णनीं १
कोणी या जगतीं निरिच्छ नसतो, इच्छा असेही तुला
तूतें आवड एक मात्र विभुवा—तूं इच्छिसी भक्तिला,
कोणीही तुजला म्हणोत, निरिही ; हीं गोष्ट मिथ्या असे
...ी सदैव असते त्वत्प्रेम तेथें वसे. २

---

* ...च अनुलक्षून काढिलेले उद्गार आहेत.

स्वार्थातें वरिसी जरी वार अशा स्वार्थीं दुजा भाव तो
लोकस्वार्थसमानची कवण तो स्वार्थास त्या लेखितो ?
तूतें भक्ति लवा जरीं कवणही देई तयातें सदा
देसी सौख्यखनी निरंतराचि तूं हें सत्य बा सर्वदा ३

भक्तीनें अपुल्या अनेक जन जे देती सुवस्तू तुला
त्यांनां ईप्सित वस्तु सर्व मिळती हें सर्व ठावें मला
भक्तीनें तुज वस्तुदान करिती केव्हां न जे बा तयां
त्यांच्या तुच्छ धनासि मानिसिल तूं हें सांगणें कासया ? ४

तुला नवस लोक हे करिति व्यर्थ नानापरी
तयांत अनुरागलेशविषयीं तनाना परी
स्वसाधनपरा असे सकल सृष्टि ही केशवा !
तदंश लघु भक्तिला तव वरीतसे माधवा ! ५

अनिष्ट जंव कांहिं ये तुजकडे त्वरें धांवती
न आठवण ते तुझी जरि न तें कधीं काढिती
न उद्यम करावया विबुध या जगीं पातला,
न ते समजती असें ! कवण मोह हा घातला ! ६

कुणी तनय मागिती कुणि मुली स्त्रिया मागिती
कुणी सकल दीधल्या बहुतशा धना त्यागिती
असा नवस थोर त्या करिति ; त्यां परी ना कळे
सुभक्ति नसतां कसा भुवनपाल तो आकळे ७

सुचूततरु इच्छि आम्रफल एक हें ना घडे
न इच्छि नगराज केविं बहु बर्फ अंगीं पडे
न रत्नखनि इच्छिते सुमणि एक ती केधवां
धनास दिधतां कशास मग त्या वरें माधवा ? ८

असो; उद्गिम हा म्हणूं मग तयांत शंका नको.
परीहि भलता प्रसंग असतां सुशंका नको ॥
जगत्पति तुला जरी कवण नीच जो लेखितो
तया न उपदेश जो करिल त्या न मी मानितों ९
मदीय अरिघात तूं कर म्हणोनि जे तूजला
धनास दिवती तयांत अविवेक ना माजला ॥
धना तुजसि देउनी दिवति जे तुला चाकरी
तयां गमतसे गमे खचित देव मारेकरी ! १०
स्वरूप न तयांस ठाउकें तुझें असे संतत
सदा कवळिती जगत् जरि असे तमानें युत
मनोभ्रम तयांचिया वसतसे सदा पाठिसीं
न मौख्यें निवसे कसें मग तयांचिया गांठिसीं ॥ ११
अहो देवा ठेवा सतत तुमच्या चित्तसदनीं
सदा वाका ठावा मग रुचिर रूपास नयनीं
दिनानाथा नाथारहितचि असे सर्व जनता.
जगन्नाथा नाथाप्रति वदत आम्हीं तुज नता. १२

जगन्नाथ धोंडू भांगले

वारंवार पहा. (पद :— संत दयाळ या चालीवर. )

कार्य कसें करितों । पहावें त्यांत किती चुकवों ॥ धृ ॥
निजधन लोभी अल्प वेंची । जाय मरूनी ठेवून तसेंची,
फलभारानें आम्र हि लवला । होय हीनफल देतां सकलां
अज्ञानें पशु हि न व्हावें । मध्यम स्थितिनें नित्य असावें ६

मोरो गणेश लोंढे.

काव्यरत्नावलि.

ग्रंथ संग्रहा... शाखा

अंक १२ वा.

# राष्ट्रीय सभेचा वाढ दिवस.

गेल्या दिजेंबर महिन्यांत महाराष्ट्र देशची पूर्वीची प्रसिद्ध राजधानी पुण्य पत्तन येथें राष्ट्रीय सभेचा मेळा भरला होता. त्या वेळीं कवीनें पुढील उद्गार काढिले आहेत. )

श्लोक.

पाळी जी स्वतनूजतुल्य भवनीं आह्मास रात्रंदिनीं
नामें जी विजया तिचा जय सदा होवो असें इच्छुनी
प्रार्थी ईशपदा सदा सुमतिला देवो तिला पाळनीं
होवो लाभ मला तसा सुमतिचा थोडा जरा त्यांतुनी १

जें जाहलें सुखद राज्य अह्मा प्रजेला
जें पाळितें अमुचिया धनजीविताला
तें राज्य या भरत भूवरि इंग्रजाचें
राहो असें सतत इच्छिति आर्य वाचे २

नामें जी अबला तरी प्रबल जी स्वांगें गुणांनीं खरी
सर्वां न्यायसुमार्गदर्शक तशी जी राजनिष्ठा पुरी
राज्ञेचें हितचिंतनीं सविनयें ठाके उभी अंगणीं
ही राष्ट्रीयसभा स्वदेशहितभा आर्यां खरी मी गणीं ३

सतत वसति जीच्या मानसीं प्रेमभाव
सविनय नयनींतो आणि वा हास्यभाव
अनुदिन विजयेतें सेवणें हाच बाणा
सकल भरतभूची बालिका[1] हीच जाणा ४

स्वदेशहितचिंतनीं झटति जे सदा राबती
तवानुसर लोक ते विभुति[2] भारतीं शोभती
पुढार[3] धरिती स्वयें सतत सुज्ञ विद्वन्मणी
तुला अनहिता असे कवण मुर्ख सांगा गणी ? ५

झाला जन्म तुझा तदा भरतभू झाली मनीं हर्षित
वार्ता आयकतां तिची भगिनी[4] ही झाली जरा कंपित
पाहोनी तव हास्य चंद्रवदना[5] आनंदले सर्वही
बाल्यीं खेळ[6] त्यजूनि बांधवहिता तूं कष्टशी वत्सही ६

हळुं हळुं मग जाशी जागजागीं[7] फिराया
हळुं हळुं जणुं रांगे कन्यका तोषवाया
हळुं हळुं मग बोले बोबडे बोल जैसें
परिसुनि तव वाणी हेंचि आश्चर्य भासे ७

आहे रीत बरी तुझी परि मला खंती अती वाटते
तूं जाशिल कधीं तरी निजगृहीं[*] गे ! सासरीं खास तें

---

१ राष्ट्रीय सभा. २ वाणीच्या योगानें. ३ अधिपतित्व. ४ इंग्लंड. ५ चन्द्रवदन म्हणण्याचें कारण सर्वांस हितकर असें तुझें बोलणें आहे, त्यास उद्देशून. ६ कारण तुझे भलते सलते बाळचाळे काहींचं झाले नाहींत. लहानपणापासून तुझें प्रौढ वागणें आहे म्हणून. ७ सभा जागजागीं भरत गेल्या त्यास उद्देशून. * मुलीचें सासर हें तिचे घर.

वर्षे झालिं नऊ वयास तुझिया हें संपलें दाहवें
कन्यादान करावयास उचितों वाटे मला ग वय ! ८

झाला वृद्ध पिता तुझा अबलही तो ह्मण नामें गुनी
स्वामींचें बघ कर्मयज्ञ करुनी चिंता तुझी वाहुनी
त्या वाटे कधिं मुक्त होइन तुला अर्पून अन्यां करीं
केव्हां तो सुखसोहळा तव गडे, पाहीन नेत्रें तरी ९

जाई बालपणा तुझा टवटवी येई मुखाब्जावरी
या वेळेपरि खंति अंतर तुझें जाळीत आहे तरी
वाटे तो लडिवाळ दर्शक असा माझा कुठे ब्राडला ?
गेला तो अजि सोडुनी मज कुठें सांगा कुणी हो मला" १०

नाहीं तो सुख सोहळा तव गडे पाहावया राहिला
स्वर्गी जाउनि राहिला निशिदिनीं देवापुढें ठाकला
प्रार्थी ईशपदीं तुझ्यास्तव गडे ! व्हावें तुझें कीं बरें
खंती सोडुन दे तुझा जनक हा पाहोनि तूवें झुरे ११

नाहीं बालपणा तुझा मम बये अद्यापि गेला लया
नाहीं योग्य तुला पती रमविणें चित्तीं गणीं त्वद्दया
जाणीशी मनिं संमतीविण बये तूं वाग त्यासारिखें
बंधूंकाळजितें धरी परत ये हें मद्दुचा आयकें १२

---

१ विलायतेंत सभा भरवून० तिकडच्या लोकांच्या स्वाधीन करणें हेंच कन्यादान. २ योग्य ३ मुलीचें एकदां लग्न झालें ह्मणजे पित्याचें काम संपलें ह्मणून ४ तुझें बालरूप नष्ट होऊन तुला प्रगल्भता, प्रौढपणा येऊं लागला आहे त्यास उद्देशून ५ तुला चितातुर पाहिलें ह्मणजे हृयुमचें काळीज चिरल्याप्रमाणें ( अतिशय प्रेमाची खुण. ) ६ इकडची म्ह० भारतीय बंधुजनाची.

तूं जाशील विलायतेस वरण्या भर्त्यासवें रंजण्या
तूंवें होतिल साह्य गौर तनया ज्ञानाऽसवें भेटण्या
तेथींचा नव डामडौल सगळा पाहून मोहूनिया
तेव्हां सर्व पडेल, गे विसर हा पाहूनि मौजा नव्या ! १३

पाळी जसा सुमुनि कण्व शकुंतलेला
तैसा तुला समज ह्यम मुनी जहाला
आज्ञेशिवाय घडला पतियोग जेव्हां
झाली दशा कशि मनीं बघ आण तेव्हां १४

होता जरी तनय खूण तरी तियेला[2]
लोटीयलें दुरवरी बघ या रिवीला
आहे गड तनयहीनाहि बालिका तूं
जावोनि मात्र हिरमोड नको बघूं तूं १५

मैत्रिणी बघ तुला जरि मोहिती । साजणी त्यजुं नको नय रीत ती
योग्य वर्तन करी पति चाकरी । भूषवी कुलवधूप्रति यापरी १६

कोठें असो बाइ सुखी असो तूं । सर्वांप्रती सौख्यद फार हो तूं
बाणा तुझा ठेवि सदा मनांत । ही प्रार्थना ईशपदीं करीत १७

सदाशिव शंकर पारगांवकर.

---

१ शकुंतलेच्या पित्याला न कळत दुष्यन्त राजाचा व शकुंतलेचा प्रीति-योग झाला या गोष्टीवर येथें कटाक्ष आहे. जरी आंग्ल लोकांनीं वरपंगी प्रीति दाखविली तरी भुलूं नको हा भाव. २ शकुंतलेला. ३ तुझा ठराव पसार होणें हाच तनय ता तुला नाहीं. ४ तेथें गेल्यावर पार्लमेंटादिक सभा किंवा वैभव वगैरेनीं जरी मोहिलें.

# हिंदु घड्याळें.

[ जी. बी. नाईक कंपनीनें जीं " हिंदुघड्याळें "करविलीं आहेत, त्यावर हा अभिप्राय आहे. ]

आर्या.

जी. बी. नाइक तुमची रुचिरा ही कल्पनाकृती बघुनी
तुमचें स्तौत्य कराया मद्रसना ही धरी न किंतु मनीं १
आहे जगांत भारी काळाची योग्यता मला वाटे
तो काळ दाखवाया नाइककृति हीच योग्य सकळांतें २
अग्रेसरत्व घेती हिंदु घड्याळें सुधारणाशैलीं
जन धन्यवाद गाती जेव्हां ही कल्पनाकृती व्याली ३
देतें स्फुरण मनाला नाइक ! हो ! " हिंदु वॉच " अभिधान
केला खरोखर तुह्मी व्यक्त जनीं हा स्वकीय अभिमान [४
जरि मूढजनीं तुमचा लापीं धिक्कार सर्वथा केला !
परि ह्या घटिकायंत्रीं स्वदेशपथ हा क्षगांत अक्रमिला ५
ज्या शूर शिवाजीनें वांचविला देश आपुला आज
त्याचें दर्शन घ्याया वाटतसे निंदकास कां लाज ? ६
स्वीकारी मौन सदा बालिश—लोकीं सुधारणा देवी
करि वल्गना ह्मणूनी निंदक जन हा न गोष्ट कां ठावी ? ७
ह्मणतात किती जन ते परहस्तस्पर्श होय ह्या कृतिला
तद्बुद्धि अकुंचित ही पाहुनिया खेद वाटतो मजला ८
करितों शीघ्र गतीनें उन्नति मी यापरी मुखें वदला
मज वाटे सिद्ध असे उन्नतिला शीघ्र तो वधायाला ९
चित्रें मनोहरें तीं पाहुनि सप्रेम होय मानस तें
भक्ति जडे देवपदीं युक्ति किती सौख्यदा तरी दिसते १०

नास्तिक होतों आह्मी नच घ्यावीं दर्शनेहि देवांचीं
परि भाग्योदय झाला नाइक हा देवपंक्ति दे वांचीं ११
धर्म निमाला जरि तो, स्मृति नाहीं देवळादिकांची ती
परि मज वाटे आतां दृढ केली भक्ति यापरी चित्तीं १२
लक्ष्मी रुद्र भवानी तैशी गणराज शारदा माता
बलभीम रामसीता वचनां हीं ये प्रसन्नता चित्ता
व्हावा स्वधर्म जागृत कीं स्मृति व्हावी तशी स्वशौर्याची
शिवमूर्तिची दिसे मज नाइक ! हो ! योग्य योजना वांचीं १४
जरि शौर्य नष्ट झालें उरली आंगीं न शक्ति लवलेश
बाहु स्फुरण करिती पाहुनि शिवाजिचा समरवेष १५
संरक्षिलें जयानें स्वधर्म लोकीं पवित्र वाणीनें
तो रामदास पाहुनि व्हावें हो ! धन्य ! धन्य ! नेत्रानें १६
आशिर्वचनीं ज्यांनीं सप्रेमें भक्तवृंद उद्धरिला
अक्कलकोटस्थ मुनी पाहुनि संतोष होय चित्ताला १७
जागविलें स्वकृतीनें अमुच्या इतिहास-धर्म-नीतीतें
त्या नाइकास आतां द्यावें तरि काय पारितोषक तें १८
शेवटीं तुह्मास विनयें नाइक ! हो ! मी विनंति करितों ही
लवलेश ह्या कृतीनें तुमचें कर्तव्य संपलें नाहीं १९
अझुनी दुर्दैवानें सुषुप्तिवश ती सुधारणा देवी
बंदीजन होउनिया जागृत करिं तीजला सुपथ दावीं २०
केली अर्पण मजला स्वकीय कृति जी तुह्मी प्रमोदानें
परि परत भेट घ्याया वाक्पुष्पाविण, मी दुजें नेणें २१

चित्रोक्तिवक्ता कवि.

# निधिबोध

श्लोक.

जव्हां मौजा मारितो धुंद भारी
लाटांमाजी फेनदंतां उभारीं
लाटांचा जैं नाश होतो अगाडी
धुंदी भाग्या नाशिते दांव पाडी १

खळबळे जळ संथ न राहे
तरिच निर्मल वारि पहा हें
तव शरीर वरारस ताजे
कर रपेट हुरूपाहि दे ज २

नौका राक्षसि चालण्यास खडकीं पाणीं तधीं त्या भिती
पाणी तें सुकतां तया सहज हे प्राणी पदें ताडिती
पाणी ज्यांत नसे अजागळच तो प्राणी अडाणी दिसे
पाणीदारपणा असा तुजमधीं कोणी न तूतें हसे ३

अतुल गुण गभीरता मदीय
सकल कवि गणास वर्णनीय
तुल रघु बलि शोभले गुणीं या
धर गुण जन लाव तूं स्तवाया ४

माझी संतत घोषणा तुज मुला ऐसें शिकावें ह्मणें
उद्योगांत सदैव मग्न अस तूं ज्ञानार्जना कारणें
जातों वाढत ओहटें परि नसे मद्घोषणा थांबत
तैसा उत्तम नष्ट काल असतां ही उद्यमीं तूं रत ५

वर्षावाविण मी सदैव असतों जैसा जलें निर्भर
जे लाभे बहु अल्प त्यांतच सदा संतोष चित्तीं धर
संपत्तींत बुडे महंमदमही जेता अलेक्झ्यांदर
दुःखीं अंत, भिकारि शांतित तुकादासादि गेले वर ६

शशि निशिदिनि नित्य ओढिताहे
रवि करि मम देह फार दाहे
कुरतुडि वडवाग्नि अंतरंगे
परि मम गुण शांतता न भंगे ७

वायु आंरुडुनि आपटि जोरें
ओहटांत मम काय घटे रे
व्यग्रता बहु असो शरिरास
चित्तशांति नच जाउ लयास ८

स्वात्यंबु शुक्तयंतरिं होति मौक्तिकें
प्रत्यक्ष हें भूषण काय तें निकें
कृष्णांबुकीर्तिप्रद मौक्तिकाक्षरें
गुप्तीं वरीं कीर्ति परोक्ष आदरें ९

गाधोदकीं वात शिरे किनारीं
अत्यल्प विद्येंतच गर्व भारी
अगाध जेथें बहु शांत नीर
संपूर्ण विद्येसम तें गभीर १०

मातें मंथुनि देवदानव पुरा रत्नें बहू लाभले
अतां मंथिति दैत्य बाष्पतरणी चक्रेंच गोरे भले
नेती स्वर्ण समस्त रत्नगणही श्वेतद्विपाते बळी
झाली पांडुरता तरीच हिजला ही आर्य भू निर्बळी ११

गाधीं भ्यासुर उग्र नक्र मुसरीं दंष्ट्रा कराला अती
माझ्या मौक्तिक शुक्ति संनिध सदा स्वच्छंद संचारती
त्यांच्या वक्त्रगुहांत मानव कधीं स्वप्राण ही अर्पिती
तेव्हां मौक्तिक लाभतें सुगुणही लाभावया ही भिती १२

जे शांत शुद्ध तव पूर्वज वेदवेत्ते
माझे अगाध जलिं संचरती सदा ते
कां शंकसी फिरसि भीव उगा किनारीं
या साहसांतच सुकीर्ति धना दिसारीं १३

माझा जसा आक्रमिशी किनारा
विद्याकलांचाहि तसाच सारा
तुफान झालें तर तें किनारीं
अत्यल्प विद्या बहु नाशकारी १४

मर्यादवेलेंतच वास माझा
मर्यादशीलांत असोहि तूझा

माझी संतत घोषणा तुज मुला ऐसें शिकावें ह्मणें
उद्योगांत सदैव मग्न अस तूं ज्ञानार्जना कारणें
जातों वाढत ओहटें परि नसे मद्घोषणा थांबत
तैसा उत्तम नष्ट काल असवा ही उद्यमीं तूं रत ५

वर्षावाविण मी सदैव असतों जैसा जलें निर्भर
जे लाभे बहु अल्प त्यांतच सदा संतोष चित्तीं धर
संपत्तींत बुडे महंमदमही जेवा अलेक्झ्यांदर
दुःखीं अंत, भिकारि शांतित तुकादासादि गेले वर ६

शशि निशिदिनि नित्य ओढिताहे
रवि करि मम देह फार दाहे
कुरतुडि वडवाग्नि अंतरंगे
परि मम गुण शांतता न भंगे ७

वायु आंरुडुनि आपटि जोरें
ओहटांत मम काय घटे रे
व्यग्रता बहु असो शरिरास
चित्तशांति नच जाउ लयास ८

स्वात्यंबु शुक्तयंतरिं होति मौक्तिकें
प्रत्यक्ष हें भूषण काय तें निकें
कृष्णांबुकीर्तिप्रद मौक्तिकाक्षरें
गुफीं वरीं कीर्ति परोक्ष आदरें ९

गाधोदकीं वात शिरे किनारीं
अत्यल्प विद्येंतच गर्व भारी
अगाध जेथें बहु शांत नीर
संपूर्ण विद्येसम तें गभीर . १०

मातें मंथुनि देवदानव पुरा रत्नें बहू लाभले
आतां मंथिति दैत्य बाष्पतरणी चक्रेंच गोरे भले
नेती स्वर्ण समस्त रत्नगणही श्वेतद्विपाते बळी
आली पांडुरता तरीच हिजला ही आर्य भू निर्बळी ११

गाधीं भ्यासुर उग्र नक्र सुसरीं दंष्ट्रा कराला अती
माझ्या मौक्तिक शुक्तिंत संनिध सदा स्वच्छंद संचारती
त्यांच्या वक्त्रगुहांत मानव कधीं स्वप्राण ही अर्पिती
तेव्हां मौक्तिक लाभतें सुगुणही लाभावया ही भिती १२

जे शांत शुद्ध तव पूर्वज वेदवेत्ते
माझे अगाध जलिं संचरती सदा ते
कां शंकसी फिरसि भीत उगा किनारीं
बा साहसांतच सुकीर्ति धना दिसारीं १३

माझा जसा आक्रमिशी किनारा
विद्याकलांचाहि तसाच सारा
तुफान झालें तर तें किनारीं
अत्यल्प विद्या बहु नाशकारी १४

मर्यादवेलेंतच वास माझा
मर्यादशीलांत असोहि तूझा

मर्यादवेळा न ढळे तुफानीं
मर्यादमागींच कोप आणी १५

आर्या.

दृढतर पाठ ह्मणुनियां। कूर्मा चिंता नसेच पोटाची
कर दृढतर पाठ मुला। उदरभरणभीति वा नुरायाची १६

श्लोक

मुद्रा हृदीं वागवि विष्णुरूपा
समुद्र मातें अभिदा सुरूपा
नामामृतानें भर नित्य वक्त्र
अमर्त्य होवो जनि त्वच्चरित्र १७

केशव वामन पेठे.

---

# प्रहर रात्र

श्लोक.

झाल्या रिकाम्या मशिदी चवाठी। रस्त्यांतली मोडलि दाट दाटी
बाजार विस्तीर्णहि बंद झाला। व्यापारि गेले अपुल्या गृहाला १
जी आलि होती भरती अपारा। सकाळपासून जगत्समुद्रा
जातां दिसे ती पुरि सामसूम। न रात्र जों जाहलि एक याम २
कोठें कुठें वादन नृत्य गीत। चाले गृहीं कीर्तन सधु- गीत
कोठें पुराणें सुरसें सुबोधें। आबालवृद्ध श्रवितात मोदें ३
शेजारि शेजारि परस्परांत। गोष्टी सुखाच्या बसले करीत
वृत्तांत जो कीं घडला दिनांत। चाले हटें त्यावर थाट वाद ५

वासुदेव वामन शास्त्री खरे.

---

[stamp] ग्रंथ संग्रहालय.

# सुई आणि टांचणी यांचा झगडा

## पद.

( " लक्ष्मी गेंवे निद्रा बोलुनि " या चालीवर. )

सुई टांचणी भांडूं लागल्या, भांडखोर अवदसां परी
वर्मी टोंचुनि खोंचुनि बोलति, उणीं काढिती परोपरी ॥ ध्रु ॥

" काय तुझा उपयोग ? सुई गे, डोकें नाहीं जरि तुजला
वया वांचुनी कसें चालतें ? विचित्र दिसशी तूं मजला " १

" डोक्या टांचणे करिशि कां गर्व ? नयन नच त्याला
" दृष्टी वांचुनि सृष्टि शून्य गे ह्मणती जन तूं पुस त्याला २
डोकें डोळ्या वांचुन अके, विरूप करितें देहाला
कशास ओझें बाळगशी गे ? टाकुनि सत्वर दे त्याला " ३

"तव नयनाचा काय फायदा हा सवत कांहिं तरि त्यांत असे
अणुसम नयनीं केर वसे तरि, दुःख जनां बहु जाचतसे ४
अगे अवदसे ! सुई कशाला नयनाचा करिशी गर्व ?
मुळींच नसले नेत्र बरे केरानें भरले सर्व " ५

मंद टांचणे मुरच दिसशि तूं धरूनि बसशी जाग्याला
तुरतुर झरझर भरभर धांवे, लवकर वारि मी कामाला " ६

" अगे सुई तूं कशास दाविशि गर्व मजपुढे तो अपुला
नम्रपणास्वी जातिस शोभवि, त्याचा गंध नसे तुजला ७

दांडसूर तूं पठाण असशी लवचिक पण लवमर न तुला
पाठ मोडलो तरी न वांकशि, ताठा आंगीं बसू भरला " ८

" अभिमानाचें वारें न तुला जन वांकवि तुज हवी वशी
अगे टांचणि वांकडि तिकुडी कुब्जा वशी दिसशी मशी " ९

" सुये पुनरपि कुब्जा म्हणशिल, डोळा काढिन उपटोनी
डोकें नाहिंच डोळा जातां, देतिल जन तुज फेंकोनी " १०

" मम देहाला शिवशिस तूं तरि, डोकें टाकिन उडवोनी
डोळा नाहिंच डोकें आतां, व्यर्थच तूं असुनी—नसुनी " ११

सुई टांचणी भांडण ऐकुनि, मुलगी आली धांवोनी
सुई घेउनी शिऊं लागली, नेढें गेलें तें तुटुनी १२
फेकुनि दिधली सुई भुईवर हस्तीं टांचणि घेवोनि
डोक्याभोंतीं दोरा बांधुनि बघे शिंवाया लागोनी १३
टांचणिचेंही डोकें गेलें शिवतां शिवतां निखळोनी
तेव्हां मुलगी तीसहि रागें सुई जवळ दे फेकोनी १४
नेढें तुटकी, शिर मोडकी, सुई टांचणी, या दोनी
भांडुनि भांडुनि नष्ट जाहल्या, पडल्या निपचिप होवोनी १५

अप्रिय शब्दांपासुनि निघती अप्रिय कर्कश बोल जनीं
केशव कवि उपदेशितसे तरि वद वचप्रिय हितकर वदनीं १६

या झगड्यापासुनि जनानीं घ्यावा तो उपदेश
हे यांचाहि उपयोग जगाला वाटे तो मज खास १७

केशव वामन पेठे.